असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**प्रश्नोत्तरे**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सभापती** : आता दिनांक 21 मार्च, 2012 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक 25238 घेण्यात येईल.

**अमरावती येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात विदेशी वाहनांच्या नोंदणी प्रकरणातील झालेली महसूल हानी**

**(6) * 25238 डॉ.रणजित पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो पुंडलिक गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक 17983 ला दिनांक 3 ऑगस्ट, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथील विदेशी वाहनांच्या झालेल्या नोंदणी प्रकरणातील गैरव्यवहाराबाबत संबंधित कर्मचाऱ्यांकडून शासकीय महसूल हानीची रक्कम वसूल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(2) तसेच सदर प्रकरणी अद्यापपर्यंत कारवाई न झाल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक 19 डिसेंबर, 2011 रोजी मा.आयुक्त, परिवहन विभाग, मुंबई, प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रश्न भाग (1) व (2) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (1) होय.

(2) होय.

(3), (4) व (5) संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही म्हणून विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये दिनांक 3 ऑगस्ट, 2011 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 17983 उपस्थित करण्यात आला होता. या अनुषंगाने एक प्रश्न उपस्थित केला होता. त्या प्रश्नाला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अतिशय सविस्तरपणे चर्चा झाली होती. माननीय मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले होते की, झालेल्या कथित विदेशी वाहनांच्या नोंदणी गैरव्यवहारातील जो प्रकार उघडकीस आलेला आहे त्याबद्दल अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, निम्नश्रेणी तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी सोडून किमान डेप्युटी आर.टी.ओ. यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय?

..2...

ता.प्र.क्र. 25238 . . . .

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, संबंधित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नुकतीच विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. त्यामध्ये सौ. सुमन बागडे, सौ. एस.बी. धुळे, आणि एस.बी.देशपांडे या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या व्यतिरिक्त या चौकशीमध्ये जे-जे दोषी आढळतील त्याबाबतीत कारवाई करण्यत येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ही चौकशी कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्या मार्फत सुरु आहे. या ठिकाणी विदेशी वाहनांची नोंदणी केलेली आहे, त्यांचे ओरिजनल पत्ते काय आहेत, मुंबईचा माणूस अकोला किंवा अमरावती येथे जाऊन नोंदणी करतो, याची चौकशी झाली आहे का?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25238......

या वाहनांची कस्टम ड्युटी भरली आहे का ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ही विभागीय चौकशी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ही वाहने सौ. अलका नितीन गभणे आणि श्री. नितीन नागोजीराव गभणे या दोन्ही व्यक्तींनी खरेदी केलेली होती. ही वाहने मे. स्टार मोटर्स, नागपूर या कंपनीकडून त्यांनी खरेदी केलेली आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : त्यांचा मूळ पत्ता पाहिजे. श्री. जयंत प्र. पाटील जाऊन नागपूरला रजिस्ट्रेशन करतो.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सौ. अलका नितीन गभणे आणि श्री. नितीन नागोजीराव गभणे या दोन व्यक्तींनी ही वाहने खरेदी केलेली आहेत. त्या ठिकाणी त्यांनी नोंदणी करण्यासाठी संबंधित कंपनीकडे जो अर्ज केला होता त्यामध्ये या दोन्ही अर्जदारांनी ते अमरावती येथे राहात असल्याचा पत्ता नमूद केलेला आहे. अमरावतीमध्ये ते राहतात आणि त्यांनी या ठिकाणी अर्ज केलेला आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई म्हणून विभागीय चौकशी सुरु केली आहे. आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आयुक्तांच्या माध्यमातून चौकशी समितीचे कामकाज सुरु आहे. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जी विभागीय चौकशी सुरु आहे ती किती दिवसात पूर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत आणि या चौकशी समितीचा अहवाल या सभागृहासमोर ठेवणार का ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, नुकतेच 20 मार्चला हे आदेश देण्यात आलेले आहेत. लवकरात लवकर चौकशी करुन सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सभागृहामध्ये अहवाल ठेवण्यात येईल.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई महानगरपालिकेने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठया प्रमाणात प्रस्ताव मंजूर केल्याबाबत**

**(१) * २५४४१ श्री.किरण पावसकर , ॲड. उषा दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेचा २१ हजार कोटीचा अर्थसंकल्प असताना महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका केव्हाही लागू होतील याचा विचार करुन केवळ एका महिन्यात २ हजार १०० कोटीचे प्रस्ताव मंजूर केल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चोकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीने डिसेंबर, २०११, जानेवारी, २०१२ या कालावधीत एकूण रु.२०८९.१८ कोटींच्या कंत्राट प्रस्तावांना मंजुरी दिली ही वस्तुस्थिती आहे. तथापी हे कंत्राट प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाकडून महानगरपालिकेच्या मंजूर अर्थसंकल्पात समाविष्ट कामांच्या संदर्भात कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करुन मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८ च्या तरतुदीनुसार स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. त्यामुळे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका केव्हाही लागू होतील याचा विचार करुन केवळ एका महिन्यात २ हजार १०० कोटींचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले असे म्हणणे रास्त ठरणार नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचा चाललेला वेडावाकडा कारभार यावर या सभागृहामध्ये आपण पुष्कळ वेळा चर्चा केलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा एकदा या सभागृहामध्ये सांगितले होते की, तीन वर्षे मुंबई महानगरपालिकेचे ऑडिट झालेले नाही, ते व्हावयास पाहिजे. मुंबई महानगरपालिकेचा 21 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प असताना महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका केव्हाही लागू होतील याचा विचार करुन केवळ एका महिन्यामध्ये 2 हजार 100 कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले आहेत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीने डिसेंबर, 2011-जानेवारी, 2012 या कालावधीत एकूण 2089.18 कोटींच्या कंत्राट प्रस्तावांना मंजुरी दिली, ही वस्तुस्थिती

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25441 ..... श्री. किरण पावसकर ....

आहे. एक महिन्यामध्ये म्हणजे 31 दिवसांच्या आत एवढे मोठे प्रस्ताव स्थायी समितीसमोर आलेले आहेत अशा महाराष्ट्रातील किती महानगरपालिका आहेत ? एवढी घाई करण्याचे कारण काय होते ? त्यावर सरकार म्हणून काही नियंत्रण ठेवणार का ? सभापती महोदय, मी काही तारखा आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्यामुळे या गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास येतील. 30 नोव्हेंबरला काही ठराव पास करण्यात आले. 38 कोटी रुपयांचा मिठी नदीचा प्रस्ताव होता. पुन्हा त्याच दिवशी एअरपोर्ट येथील मिठी नदीचा 31 कोटी रुपयांचा प्रस्ताव होता. पुन्हा 8 डिसेंबरला हेच करण्यात आले. 14 डिसेंबरला हेच करण्यात आले तसेच 21 डिसेंबर, 30 डिसेंबर या चार-पाच तारखांना 2 हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव देण्यात आले आणि ते मंजूर करण्यात आले. त्या बाबत शासन म्हणते की त्यामध्ये चौकशी करण्याचे कारण भासणार नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25441... श्री.किरण पावसकर....

हा जनतेचा पैसा आहे, जनतेच्या पैशाची उधळण झाली आहे. ती निवडणुकीनंतर आपण सत्तेवर येणार नाही या भीतीतून हे प्रस्ताव मंजूर करण्यात आले होते की, लोकांची दिशाभूल करुन 2 हजार कोटी रुपये खर्च केल्याचे दाखविले तर पुन्हा आपण सत्तेवर येऊ या उद्देशाने हा खर्च केला होता याची चौकशी केली जाईल काय ? या कामांमधील टक्केवारीचा विषय किंवा जनतेच्या पैशांची उधळण सुरु आहे अशा प्रकारचा विषय त्यावेळच्या सर्वच वर्तमानपत्रामध्ये छापून येत होता. त्याबाबत शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, नजीकच्या काळामध्ये मुंबई महानगरपालिकेची निवडणूक असताना एकाच महिन्यामध्ये एवढ्या मोठ्या रकमेची कामे मंजूर करण्यात आली आहेत. या दोन्ही गोष्टींबाबत संशयाला थोडीशी जागा आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. सर्वसाधारण पाहिले असता काही प्रस्ताव प्रक्रियेमध्ये असतात. प्रत्यक्षात बजेट मंजूर झाल्यानंतर कामांची प्रक्रिया पुढील 4-6 महिने सुरु राहते. त्यानंतरच्या काळामध्ये कामांची टेंडर्स काढली जातात. त्या प्रक्रियेप्रमाणे ही टेंडर्स काढण्यात आलेली आहेत.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, कदाचित हे कायदेशीर असेल, स्थायी समितीमध्ये कामे मंजूर करुन घेतली असतील. परंतु उद्या कोणी कोर्टामध्ये आव्हान देऊ शकतो. हे नीतीमत्तेला धरुन योग्य आहे काय, व्यवहार्य दृष्टीकोनातून पाहिले असता, पुढील 2-3 महिन्यांमध्ये महानगरपालिकेची निवडणूक असताना, केवळ मुंबई महानगरपालिकेनेच नाही तर कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेने अशा प्रकारे मोठया प्रमाणावर टेंडर काढून कामे मंजूर करणे योग्य होणार नाही याची दखल शासन घेईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, निवडणुकीपूर्वी घेतलेले निर्णय तशा अर्थाने संशय घेण्यासारखी परिस्थिती आहे हे मी कबूल केलेले आहे. ही बाब नीतीमत्तेला धरुन आहे किंवा नाही याबद्दल लगेच भाष्य करणे उचित होणार नाही. परंतु तारतम्य बाळगणे अपेक्षित आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25441....

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, 2089 कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली ही वस्तुस्थिती असल्याचे लेखी उत्तरात कबूल केलेले आहे. या रकमेमध्ये कोणत्या कामांचा समावेश आहे आणि या कामांची तपासणी करुन शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : या रकमेमध्ये अनेक प्रकारची कामे आहेत. त्या त्या महिन्यामध्ये किती रकमेची कामे हाती घेतली त्याची शासनाजवळ माहिती आहे. एकाच महिन्यात 2089.18 कोटींची कामे सुरु केलेली आहेत. त्याबाबत सध्या तक्रार आली नसल्यामुळे त्याबाबत आज तरी चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना संशयाला जागा आहे अशा प्रकारचे शब्द उच्चारले आहेत. निवडणूक आयुक्तांची दुपारी 3 वाजता पत्रकार परिषद असताना राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी काही विषयांच्या संदर्भात दुपारी 2 वाजता घोषणा केल्या होत्या. त्याबाबत आम्ही सभागृहात आक्षेप घेतला नाही, परंतु बाहेर आक्षेप घेता येतो आणि घेणे आवश्यक आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वी अशा प्रकारची घोषणा करणे ही बाब नैतिकतेला धरुण आहे काय, असे आम्हालाही म्हणता आले असते. माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर आणि सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांच्या मनात जे होते ते आम्ही मांडावे असे त्यांना वाटत होते की काय, हे मला माहीत नाही. मंत्री महोदयांनी मघाशी जे शब्द उच्चारले आहेत ते उच्चारले नसते तर बरे झाले असते. निवडणुकीच्या वेळी राजकारणासाठी आपण बाहेर बोललो तसे सभागृहामध्ये मंत्री महोदयांनी बोलू नये. अन्यथा आमच्याकडे सुध्दा बोलण्यासारखे विषय आहेत. धारावीला 4 एफएसआयची घोषणा करण्यात आली होती. ती नैतिकतेला धरुन होती काय, त्याबाबत बोलावयाचे नाही. त्यामुळे त्यांचे काम ते करतील आणि मंत्री महोदयांनी सरकारचे काम करावे एवढीच माझी विनंती आहे.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य मार्ग परिवहन महामंडळात अनुकंपा धारकांवर झालेल्या अन्यायाबाबत**

**(2) * 25535 श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री.उल्हास पवार , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाने अनुकंपातत्वावर नियुक्ती करताना नियमित वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे परंतु एस.टी.महामंडळात अनुकंपातत्वावर नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाप्रमाणे नियमित वेतनश्रेणी दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यावर शासन कोणती तातडीची कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री.गुलाबराव देवकर**, **श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) सन 2000 पासून कोणतीही नवीन भरती करतांना ती नियमित वेतनश्रेणीत न करता ती प्रथम 5 वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणीत करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला असून त्याप्रमाणे सरळसेवेने अथवा अनुकंपा तत्वावर नेमलेल्या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ वेतनश्रेणीत नेमणूका देण्यात येतात.

(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, एस.टी.महामंडळामध्ये किंवा कोणत्याही शासकीय विभागातील एखादा कर्मचारी मयत झाला असेल मग तो अपघातामुळे मयत झाला असेल किंवा नैसर्गिक कारणामुळे मयत झाला असेल त्याच्या कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देणे बंधनकारक आहे. हा नियम एस.टी.महामंडळाला आणि इतर विभागांना सुध्दा लागू आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 11:15

ता.प्र.क्र. 25535... श्री. जयप्रकाश छाजेड..

.

उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, कोणतीही नवीन भरती करताना ती नियमित वेतनश्रेणीत न करता कनिष्ठ वेतनश्रेणीत करण्याचा निर्णय महामंडळाने घेतलेला आहे. यापूर्वी महामंडळामध्ये अनुकंपा तत्वावरील ज्या भरत्या झाल्या त्यांना नियमित वेतनश्रेणीवर घेण्यात आलेले आहे. एखाद्या ड्रायव्हरचा पगार 25 हजार रुपये असेल आणि तो अपघातामध्ये गेला तर त्याच्या मुलाला 4 हजार रुपये पगारावर कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये अनुकंपातत्वावर नोकरीमध्ये घेतले आणि त्याच्या कुटुंबामध्ये 4 माणसे असतील तर तेवढया पगारात त्याचे घर चालत नाही. तेव्हा अनुकंपा तत्वावर भरती केलेल्या कर्मचा-याला नियमित वेतनश्रेणीचा पगार मिळाला पाहिजे. या बाबतीत महामंडळाने ठराव केलेला असल्याचे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे हा जो ठराव केलेला आहे तो केवळ नवीन नोकर भरतीच्या संदर्भात केलेला आहे आणि त्या ठरावामध्ये अनुकंपा तत्वावरील भरती कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये करावी असा उल्लेख नाही. तसा तो असेल तर त्याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अनुकंपा तत्वावर भरती करताना आपण कनिष्ठ वेतनश्रेणी दिली तरी त्याला किमान वेतन देखील मिळत नाही. म्हणजे ही अनुकंपा तत्वावरील भरती आपण बेकायदेशीररित्या करीत आहात. मग अनुकंपा तत्वावर ज्यांची भरती केली जाईल त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देण्यात येईल काय आणि अनुकंपा तत्वावरील भरती कनिष्ठ वेतनश्रेणीतून वगळून त्या सर्वांना नियमित वेतनश्रेणीमध्ये सेवेत घेण्यात येईल काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सन 2000 मध्ये महामंडळाने ठराव केलेला आहे की, कोणत्याही प्रकारची भरती करताना किंवा अनुकंपा तत्वावर भरती करताना ती कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये करावी. नवीन भरतीमधील कोणत्याही कर्मचा-याला कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये घ्यावे असा ठराव केलेला आहे. जे नवीन कर्मचारी घेणार, मग ते अनुकंपा तत्वावरील असोत किंवा अन्य भरतीमधील असोत, त्यांना नियमित वेतनश्रेणीमध्ये घेणार का असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. आता मान्यताप्राप्त संघटना आणि महामंडळ यांच्यामध्ये करार होत असतो. दर 4 वर्षांनी करार करण्याची पद्धत आहे. दिनांक 31 मार्च 2012ला आधीचा करार संपलेला आहे. 4-6 महिन्यामध्ये पुन्हा करार करीत आहोत. या करारामध्ये कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना किमान वेतन दिले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहिजे अशा प्रकारचा विचार झालेला आहे. कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी 5 वर्षाचा होता तो 3 वर्षाचा करावा असाही विचार माननीय मुख्यमंत्री महोदय करीत आहेत. अशा प्रकारचे सूतोवाच देखील त्यांनी केलेले आहे. कर्मचा-यांना किमान वेतन मिळावे अशी देखील तरतूद करारामध्ये असेल अशा प्रकारचे धोरण पुढच्या काळामध्ये घेणार आहोत.

श्री. रामनाथ मोते : परिवहन महामंडळामध्ये अनुकंपा तत्वावर घेण्यात येणा-या कर्मचा-यांचा हा प्रश्न आहे. अनुकंपा तत्वावर भरती केलेल्या कर्मचा-यांना कनिष्ठ वेतनश्रेणी दिली जाते. या कर्मचा-यांना कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये म्हणजे नेमके कोणत्या वेतनश्रेणीमध्ये घेण्यात येते ? नियमित वेतनश्रेणी कोणती आहे ? अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यामागची भूमिका ही आहे की, त्याचे कुटुंब निराधार झालेले असते आणि त्याला आधार देण्याची आवश्यकता असते. त्याच्या कुटुंबाला जगण्याचा अधिकार प्राप्त व्हावा हा उद्देश असतो. तेव्हा अनुकंपा तत्वावर भरती केलेल्या कर्मचा-याला कनिष्ठ वेतनश्रेणी, ज्याला आपण मानधन म्हणतो ते न देता समान कामाला समान वेतन या कायद्याप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे. या कर्मचा-यांना कनिष्ठ वेतनश्रेणी देण्याचा ठराव झालेला असेल तर मानवतेच्या दृष्टीकोनातून शासन त्याचा फेर विचार करणार आहे काय ?

....नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25535.........

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, कंडक्टर असेल तर त्याला रु.2400-3770 या कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये रु.4221 पर्यंत वेतन दिले जाते. या व्यतिरिक्त वेगवेगळे भत्ते अनुज्ञेय असतात, ते भत्ते देण्याची तरतूद केली आहे. ड्रायव्हर असेल तर त्याला रु.2790-3870 या वेतनश्रेणीमध्ये रु.4820 इतके वेतन देण्याची तरतूद केली आहे. कनिष्ठ वेतनश्रेणीत जे कर्मचारी काम करतात त्यांचा कालावधी कमी करीत आहोत. कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. नवीन अनुकंपा तत्वावरील किंवा नव्याने सेवेत येणारे कर्मचारी असतील त्यांना किमान वेतन मिळाले पाहिजे हा महामंडळाचा हेतू आहे. कमी वेतनावर काम करावे लागू नये या दृष्टीने विचार करुन धोरण करीत आहोत.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, यहां पर मंत्री महोदय ने बताया कि वहां की जो रिकॅग्नाइज्ड यूनियन है, उस यूनियन से जब वे एग्रीमेंट करेंगे तो, उस समय मिनिमम वेजेज देने तथा 5 साल का समय तीन साल करने जैसी सारी बातों का विचवार किया जाएगा. उनके इस विचार का हम स्वागत करते हैं तथा सरकार का हम अभिनंदन करते हैं.

यहां पर माननीय मंत्री महोदय ने बताया 4 साल का एग्रीमेंट 31 मार्च को खत्म हो गया है. मुझे पूछना है कि जब तक यह बाइलेटरल एग्रीमेंट नहीं होता तब तक अनुकंपा के आधार पर नौकरी मिलने पर कोई पाबंदी तो नहीं रहेगी. क्योंकि इस तरह की व्यवस्था दूसरी जगहों पर चालू रहती है. दूसरा प्रश्न मेरा यह है कि अनुकंपा के आधार पर नौकरी पाने वले व्यक्ति की आयु सीमा यदि समाप्त हो रही है तो ऐसे लोगों को आप प्रॉयर्टी के आधार पर नौकरी देंगे या नहीं ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, अनुकंपा नोकरीसाठी जी प्रतिक्षा यादी आहे त्याबाबत एका वर्षात ड्राईव्ह घेऊन लवकरात लवकर संधी देण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी आयुर्मानाचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्या संदर्भात लवकरात लवकर ज्या पदावर नेमणूक देता येईल त्या पदावर संधी देण्याचा प्रयत्न केला जाईल.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, नवीन करार करण्याचा प्रयत्न करीत आहात ही गोष्ट चांगली आहे. परंतु किमान वेतनाचा जो कायदा आहे, त्या नुसार किमान वेतन देण्याचे बंधन असताना किमान वेतन मिळण्यासाठी शासनाबरोबर भांडण करावे लागणे योग्य नाही. अनुकंपा तत्वावरील नियुक्ती असो वा नियमितपणे होणारी नियुक्ती असो, त्या कर्मचाऱ्याला सेवेच्या पहिल्या दिवसापासून किमान वेतन दिले जाईल काय? उत्तरात म्हटले आहे की, 5 वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणीत नेमणूक दिली जाते. त्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत केव्हापासून घेतले जाईल आणि नियमित वेतनश्रेणी केव्हा लागू केली जाईल?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की सहा महिन्याच्या आत कर्मचारी संघटनेशी नवीन करार करीत आहोत. या करारामध्ये कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी कमी करीत आहोत. किमान वेतनाच्या संदर्भात त्यामध्ये तरतूद करीत आहोत. आतापर्यंत 5 वर्षाचा कालावधी कनिष्ठ वेतनश्रेणीसाठी ठेवला होता, हा कालावधी कमी झाला पाहिजे असा विचार निश्चितपणे करीत आहोत. कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये, त्यांना चांगले वेतन मिळाले पाहिजे म्हणून किमान वेतन देण्याची तरतूद करीत आहोत हे मी अगोदरच सांगितले आहे. त्यामुळे हा प्रश्न शिल्लक राहणार नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, करार संपणार आहे. वास्तविक करार संपलेला आहे. पुढील करारात कायद्याप्रमाणे किमान वेतन देत नसाल आणि ही बाब करारामध्ये अंतर्भूत नसेल तर तो करार बेकायदेशीर ठरतो याची मंत्री महोदयांना माहिती नसेल तर त्यांनी माहिती करुन घ्यावी. तो करार बंधनकारक नाही, कारण तो बेकायदेशीर आहे. नवीन करार होईल तेव्हा होईल. जो सेवेत लागलेला कर्मचारी आहे त्या कर्मचाऱ्याला राज्य परिवहन महामंडळ किमान वेतन देणार आहे काय?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, ही बाब न्यायप्रविष्ठ आहे. किमान वेतनाबाबत कर्मचारी संघटनेशी करार करताना निश्चितपणे विचार केला जाईल. ही बाब न्यायप्रविष्ठ असल्यामुळे अधिक स्पष्टतेने सांगणे योग्य होणार नाही.

-----

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाशिक प्रादेशिक कार्यालयातील ट्रॅफीक पार्क व अन्य संलग्न सुविधांच्या बांधकामाबाबत**

**(3) * 25493 श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, ॲड.उषाताई दराडे, श्री.रमेश शेंडगे, श्री.दीपकराव साळुंखे, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1)नाशिक प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे ट्रॅफिक पार्क व अनुज्ञप्ती संकुल बांधकामासाठी नाशिक विकास विभाग पॅकेज अंतर्गत माहे ऑगस्ट, 2009 मध्ये निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(2)असल्यास, नाशिक प्रादेशिक कार्यालयातील ट्रॅफिक पार्क व अन्य संलग्न सुविधांच्या बांधकामाबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) व (3) नियोजन विभागाने सन 2009 मध्ये नाशिक प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मालकीच्या जागेत ट्रॅफिक पार्क,अनुज्ञप्ती संकुल व मुख्य इमारतीचे विस्तारीकरण या नवीन बांधकामाचा नाशिक पॅकेजमध्ये समावेश केला होता. तथापि, या कामासाठी सन 2009 मध्ये निधी उपलब्ध झाला नाही.

सदरहू काम सन 2012-13 या आर्थिक वर्षात करण्याची बाब विचाराधीन आहे.

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, मी प्रथम मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, उत्तरात सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : नाही, या उत्तरात कोणतीही दुरुस्ती करावयाची नाही.

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, मंत्री महोदयांनी दुरुस्ती करावयाची नाही असे सांगितले. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मी विचारलेल्या प्रश्नात सन 2009 मध्ये निधी उपलब्ध करुन दिला होता असे म्हटले आहे, त्याला मंत्री महोदयांनी "नाही" असे उत्तर दिलेले आहे. पण 27 ऑगस्ट, 2009 च्या शासन निर्णयाची प्रत माझ्याकडे आहे. त्यात 58.67 कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असे म्हटले आहे. मग मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरात खोट आहे अथवा शासन निर्णयात खोट आहे किंवा मी समजून घेण्यात कुठे तरी कमी पडतो यापैकी एक काही तरी असावे असे मला वाटते. त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करावे. त्याचबरोबर सन 2012-13 या आर्थिक वर्षात निधीसंबंधीची बाब विचाराधीन आहे असे त्यांनी सांगितले, ही तरतूद शासनाने केलेली आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25493.......

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, नाशिक प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी सन 2009 मध्ये जी तरतूद दाखविलेली होती ती खानदेश विकास पॅकेजमध्ये दाखविली होती परंतु नंतरच्या काळात या पॅकेजचा निधी देण्याचे शासनाने रद्द केलेले आहे त्यामुळे नंतरच्या काळात या पॅकेजमधील काम करता आले नाही म्हणून "नाही" असे उत्तर दिलेले आहे. त्याचबरोबर दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सध्या नाशिक प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाढीव काम किंवा नूतनीकरणाची गरज अशा प्रकारे ज्या ज्या गोष्टी अत्यावश्यक असतील त्यासाठी तरतूद करण्यासंबंधीचा प्रस्ताव पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून सादर करण्यात येईल व या इमारतीत लागणाऱ्या सुविधा देण्याचे काम केले जाईल.

श्री. हेमंत टकले : महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देताना ट्रॅफिक पार्क, अनुज्ञप्ती संकुल व मुख्य इमारतीचे विस्तारीकरण असे तीन भाग समाविष्ट केले आहेत. ट्रॅफिक पार्कचे काम करण्यासाठी खर्च लागेल किंवा ते करण्यासाठी निधीची वाट पहावी लागेल असे मला वाटत नाही. त्यानंतर ट्रॅफिक आणि अपघात यासंबंधीची परिस्थिती लक्षात घेऊन त्याला प्राधान्य दिले पाहिजे व हा निधी खात्याअंतर्गतच निर्माण करुन हे काम कसे लवकर होईल असा होईल काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, या कामासाठी किती खर्च येईल याचा आणि निकड अशा दोन्ही बाबींची तपासणी करुन निर्णय घेतला जाईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : महोदय, या प्रश्नाच्या माध्यमातून मी राज्यातील इतर ठिकाणी असलेल्या प्रादेशिक परिवहन कार्यालयांशी निगडीत असा प्रश्न विचारु इच्छितो. उदा. ताडदेव येथील आर.टी.ओ. कार्यालयाची साधारण 10 एकर जागा असेल पण तरी देखील त्या कार्यालयाच्या इमारतीची अवस्था अत्यंत वाईट आहे. अशा प्रकारे जी कार्यालये असतील त्यांचे नूतनीकरण करणे किंवा चांगल्या प्रकारे उपयोग करणे आवश्यक आहे. अन्यथा एखाद्या बिल्डरची नजर त्या जागेवर पडू शकते. याबाबत शासन निर्णय योग्य असा घेणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : ज्या ज्या ठिकाणी कार्यालयांची दुरुस्ती किंवा वाढ करणे आवश्यक असेल आणि त्यांचे प्रस्ताव आले असतील तर त्यांचा जरुर विचार केला जाईल आणि सध्या जेथे कार्यालय नाही आणि नवीन कार्यालयाची मागणी आली असेल तर विभागाने जो टाईप प्लॅन तयार केला आहे त्यानुसार मान्यता दिली जाईल. अशा प्रकारे काही ठिकाणी काम सुरु केले आहे.

----

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे शहरात जकात विभागातील कर्मचा-यांकडून बनावट पावत्यांद्वारे जकात वसुली करण्यांत येत असल्याबाबत.**

**(४) * २५७२८ श्री.विनायकराव मेटे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात जकात विभागातील कर्मचाऱ्यांकडून बनावट पावत्यांद्वारे जकात वसुली करण्यांत येत असल्याचे माहे मे, २०११ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणारे अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (१) व (२) हे खरे नाही. तथापि, माहे नोव्हेंबर, २०१० मध्ये तपासणीत मे.अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या सिमेंटने भरलेल्या वाहनाच्या चालकाकडील एक पावती बनावट आढळून आल्याने संबंधित वाहन चालक व जकात एंजट यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी अल्ट्राटेक कंपनीकडे अधिक चौकशी केली असता १४७ पावत्या बनावट आढळून आल्याने त्यांच्याकडून १४७ पावत्यांवरील नियमित जकात + १० पट दंडाची म्हणून एकूण रुपये ९०,२१,८५९/- वसूल करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे दिनांक ०२.०२.२०११ रोजी अल्ट्राटेक सिमेंट कंपनीकडून दोन जकात पावत्या तपासणीसाठी महानगरपालिकेच्या जकात विभागाकडे देण्यात आल्या असता सदर दोन्ही पावत्या बनावट असल्याने सदर प्रकरणी दिनांक १९.०२.२०११ रोजी कळवा पोलीस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी तपास व दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही पोलीसामार्फत सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, ठाणे शहरातील जकात विभागात प्रचंड सावळा गोंधळ आहे. जकात नाक्यामध्ये अधिकारी, कर्मचारी तसेच व्यापा-यांचे रॅकेट अनेक वर्षापासून सुरु आहे. यासंदर्भात ऑडीटरांनी ताशेरे सुध्दा मारलेले आहेत असे असतांनाही ठाणे शहरातील जकात विभागामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नाही, त्यामध्ये अधिकारी व कर्मचारी सुध्दा बदलले जात नाहीत. असे असतांनाही ठाणे शहरातील जकात नाक्यावरील सावळा गोंधळ उघडया डोळयाने बघत बसावा लागतो. उत्तरामध्ये केवळ १४७ बोगस पावत्या सापडल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. दुस-या पॅरामध्ये २ पावत्या सापडल्या असे म्हटलेले आहे. जकात विभागातील संबंधितांवर एक वर्षापूर्वी गुन्हे दाखल झाले असतांना सुध्दा आपण संबंधिताविरुध्द दोषारोपपत्र देखील दाखल करु शकलो नाही, त्यांना अटक करु शकलो नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, संबंधितांवर दोषारोप पत्र दाखल करुन अटक करण्यात येणार आहे काय ?

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : २५७२८** ......

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ठाणे शहरातील जकात नाक्याच्या गैरप्रकाराच्या संदर्भात जे दोषी होते त्यांना अटक झाली होती व संबंधितांवर कोर्टामध्ये दोषारोपपत्र २०.३.२०११ रोजी दाखल करण्यात आलेले आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक १ व २ च्या संदर्भात "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यानंतर १४७ केसेस सापडल्या आहेत असेही पुढे म्हटलेले आहे. प्रश्न क्रमांक १ व २ चे "हे खरे नाही" असे उत्तर देण्याची गरज होती काय ? १४७ पावत्या बनावट आढळल्यानंतर ठाणे महानगरपालिकेने यासंदर्भात विभागीय चौकशी केली होती काय, त्यामध्ये किती कर्मचा-यांचा संबंध आला होता अशा प्रकारची काहीही माहिती छापील उत्तरात देण्यात आलेली नाही. त्यामुळे यासंदर्भातील माहिती शासन देईल काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आदरणीय गुजराथी साहेबांचा आदर राखून "हे खरे नाही" असे उत्तर शासनाने का दिले आहे ते सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न असा विचारला आहे की, "ठाणे शहरात जकात विभागातील कर्मचाऱ्यांकडून बनावट पावत्यांद्वारे जकात वसुली करण्यात येत असल्याचे माहे मे, २०११ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला आहे. "कर्मचा-यांकडून बनावट पावत्यांद्वारे" हे उघडकीस आलेले नाही त्यामुळे "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, या प्रकरणाची विभागीय चौकशी करण्यात आली आहे काय तसेच या प्रकरणामध्ये किती कर्मचारी दोषी आहेत असा माझा प्रश्न होता.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, या प्रकरणात कर्मचाऱ्यांचा कोणताही दोष नाही असे आम्ही उत्तरात म्हटले आहे. परंतु या प्रकरणाच्या खोलवर तपासात केल्यानंतर जकात नाक्याच्या कर्मचाऱ्यांशिवाय असे प्रकार घडू शकत नाहीत असे शासनाच्या लक्षात आलेले आहे ही वस्तुस्थिती या ठिकाणी कबूलच करावयास पाहिजे. दि. १६ नोव्हेंबर २०१० रोजी हे प्रकरण उघडकीस आले असून त्या ठिकाणच्या दक्षता पथकाने एक ट्रक चेक नाक्यावरुन पास झाल्यानतर त्या ट्रकची पाहणी केली त्यावेळेस चालकाकडे अगोदरच्या

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : २५७२८** ......

श्री. भास्कर जाधव ....

दिवसाची म्हणजे १५ तारखेची पावती आढळून आली होती. याचा अर्थ १५ तारखेला जी पावती फाडण्यात आली होती त्या जुन्या पावतीवरच जकात नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी सदर ट्रक पास होऊ दिला. याचा अर्थ कर्मचाऱ्यांची हातमिळवणी असल्यशिवाय असे प्रकार होऊच शकणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. जकात नाक्यावर वर्षानुवर्षे जे कर्मचारी-अधिकारी काम करतात त्यांचा कालावधी निश्चित करण्याची आवश्यकता असून या प्रकरणात एकंदर १४९ पावत्या या एकाच कंपनीच्या असल्याच्या उघडकीस आलेल्या आहेत. सदर कंपनीकडून ९०,२१,८५९ रुपये दंड वसूल करण्यात आला असून यामध्ये एजंट आणि कर्मचाऱ्यांची मिलीभगत असल्याशिवाय असे प्रकार घडूच शकत नाही त्यामुळे यासंदर्भात उपाय करण्याची निश्चित गरज आहे असे मला वाटते.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणात जे दोषी कर्मचारी होते त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे काय, अल्ट्राटेक सिमेंट कंपनी ही ठाणे जिल्हयामध्ये आहे की, दुस-या राज्यात आहे, हे सिमेंट कोठून येत होते, बनावट पावत्या कोठे छापल्या होत्या हे पोलिसाच्या तपासात उघड झाले आहे काय ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25728...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये कर्मचाऱ्यांना धरलेले नाही. त्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आलेले नाही. म्हणूनच मी त्यांना जबाबदार धरण्यात यावे असे मघाशी म्हटलेले आहे. हे सिमेंट उरण येथून भरून येते व आम्ही गुजरात राज्यामध्ये जात आहोत, अशा प्रकारचे चलन ते तयार करतात. प्रत्यक्षपणे एक हजार किंवा शंभर रूपयाची एस्कॉर्ट पावती फाडून तो माल ठाणे शहरातच रिकामी करतात., अशा प्रकारचे प्रकरण उघडकीस आलेले आलेले आहे म्हणून त्याची चौकशी करण्यात येत आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, जकात विभागा संबंधी सर्वांच्याच तक्रारी असतात. यातून वरचे अधिकारी सुटतात आणि कुठला तरी कर्मचारी पकडला जातो. शासकीय कर्मचाऱ्यांची दर तीन वर्षाने बदली होते त्याप्रमाणे जकात विभागातील वरचे अधिकारी व कर्मचारी यांना देखील तीन वर्षानंतर बदली करण्यासंबंधीचा नियम लागू करणार आहात काय ? ठाणे जकात विभागातील कर्मचाऱ्यांची तीन वर्षाने बदली झाली आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, तीन वर्षाने बदली झाली आहे काय याची मला माहिती नाही. मला असे वाटते की, जकात नाक्यावर सलग तीन वर्षे कर्मचारी ठेवणे अडचणीचे होऊ शकते. त्यामुळे त्यांचा कार्यकाल कमी करण्याची आवश्यकता आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, गुन्हा दाखल झाला आहे. तेव्हा नेमका कोणता गुन्हा शासनाने दाखल केला आहे व किती जणांना अटक करण्यात आली आहे. हा प्रश्न ठाण्या पुरता मर्यादित नाही. आजच वर्तमान पत्रात मुंबई महानगरपालिकेच्या 6 हजार कोटीच्या करा संबंधातील बातमी आहे. तेव्हा माझी अशी मागणी आहे की, यामध्ये कर्मचारी, अधिकारी आणि पदाधिकारी यांचा समावेश आहे काय, असल्यास, या रॅकेटवर लक्ष ठेवण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पहिला प्रकार दिनांक 16.11.2010 रोजी घडला आहे. यामध्ये श्री.भानुदास महागडे, श्री.अर्शद खान, श्री.अमीन अब्दूल रेहमान, श्री.इरफान शेख, मोहम्मद अली शेख इस्माईल असे एकूण चार आरोपी आहेत. दुसरा प्रकार दिनांक 19.2.2011 रोजी उघडकीस आला आहे. यात श्री.सुनील डोंगरे, श्री.संजू कलगूटकर, श्री.मंगेश पाटील आणि श्री.हितेश भानुशाली हे आरोपी आहेत. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे यावर काही तरी निश्चित अशी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25728...

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सदर प्रकरण वाटते तेवढे सोपे नाही. हे गंभीर प्रकरण आहे. यामध्ये शासनाचा महसूल बुडतो आहे. अवैधरित्या, चुकीच्या रितीने गाड्या पास होत आहेत. उद्या अशा गाड्यांतून चुकीचे काही तरी पास होण्याची शक्यता आहे. जकात नाक्यावरील कर्मचाऱ्यांची बदली शासनाच्या 3 वर्षाच्या बदलीच्या धोरणा नुसार करता कामा नये. त्यांची कालमर्यादा कमी करणे आवश्यक आहे. तेव्हा त्यांच्या बदलीची कालमर्यादा ही एक वर्षाची करण्यात येईल काय ? म्हणजे आपल्याला असे प्रकार कमी करता येतील. ज्या कर्मचाऱ्यांचा यात प्रथमदर्शनी सहभाग दिसतो आहे, त्यांना निलंबित करण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जकात नाक्यावरील कर्मचाऱ्यांचा कालावधी एक वर्षाचा करता येईल किंवा नाही या बाबत तेथील माहिती घेऊनच निर्णय घेण्यात येईल. त्यांचा तेथील कालावधी कमी केला पाहिजे ही गोष्ट निश्चित आहे. जकात नाक्यावरून ट्रक पास होतो आणि दक्षता विभागाला सापडतो. म्हणजे यात तेथील जकात नाक्यावरील कर्मचारी गुंतलेले आहेत हे निश्चित आहे. त्यामुळे याची उच्चस्तरिय चौकशी करून त्यांच्या वर जबाबदारी निश्चित करून कारवाई केली जाईल.

श्री.अरूण गुजराथी : सभापती महोदय, जकात कर रद्द करून पर्यायी कर आणण्याच्या संदर्भात शासन विचार करील काय ? कारण महाराष्ट्रातच महानगरपालिकांमध्ये हा कर आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी प्रश्न विचारला आहे. जकात कर प्रणाली ही कालबाह्य झालेली आहे. देशातील सर्वच राज्यांमध्ये सदर कर प्रणाली काढून टाकण्यात आली आहे. आपल्या नगरपालिकांमधून जकात कर रद्द केलेला आहे. जकातीच्या ऐवजी अकौंट बेस कर प्रणाली आपण आणत आहोत. त्यामुळे "क" वर्ग महानगरपालिकांमध्ये टप्प्याटप्प्याने लोकल बॉडी टॅक्स बसवत आलो आहोत व तेथील जकात कर रद्द केला आहे. मुंबई, पुणे, नागपूर सारख्या मोठ्या महानगरपालिकांसाठी काय करायचे याचे स्पष्ट उत्तर विचारांती अजून तरी सापडलेले नाही. त्या बद्दल शासनाचा विचार सुरू आहे. "अ" व "ब" वर्ग महानगरपालिका सोडल्या तर इतर कुठेही हा कर राहणार नाही.

यानंतर श्री.सरफरे.....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25728....

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

तरीसुध्दा अकाऊंट बेस सिस्टीम आणण्याबाबत आमचे प्रयत्न सुरु आहेत. ज्या ज्या ठिकाणी लोकल बॉडी टॅक्स आणला आहे त्या ठिकाणी सुरुवातीला अडचणी आल्या आहेत. परंतु त्या बाबत व्यापाऱ्यांबरोबर चर्चा करुन त्यामधून मार्ग काढण्यात आलेला आहे. ही पध्दत सर्वोत्कृष्ट नसली तरी जकातीपेक्षा बरी असल्यामुळे राज्य शासनाने लोकल बॉडी टॅक्स सुरु केलेला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी अकाऊंट बेसचा उल्लेख केला. मला आपल्याला एवढेच सांावयाचे आहे की, केंद्रीय बजेट सादर करीत असतांना जीएसटीचा उल्लेख केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केला. सदरचा टॅक्स हा सप्टेंबर-ऑक्टोबरपासून लागू होणार आहे. तो लागू झाल्यानंतर जकात कर रद्द झाला पाहिजे. त्यामुळे जीएसटी लागू झाल्यानंतर आपण जकात कर रद्द करणार काय? तसे केले तर अकाऊंट बेस सिस्टीमची गरज पडणार नाही. त्याबाबत राज्य शासनाचा काय विचार आहे?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, जीएसटी म्हणजे गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स आणण्याचा केंद्र सरकारचा बऱ्याच वर्षापासून प्रयत्न सुरु आहे. परंतु या बाबत काही राज्याच्या अर्थमंत्र्यांबरोबर एकमत झालेले नाही. या बाबत संसदेमध्ये एक विधेयक मांडण्यात आले आहे, ते मंजूर होण्यास आणखी किती कालावधी लागेल याबाबत माननीय केंद्रीय अर्थ अर्थमंत्र्यांनी काही टिप्पणी सादर करुन कालमर्यादा ठरवून दिलेली आहे. राज्यामध्ये जीएसटी आल्यानंतर आपोआप जकात बंद होईल असे नाही. जीएसटीमुळे कर संपादन करणे सुरळीत आणि सुलभ होईल. टॅक्सवर टॅक्स लागणार नाही. त्यामुळे ही पध्दत चांगली असल्यामुळे ती लवकरात लवकर अंमलात आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. काही राज्य सरकारांचे मत वेगळया पध्दतीचे असल्यामुळे यामध्ये एकमत झालेले नाही. त्यामुळे जीएसटी अंमलात आणतांना जकातीबाबत काही ठोस उपाय योजले पाहिजेत असे राज्य सरकारचे मत आहे. या बाबत केंद्र सरकारबरोबर चर्चा करुन त्यामधून स्थानिक स्वराज्य संस्थांना कशाप्रकारे वाटणी देता येईल याबाबत निश्चितपणे विचार करु. परंतु राज्याच्या बजेटच्या दृष्टीने ऑक्ट्रॉय सारखा कर आपल्याला बंद करावा लागेल ते करीत असतांना राज्य सरकार जीएसटीबाबत विचार करुन निर्णय घेईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील वरळी नाका येथील मंडईतून मच्छीविक्रीचा व्यवसाय करणाऱ्या महिलांना पुनर्वसनाच्या नावाखाली हटविण्यात येत असल्याबाबत**

**(५) * २५२८२ श्रीमती विद्या चव्हाण , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , ॲड. उषा दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी नाका येथे असलेल्या मंडईतून मूळ रहिवाशी असलेल्या महिलांना पुनर्वसनाच्या नावाखाली बिल्डर आणि पालिका संगनमताने हटवित असल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वर्षानुवर्षे मच्छीविक्रीचा व्यवसाय करणाऱ्या महिलांना तेथून हटविण्यात येऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्करराव जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१), (२) व (३) हे खरे नाही. वरळी नाका येथील कै.बाळकृष्ण रघुनाथ गावडे मुंबईच्या पुनर्विकासासाठी महानगरपालिकेने दि.२१.७.२००६ रोजी परिशिष्ट-२ दिले. सदर मंडईतील मासळी विक्रेत्यांकडे महानगरपालिकेचे अनुज्ञापत्र नसल्यामुळे त्यांची नावे परिशिष्ट-२ मध्ये अंतर्भूत करण्यात आली नाहीत. दरम्यान महानगरपालिका मंड्यांतील मासळी विक्रेत्यांना अनुज्ञापत्र देण्याबाबत स्थायी समितीने व महानगरपालिकेने ठरावान्वये मंजुरी दिली. त्यानुसार कै.बाळकृष्ण रघुनाथ गावडे मंडईत व्यवसाय करणाऱ्या ८५ मासळी विक्रेत्यांना महानगरपालिकेकडून अनुज्ञापत्र देण्यात आले. महापालिका मंड्यांच्या पुनर्विकासासाठीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पुनर्विकसित नवीन मंडई इमारतीत मंडईच्या अनुज्ञापत्रधारकांना जागा देण्यात येते. मंडई पुनर्विकासाच्या आराखड्यात रेखांकित केल्यानुसार सदर ८५ मासळी विक्रेत्यांना मंडई इमारतीच्या तळमजल्यावर व्यवसायासाठी जागा देण्याचे नियोजित आहे. सदर ८५ अनुज्ञापत्रधारक मासळी विक्रेत्यांव्यतिरिक्त इतर १२ विक्रेत्यांनी अनुज्ञापत्र न दिल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे तक्रार केली असून त्यांच्या तक्रारीबाबत महानगरपालिकेकडून अधिक तपासणी करण्यात येत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २५२८२....

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, हा प्रश्न कालच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये चर्चेला येऊन गेलेला असल्यामुळे आपण पुन्हा तो घेऊ नये अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सदरच्या प्रश्नावर काल प्रश्नोत्तराच्या तासामध्ये चर्चा झाली आहे आणि लक्षवेधी सूचनेवर सुध्दा चर्चा झाली असल्यामुळे मी आता पुढील प्रश्न पुकारतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना रेशनकार्ड तातडीने देणेबाबत**

**(६) * २५७१५ श्री.प्रकाश बिनसाळे , ॲड. उषा दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.अरुण गुजराथी , श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री.**पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा सर्व्हे होऊन सुमारे तीन वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप रेशन कार्ड देण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना रेशनकार्ड तातडीने देणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख** : (१), (२), (३) व (४) नाही.

केंद्र शासनाकडून दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकाधारकांसाठी ६५.३४ लक्ष कुटूंबाचा इष्टांक देण्यात आलेला आहे. सन १९९७ च्या दारिद्रयरेषेखालील कुटुंबांच्या सर्वेक्षणानुसार तसेच वार्षिक रु.१५,०००/- पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना बीपीएल व अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका वितरित करण्यात आलेल्या असून सद्य:परिस्थितीत शासनाकडून ६६.६५ लक्ष म्हणजेच मंजूर इष्टांकापेक्षा जास्त बीपीएलच्या शिधापत्रिका वितरित करण्यात आलेल्या आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात बीपीएल-४८५१७ व अंत्योदय अन्न योजनेच्या २४३८७ मिळून एकूण ७२९०४ एवढ्या दारिद्यरेषेखालील लाभार्थ्यांना पिवळ्या शिधापत्रिकांचा लाभ देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने अन्न सुरक्षा कायदाही प्रस्तावित केलेला असून, राज्यात सध्या दि.२.१०.२०११ पासून सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण सुरु आहे. सदर सर्वेक्षणानंतर, केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांना बीपीएल शिधापत्रिका वितरित करता येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २५७१५....

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, प्र.क्र. (१), (२), (३) व (४) ला उत्तर देतांना "नाही" असे म्हटले आहे. परंतु दोडामार्ग तालुक्यातील बरीचशी माहिती विस्तृत स्वरुपात दिली आहे. दोडामार्ग तालुक्याचा सर्व्हे केल्यानंतर किती रेशनकार्ड आढळले व किती रेशनकार्ड दिले आहेत याबाबत माहिती कां देण्यात आलेली नाही?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, दोडामार्ग तालुक्यात ३ वर्षापूर्वी सर्व्हे झालेला नव्हता तर सन २००२ मध्ये सर्व्हे झाला होता.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, दारिद्रय रेषेची व्याख्या काय आहे, दारिद्रय रेषेखालील लोकांचे उत्पन्न १५ हजार आहे की २१ हजार आहे हे एकदा स्पष्ट करणार काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सुरुवातीला दारिद्रय रेषेची व्याख्या लाभार्थ्यांच्या आर्थिक निकषावर होती. माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस या युतीच्या काळात मंत्री असतांना सर्व्हे झाला होता, त्यावेळी उत्पन्नाची मर्यादा १५ हजार ठेवण्यात आली होती. त्यामध्ये एक चांगली दुरुस्ती करण्यात येऊन आर्थिक निकषाऐवजी आता सामाजिक निकष आणि त्या व्यक्तीचे राहणीमान असे दोन निकष ठरविण्यात आले आहेत. आता महाराष्ट्रातील १८ जिल्ह्यांमध्ये बीपीएलचा सर्व्हे सुरु असून त्यामध्ये जे निकष ठरविण्यात आले आहेत त्यानुसार लाभार्थी व्यक्ती आयकर भरीत असेल तर तिचे बीपीएलच्या यादीमध्ये नाव राहणार नाही, त्याचप्रमाणे त्या व्यक्तीकडे चारचाकी, दोन चाकीचे वाहन असेल तर यादीमध्ये नाव राहणार नाही, त्यांचे मासिक उत्पन्न १० हजारावर असेल तर त्याचे नाव बीपीएलच्या यादीमध्ये राहणार नाही. त्यांच्याकडे तीन खोल्यांचे पक्क्या छताचे व भिंतीचे घर असेल तर ती व्यक्ती राहणार नाही. त्यामुळे पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यांमध्ये हा सर्व्हे सुरु आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25715 . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबतीत सर्व्हे सुरु आहे. गेल्या दोन वर्षापासून आम्ही अधिवेशनामध्ये सदरहू प्रश्न विचारल्यावर माननीय मंत्री महोदय हेच उत्तर देत आहेत. मात्र त्यावर अनेक गोष्टी म्हणजे मेडिकल एड आणि बाकीच्याही इतर गोष्टी अवलंबून आहेत. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा सर्व्हे कधी पूर्ण होणार आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, याबाबत सांगावयाचे तर 18 जिल्ह्यात 73 टक्के सर्व्हेचे काम पूर्ण झालेले आहे आणि याबाबतीत अतिशय चांगल्या पध्दतीने सर्व्हे करण्यात येत असून लोकांचा सुध्दा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आम्ही मुंबईसह उर्वरित 15 जिल्ह्यामध्ये देखील आम्ही बी.पी.एल.च्या संबंधातील सर्व्हे लवकरात लवकर सुरु करणार आहोत.

----

. . . . जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागरी कमाल जमीन धारणा कायद्याबाबत विकासकांना**
**देण्यात आलेल्या नोटीस**

**(7) *25802 श्री.विनोद तावडे,श्री.चंद्रकांत पाटील,श्री.संजय केळकर,श्री.रामनाथ मोते** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागरी कमाल जमीन धारणा खात्यामार्फत नुकत्याच 35 विकासक व जमीन मालकांना नोटीस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मुंबई शहरातील विविध विकासकांकडून नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत 1284 सदनिका अद्यापपर्यंत शासनास प्राप्त होणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, 1284 सदनिका त्वरित शासनास मिळण्याच्या दृष्टीकोनातून तसेच दोषी विकासकां-वर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय. नाजकधा अधिनियमाखालील अतिरिक्त जमिनीवर मंजूर गृहबांधणी योजनांमधून शासनदेय क्षेत्रे प्रत्यार्पित करण्यासाठी संबंधित जमिनधारक / विकासकांना सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई यांनी नोटीस दिल्या आहेत.

(2) बृहन्मुंबई नागरी समूहातील कलम 20 खाली एकूण मंजूर गृहबांधणी योजनांमधून शासनास अद्याप 847 सदनिका प्राप्त होणे बाकी आहे.

(3) अशा सदनिका शासनास प्राप्त होण्याच्या दृष्टीने गृहबांधणी योजनांचे बांधकाम पूर्ण करुन सदनिका प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच शासनदेय असलेल्या सदनिका खुल्या बाजारात विक्री केलेल्या विकासकांविरुध्द फौजदारी कार्यवाही तसेच महसूल थकबाकी म्हणून वसुलीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाला यु.एल.सी.च्या कायद्याअंतर्गत ज्या सदनिका मिळावयास पाहिजेत, त्या मिळालेल्या नाहीत ही गोष्ट शासनाने मान्य केलेली आहे. यु.एल.सी.चा फायदा घ्यावयाचा आणि त्यामधून राज्य शासनाला जे मिळावयास पाहिजे ते न देता राजरोसपणे त्याची लूट करावयाची. त्यानंतर काहीतरी नाममात्र दंड भरावयाचा. सध्या याबाबतीत हिरानंदानी यांचे प्रकरण गाजत आहे आणि हे छोटे-मोठे बिल्डर तसेच आहेत.मला अतिशय स्पेसिफीक प्रश्न विचारावयाचा आहे की, शासनाकडे ज्या सदनिका यावयास हव्या होत्या, त्या आलेल्या नाहीत अशा 23 विकासकांवर आपण फौजदारी कारवाई केली आहे. हे 23 विकासक कोण आहेत आणि त्यांच्यावर कोणती कारवाई झालेली आहे हे देखील मला जाणून घ्यावयाचे आहे हा माझा पहिला मुद्दा आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ज्या सदनिका शासनाकडे आल्या आहेत आणि त्या वितरित करण्यात आल्या आहेत,पण त्याबाबतीत काही निकष होते की,संबंधितांचे मुंबईमध्ये दुसरे घर असता कामा नये तसेच आर्थिक उत्पन्नाची देखील मर्यादा आहे. परंतु ज्यांना या सदनिका ...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

वितरित करण्यात आल्या आहेत ते या निकषामध्ये बसणारे आहेत काय याबाबत शासनाने तपासणी केली आहे काय ? जर तशा प्रकारची तपासणी केली नसेल तर याबाबत शासन काय कारवाई करणार आहे? हा माझा दुसरा प्रश्न आहे.तसेच शासनाला अजून 847 सदनिका प्राप्त व्हावयाच्या आहेत.

सभापती महोरय, माझा तिसरा प्रश्न असा आहे की, या स्किम कधी सुरु झाल्या, त्या कधी पर्यंत पूर्ण व्हावयास हव्या होत्या? म्हणजे संबंधितांना वर्षानुवर्षे हे काम करु द्यावयाचे, त्यांना जेव्हा सदनिका द्यावयाच्या असतील तेव्हा देतील असे आहे काय? कारण जर ते या सदनिकांचे काम पूर्ण करणार नसतील तर सदरहू काम संबंधितांकडून काढून दुसऱ्या व्यक्तींना देण्याबाबत योजना आहे काय ? आज मुंबईमध्ये महाराष्ट्र शासन अनेकांना सदनिका देऊ इच्छिते. मग ते पद्मभूषण पुरस्कार विजेते असतील किंवा खेळामध्ये पुरस्कार मिळविलेले विजेते असतील किंवा गिरणी कामगारांचा विषय असेल. परंतु प्रत्यक्षात या विकासकांनी सर्व फायदे लाटून या सदनिका दाबून ठेवलेल्या आहेत. याबाबतीत राज्य शासन काय करणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, पहिली गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे मी 23 जणांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवावयास तयार आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : यादीतील नावे वाचून दाखविण्यात यावीत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, ही नावे पुढीलप्रमाणे आहेत. 1) श्री.आर.के.शहा 2) श्री.एम.आर.शहा 3) श्री.कोठारी, 4) श्री.शहा, 5) श्री.बिराज 6) श्री.आय.ए.शहा 7) श्री.ए.आर.शहा 8) श्री.एम.ए.शहा 8) श्री.सहाना 9) श्री.एच.आर. सिल्व्हा 10) श्री.मेहता 11) श्री.कोठारी 12) श्री.गोन्साल्व्हीस 13) श्री.ग्रेसी 14) श्री.मारी 15) श्री.सेथ 16) श्री.किणी 17) श्री.तुलसी बा.सदानंद 18) श्री.मेघबाई 19) श्री.नंदन वर्सी 20) श्रीमती भीमाबाई लक्ष्मण पाटील 21) श्री.जवरीभाई विठ्ठल

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी सदरहू यादी सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.सचिन अहिर : ठीक आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मुळामध्येच आपण त्यांना वेळोवेळी म्हणजे 2005 च्या अगोदर परवानगी दिली होती. यामध्ये 70 जणांनी योजनेचे बांधकाम सुरु केलेले असून त्यांनी वेळोवेळी मुदतवाढ घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.दुसरी बाब म्हणजे ज्यांनी बांधकामच सुरु केलेले नाही असे 35 लोक आहेत आणि एकंदरीत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर . . . .

23 जणांच्या विरुध्द 420, 408 आणि 418 या कलमांतर्गत एफ.आय.आर.दाखल केलेला आहे. तसेच या सदनिका आपल्याला मिळण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न सुरु आहेत. एवढेच नाही तर आपण आरआरसी देखील पाठविलेला आहे आणि ज्याला आपण रेव्हीन्यू व्हॅल्यूएशन म्हणतो, ते देखील करुन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वेळप्रसंगी जप्ती आणून ही वसूली करावी असा आपला प्रयत्न सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर 2005 पासून हे प्रकल्प सुरु आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25802......

श्री.सचिन अहिर.....

त्याचा नियमित पाठपुरावा सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे तो वेगळा असला तरी त्या बाबत सांगू इच्छितो की, शासनाने आपल्या डिस्क्रीएशन पॉवरचा वापर करुन वेळोवेळी 2 टक्के, 5 टक्के व 10 टक्के कोट्यातून सदनिका वितरित केलेल्या आहेत. त्या बाबतीत नवीन धोरण शासन स्तरावर आणण्याचे अभिप्रेत होते. या संदर्भात तीन सदस्यांची एक सचिव समिती नेमून येणाऱ्या काळामध्ये कशा प्रकारे वितरण करावे, या संदर्भातील धोरण जाहीर करुन ते कोर्टाला देण्यात आलेले आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, संबंधितांवर एफआरआय केव्हा दाखल करण्यात आला आणि त्यांच्यावर कारवाई झालेली आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन 2005 मध्ये भादंसं कलम 420, 406, 418 अन्वये एफआरआय दाखल करण्यात आलेला आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि मी ब्रिफींग घेतले. सन 2005 मध्ये एफआरआय दाखल करुन सुध्दा विकासकांवर कारवाई का झाली नाही हा देखील प्रश्न आहे. या बाबत माननीय मुख्यमंत्री सभागृहाला अवगत करतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 23 विकासकांवर एफआरआय दाखल झाल्यानंतर सुध्दा त्याचे डेव्हलपमेंट प्लान मंजूर झाले हे खरे आहे काय ? या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्या प्रमाणे पत्रकार, स्वातंत्र्य सैनिक व इतरांना या सदनिकांचे वाटप करण्यात आले. परंतु त्यातील काही जणांनी एकाच नावावर तीन तीन सदनिका घेतल्या त्यांच्यावर काय कारवाई करणार ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला जोडून माझा प्रश्न आहे. उत्तरात नमूद केलेले आहे की, सदनिका खुल्या बाजारात विकल्या गेल्या. खुल्या बाजारात सदनिका विकल्या जातात याचा अर्थ अधिकारी आणि विकासक यांच्यामध्ये संगनमत असल्याशिवाय असे होऊ शकत नाही. मागे देखील अशा एका प्रश्नासंबंधी आपणच उत्तर दिले होते. त्यावेळी आपण जाहीर केले होते की, संबंधितांवर कारवाई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25802......

श्री.भाई जगताप...

होईल, परंतु अद्यापपर्यंत कारवाई झालेली नाही. सन 2005 मध्ये विकासकांवर एफआरआय दाखल करण्यात आला. आता 2012 वर्ष सुरु आहे. परंतु इतक्या कालावधीत विकासकांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. या प्रकरणामध्ये अधिकारी देखील गुंतलेले आहेत. त्यांच्या संगनमताने खुल्या बाजारामध्ये सदनिका विकल्या गेल्या. तेव्हा अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करणार काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, आम्ही या प्रश्ना संबंधी अधिकाऱ्यांकडून डिटेल ब्रिफींग घेतले. आता पर्यंत जी कार्यवाही झाली ती पाहिली तर यामध्ये निश्चित काही अपहार झ ालेला आहे हे स्पष्ट झालेले आहे. कलम 20 खाली गृहनिर्माण योजना मंजूर केल्या जातात. त्यातील काही सदनिका शासनाला देय असतात. परंतु त्या खुल्या बाजारात विकल्या गेल्या हे लक्षात आले. सन 2004, 2005, व 2006 मध्ये संबंधितांवर एफआरआय दाखल करण्यात आले हे येथे माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत प्र.पाटील व भाई जगताप यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांचे संगनमत असल्या शिवाय हे घडलेले नाही हे स्पष्ट झालेले आहे. या प्रकरणी कामात उशीर, दिरंगाई व कुचराई झालेली आहे एवढे निश्चित. तेव्हा या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्याचा मी आदेश देत आहे. या आदेशामध्ये खालील चार गोष्टींचा विचार केला जाईल.

पहिली गोष्ट 23 गृहनिर्माण योजनांमध्ये अपर जिल्हाधिकारी यांचे "ना हरकत प्रमाणपत्र" न घेता बृहन्मुंबई महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे काय, असल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर दोष निश्चित करणे.

दुसरी गोष्ट अपर जिल्हाधिकारी यांनी संबंधित विकासक, योजना धारक यांच्या विरुध्द एफआरआय दाखल केला तरी त्या बाबतचा पाठपुरावा त्यांच्याकडून करण्यात आला किंवा नाही तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे आरआरसी पाठविल्यानंतर त्या बाबतचा पाठपुरावा अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून झाला की नाही,

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ D/ ST/ KTG/ प्रथम श्री. अ.शिगम..... 11:55

ता.प्र.क्र. 25802. ..

श्री. पृथ्वीराज चव्हाण.....

नसल्यास त्या बद्दल दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर दोष निश्चित करण्यात येईल.

3) कलम 20 खाली मंजूर केलेल्या गृहनिर्माण योजनामधून शासन देय आवश्यक सदनिका मिळण्यासाठी उपाययोजना करणे

4) आर.आर.सी. वसूल करण्यासाठी योजना धारकांच्या इतर मालमत्ता जप्त करण्याबाबत कारवाई करणे. अशा चार गोष्टींसाठी समिती नेमण्यात आलेली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 23 विकासकांची कामे सुरळीत सुरु आहेत. या विकासकांवर फौजदारी कारवाई सुरु असली तरी त्यांची कामे राजरोसपणे सुरु आहेत त्याबाबतीत चौकशी करण्यात येईल का?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : त्याबद्दलही चौकशी करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन नक्की करु इच्छितो. परंतु उर्वरित सदनिका प्राप्त झाल्या नाहीत, त्या किती काळात प्राप्त झाल्या पाहिजेत याबाबतीत टाईम बाऊण्ड प्रोग्राम घालून दिला तर बरे होईल. या सदनिकांच्या बाबतीत जनतेमध्ये खूप असंतोष आहे. ज्या राजकीय नेत्यांची किंवा सनदी अधिकाऱ्यांची मुंबई किंवा ठाण्यामध्ये एकापेक्षा अधिक घरे आहेत मग ती त्यांच्या स्वत:च्या नावाने असतील, त्यांच्या पत्नीच्या नावाने असतील किंवा मुलांच्या नावाने असतील, राजकीय कार्यकर्ता आमच्या पक्षाचा असो किंवा दुसऱ्या कोणत्याही पक्षाचा असो, जर त्यांच्याकडे अशी दुसरी सदनिका असेल तर शासनाने ती ताब्यात घेतली पाहिजे असे मला वाटते. मग ती महसूल खात्याची असेल, म्हाडाची असेल किंवा कलेक्टरची असेल शासकीय कोटयातून ज्यांना एकापेक्षा अधिक सदनिका मिळालेल्या आहेत त्याबद्दल जनतेच्या मनात प्रचंड असंतोष आहे. राजकीय व्यवस्थेवरील विश्वास वाढविण्यासाठी ही कृती केली पाहिजे असे मला मनापासून वाटते. एका सदनिकेची गरज आहे हे मी समजतो. ती जशी शासकीय अधिकाऱ्यांची गरज आहे तशीच राजकीय नेत्यांची देखील गरज आहे. परंतु एकापेक्षा अधिक सदनिका घेतल्या असतील तर त्या राज्य शासन ताब्यात घेऊन गरजूंसाठी वितरित करणार आहे का?

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25802...

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी दोन मुद्दे उपस्थित झालेले आहेत. अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करावयास सांगितली आहे. या चौकशीचा अहवाल दोन महिन्यात सादर करावा असे त्यामध्ये नमूद केले जाईल. त्याच बरोबर सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दुसरा एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, अनेक सनदी अधिकाऱ्यांनी आणि कदाचित राजकीय नेत्यांनी देखील एकापेक्षा अधिक सदनिका मुंबईमध्ये किंवा महाराष्ट्रामध्ये घेतलेल्या आहेत. कायद्यामध्ये आणि नियमामध्ये पळवाट आहे त्यामुळे या संदर्भात तातडीने कार्यवाही करण्या ऐवजी आदर्श गृहनिर्माण सोसायटीच्या प्रकरणी जी न्यायालयीन चौकशी प्रस्तुत केलेली आहे, त्यांना जवळ जवळ 13 टर्म्स ऑफ रेफरन्सेस दिलेले आहेत आणि पुढचे मार्गदर्शन करण्यासाठी विनंती केलेली आहे. मला असे वाटते की, न्यायालयीन चौकशीचा अहवाल अपेक्षित आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी मुद्दाम एक न्यायाधीश आणि ज्यांना प्रशासनाची माहिती आहे अशा एका माजी मुख्य सचिवांची नियुक्ती केलेली आहे. त्यांना 13 टर्म्स ऑफ रेफरन्सेस दिलेले आहेत व पुढचे विस्तृत मार्गदर्शन करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. मला असे वाटते की, आदर्श गृहनिर्माण सोसायटीच्या चौकशीचा अहवाल आल्यानंतर या संदर्भात पुढील कार्यवाही करता येईल परंतु ही कार्यवाही करणे गरजेचे आहे हे मी मान्य करतो.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सांगली जिल्ह्यामध्ये बोगस शिधापत्रिकांचे वाटप केल्याबाबत**

**(८) * २५०५२ श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.नागो पुंडलिक गाणार , डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री.**पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यामध्ये गेल्या वर्षभरात बोगस शिधापत्रिकेची शोध मोहीम राबवूनही रेशनिंगवरील गहू, तांदूळ खुल्याबाजारात विक्री केल्याच्या घटना माहे डिसेंबर, २०११ च्या तिसऱ्या आठवड्यात घडल्याचे निदर्शनास आले आह, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख** : (१) दिनांक १३ डिसेंबर, २०११ रोजी सुमारे रुपये १५,०००/- किंमतीचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील सुमारे ९.५० क्विंटल गहू टेम्पोने वाहतूक केला जात असतांना पोलिसांनी पकडला आहे.

(२) सदर गहू रास्त भाव दुकानाचा असल्याचे आढळून आले.

संबंधितांना अटक करुन त्यांच्या विरुध्द सांगली शहर पोलीस ठाणे भाग ६ गु.र.नं. ६२/११ अन्वये दिनांक १३ डिसेंबर, २०११ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर आरोपीची जामिनावर सुटका करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस यंत्रणेकडून सुरु आहे.

सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने केलेल्या तपासणीत दोषी आढळून आलेल्या २ रास्तभाव दुकान परवान्यांची संपूर्ण रक्कम जप्त करुन परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात असे म्हटले आहे की," दिनांक १३ डिसेंबर, २०११ रोजी सुमारे रुपये १५,०००/- किंमतीचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील सुमारे ९.५० क्विंटल गहू टेम्पोने वाहतूक केला जात असताना पोलिसांनी पकडला आहे." परंतु या उत्तरामध्ये मूळ मुद्दा बाजूला राहिलेला आहे. सांगली जिल्हयामध्ये बोगस शिधापत्रिकांची शोध मोहीम राबविल्यावर सुध्दा काही शिधापत्रिका दुकानातील गहू,तांदूळ खुल्या बाजारात विक्री केल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भात किती लोकांवर गुन्हा दाखल झालेला आहे आणि त्यामध्ये कोणकोण व्यक्ती आहेत तसेच ज्यांनी बोगस शिधापत्रिकांना संरक्षण दिले आहे त्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार आहे का?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बोगस शिधापत्रिकेची शोध मोहीम असे म्हटलेले आहे. त्या बोगस शिधापत्रिका नसून अपात्र शिधापत्रिका आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25052 .... श्री. अनिल देशमुख...

त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न सांगलीच्या संदर्भात होता. त्या बाबतीत जो ट्रक ड्रायव्हर होता त्याला अटक केलेली आहे. पाटील ग्राहक भंडारचे सेल्समन आणि नोकर यांना अटक केलेली आहे. पाटील ग्राहक भंडारचे जे मॅनेजर आहेत त्यांना सुध्दा अटक करणे गरजेचे आहे. पोलीस स्टेशन सांगली यांना सांगून त्यांना सुध्दा अटक करण्याबाबत आदेश देण्यात येतील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपला असला तरी अपात्रच्या नावाखाली काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांना माननीय मंत्र्यांच्या नकळत असेल पण त्यांना संरक्षण मिळते एवढेच मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

**सभापती** : या बाबतीत आपण मला पत्र लिहावे.

श्री. विनोद तावडे : ठीक आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे सकाळी 9 वाजून 47 मिनिटांनी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, परशुराम उपरकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री चंद्रकांत पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. दिनांक 3 एप्रिल, 2012 रोजी पुणे शहरातील कोथरुड परिसरातील डहाणूकर कॉलनीतील एका सोसायटीमध्ये स्थानिक पोलीसच मोटारसायकल चोरांसकट उचलून नेताना सोसायटीच्या सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाल्याची घटना घडणे, पिंपरी परिसरात दिघी येथे शुभम महादेव शिर्के याची 50 हजारांच्या खंडणीसाठी दोन अल्पवयीन मुलांबरोबर एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलेली निर्घृण हत्या, अल्पवयीन आरोपीच्या वयाचा निकष बदलण्याचा प्रस्ताव अजूनही पडून असणे, पुणे शहरात पिटा कार्यक्षेत्रांतर्गत अटक केलेल्या कल्याणी देशपांडे हिच्या पोलीस कोठडीत वाढ न करण्यासाठी 40 हजार रुपयांची लाच घेणाऱ्या हिंजवडी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकासह दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक 31 मार्च, 2012 रोजी अटक करण्यात येणे अशा वेगवेगळ्या घटना या प्रस्तावाच्या सूचनेमध्ये सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेल्या आहेत. हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा होतो याबाबत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दोन मिनिटात आपले म्हणणे मांडावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 29.3.2012 ला मुंबई उच्च न्यायालयाने परत एकदा पोलीस कस्टडीत मृत्यू झाल्यावर 'हे पुण्यातील खडक पोलीस स्टेशन की शवागार' असे ताशेरे आताच अधिवेशनाच्या आधी ओढलेले आहेत. परवाच शुभम शिर्केचा खंडणीसाठी झालेल्या मृत्यूच्या घटनेतील गांभीर्य सभागृहामध्ये समोर आलेले आहे. अशा वेळी काल कोथरुड परिसरामध्ये एक मोटारसायकल चोरीला गेली अशी तक्रार जेव्हा देशमुख नावाच्या रहिवाशाने केली त्यानंतर जे सीसीटीव्ही फुटेज पाहिले आणि सगळीकडे ते दाखविले जात होते, त्याची छायाचित्रे सर्व वर्तमानपत्रात आलेली आहेत, त्यावरुन असे निदर्शनास आले की, स्वत: पोलिसांच्या वेशात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ D/ ST/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

असणारा एक अधिकारी आणि तो चोर हे दोघे मोटारसायकल घेऊन गेलेले आहेत. अजूनही त्या व्यक्तीला त्याची मोटारसायकल मिळालेली नाही. पण सीसीटीव्ही फुटेजमध्ये पोलीस अधिकारी मोटार सायकल चोरुन नेतो असे दिसल्यावर अजूनही त्या व्यक्तीला मोटारसायकल मिळालेली नाही तसेच काय कारवाई झाली याचीही कल्पना नाही. गेल्या दोन तीन महिन्यांतील जवळजवळ 10 वेगवेगळ्या महत्वाच्या घटना मी या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या आहेत. यामध्ये सौ. कोंकणा अधिकारी व तिचा बालकाचा संशयास्पद मृत्यू झाला. फेऱ्या मारुनमारुन तिचे सगळे नातेवाईक दमलेले आहेत पण अजून देखील कलम 498 (अ) सारखा गुन्हा दाखल केला जात नाही.

नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना देण्याचे दुसरे कारण असे की, संपूर्ण जिल्ह्यांचा क्राईम रेट पाहिला तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा सरासरी क्राईम रेट साधारणपणे 18.28 असा आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

पुणे शहर व ग्रामीण यामध्ये पुणे शहराचा क्राईमच्या बाबतीत अकरावा क्रमांक आहे आणि त्याचा क्राईम रेट 23.51 टक्के असा आहे. आज पुणे शहरामध्ये घडत असलेल्या गुन्ह्यांची संख्या विचारात घेतली आणि मुंबईपेक्षा पुणे शहराची लोकसंख्या कमी असली तरी पुणे शहर आयुक्तालयाच्या क्षेत्रातील क्राईम रेट मुंबईच्या खालोखाल आहे. या गुन्ह्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण केवळ 3 ते 4 टक्के इतके आहे. कोर्टामध्ये झालेला गोळीबार असो किंवा ससून हॉस्पिटलमधून पळून गेलेले आरोपी असोत, आज पुणे शहरामध्ये पिंपरी-चिंचवडमध्ये पोलिसांचे अस्तित्वच जाणवत नाही. हे अधिवेशन संपण्यासाठी आणखी दोन आठवडे शिल्लक आहेत. अत्यंत गांभीर्यपूर्वक आणि न्यायाच्या अपेक्षेने आम्ही हा विषय मांडलेला आहे. पुणे शहर व ग्रामीण भागात घडत असलेल्या गुन्ह्यांबाबत शासनाने चर्चा करण्याची आम्हाला संधी द्यावी. जेणे करुन शासनाकडून कोणती उपाययोजना केली जाईल याची माहिती सर्व जनतेला होऊ शकेल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडलेली नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना कशी योग्य आहे ते मी थोडक्यात सांगणार आहे. सातारा जिल्ह्यामध्ये सर्व वर्तमानपत्रात छापून आलेल्या बातमीमुळे पोलीस दलाला आपली मान शरमेने खाली घालण्याची वेळ आलेली आहे. सातारा जिल्ह्यामधील एका छोट्या गावात राहणाऱ्या एका मुलीला एक तरुण त्रास देत असल्याची तक्रार त्या तरुणीने पोलीस स्टेशनमध्ये केली होती. पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकाऱ्याने तिची तक्रार सॉर्ट आऊट केली. पण पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्टरच त्या मुलीच्या मागे लागले आहेत. या दोघांमधील रेकॉर्ड झालेला संवाद डीएसपींना सादर केलेला आहे. डीएसपींनी याबाबत कारवाई करतो असे म्हटलेले आहे.

दोन वर्षापूर्वी कोल्हापूरच्या पोलिसांनी महिला पोलिसांचे लैंगिक शोषण केल्याचे प्रकरण उघडकीस आले होते. त्या प्रकरणाचा अहवाल शासन सभागृहाला सादर करु शकलेले नाही. पोलिसच रक्षकाऐवजी भक्षकाच्या भूमिकेत आहेत, अशी सर्व प्रकरणे राज्यात दिसून येत आहेत. त्यामुळे आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा करण्यास आपण मान्यता द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यामधील गुन्हेगारीची परिस्थिती भयानक झाली असल्यामुळे आम्ही नाही तर आपल्यालाच नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव आणावा लागतो की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. काल वृत्त वाहिन्यांवरुन आपण सगळयांनी पाहिले असेल की, पोलीस अधिकारी स्वत: मोटर सायकल घेऊन जात होते. त्यांनी नेलेली मोटर सायकल आता मिळत नाही असे त्यांनी स्वत: सांगितले आहे. पुणे व नाशिक शहरामध्ये मोटर सायकल जाळण्याचे प्रकार सुरु झालेले आहेत. नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेमध्ये नमूद केलेले विषय मग पोलिसांच्या अत्याचाराचा विषय असेल, रोख रक्कम पळविण्याचा असेल, दागिने चोरी करण्याचा विषय असेल, खूनाचे विषय असतील, हे सर्व गुन्हे सुरु आहेच. परंतु सकाळी वर्तमानपत्र उघडल्यानंतर लोकांना काय वाचावयास मिळते ?

गँगवॉर रस्त्यावर आपण पाहतो. पण मंत्रिमंडळातील गँगवॉरची बातमी लोकांना वाचावयास मिळत आहे. सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे तत्कालीन गृह मंत्र्यांवर आरोप करीत आहेत. त्यांनी केलेले आरोप गंभीर स्वरुपाचे असतील आणि लोकांना ते वाचावयास मिळत असतील तर नियम 289 अन्वये उपस्थित केलेल्या विषयावर अत्यंत तातडीने चर्चा केली पाहिजे. सध्या अधिवेशन सुरु असल्यामुळे बाहेर लोक आम्हाला विचारतात की, विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहात काय करीत आहेत, सरकार आमची मुस्कटदाबी करीत आहे असे आम्ही त्यांना सांगावयाचे काय ? आमची मुस्कटदाबी करण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. विद्यमान व तत्कालीन माननीय गृह मंत्र्यांच्या गँगवॉरसंबंधीचा विषय आम्हाला सभागृहात मांडावयाचा आहे. आम्हाला त्याबाबतची वस्तुस्थिती ऐकून घेण्याची इच्छा आहे. पोलिसांकडून गुन्हेगारांना पकडले जात नाही, राज्यातील गुन्हे थांबणार आहेत की नाही हे सभागृहाच्या माध्यमातून जनतेला समजणे आवश्यक आहे. सभापती महोदय, या विषयाचे गांभीर्य आपल्या लक्षात आलेले आहे. त्यामुळे सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करण्यासाठी आपण मान्यता द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो. प्रश्नोत्तराचा तास पूर्ण झालेला आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा करण्यासाठी आपण सरकारला भाग पाडावे. माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत आणि माननीय गृह मंत्री सुध्दा चर्चा सुरु झाल्यावर उपस्थित होतील. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ही चर्चा महत्वाची आहे. आपल्या माध्यमातून जनतेलाही संरक्षण मिळावे अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना आलेली आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे असे माझेही मत झालेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेल्या भावना सुध्दा महत्वाच्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी सातारा जिल्ह्यातील पोलिसांचे एक उदाहरण सांगितले आहे. हे उदाहरण देखील अत्यंत गंभीर आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था इतकी खिळखिळी झाली असेल तर ते बरोबर नाही.

आजच्या कामकाजामध्ये या विषयासंबंधीचा कोणताही विषय नसल्यामुळे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या चर्चेला लगेच मंजुरी देणे मला शक्य होणार नाही. परंतु मी माननीय गृह मंत्र्यांना सूचना करीत आहे. कायदा व सुव्यवस्था या विषयावर एक तासाच्या चर्चेला मान्यता देण्याचा मी प्रयत्न करीन. परंतु ही चर्चा आज लगेच आपल्याला सुरु करता येणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण जनतेच्या भावनांची दखल घेतली त्या बद्दल मी आपले आभार मानतो. ही अत्यंत महत्वाची बाब असल्यामुळे यावर तातडीने चर्चा व्हावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : या विषयावर तातडीने चर्चा होईल या दृष्टीने माझे प्रयत्न आहेत.

डॉ. नीलम गो-हे : पुढील आठवड्यात लवकरात लवकर चर्चा घ्यावी.

**सभापती** : मी या बाबतचा निर्णय दिलेला आहे.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

**सभापती** : मी आज 12-13 औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी देणार आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा आणि खोट्या सहयासंबंधीचा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, खोट्या सह्यांच्या संदर्भातील ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. आज ती माझ्या निदर्शनास आली म्हणून मी ती तातडीने या ठिकाणी औचित्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे. त्या दिवशी सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे आणि सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी खोट्या सह्या करुन काय उद्योग केले जातात हे आपल्या निदर्शनास आणून दिले होते आणि त्यासंदर्भात सीआयडी चौकशीचे आदेश आपण दिलेले आहेत. सभापती महोदय, माझ्या नावाने तसेच सन्माननीय सदस्य श्री. मनिष जैन आणि सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांच्या सहीने अर्धातास चर्चा मागितलेली आहे. मी आपणास धन्यवाद देतो की, आपल्या कार्यालयाने ही चर्चा नाकारलेली आहे. सभापती महोदय, एवढ्यावरच हे प्रकरण थांबलेले नाही तर भिवंडीमधील डाईंग कंपनीच्या विरोधात ही अर्धा-तास चर्चा माझ्या तसेच सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन आणि सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांच्या सहीने मागितली.

प्रोसिजर प्रमाणे प्रदूषण नियंत्रण मंडळाला नोटीस गेली. प्रदूषण नियंत्रण मंडळाने ती कंपनी बंद केली आणि त्याबाबतीत ब्लॅक मेलिंग सुरु झाले. 200 कामगार असलेली ती कंपनी या घडीला बंद पडलेली आहे. सभापती महोदय, मी कधीही इंग्रजीमध्ये सही करीत नाही. मी मराठी सही करतो, इंग्रजी पत्रावर देखील मी मराठी सही करतो. या अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर माझी इंग्रजी सही करण्यात आली. माझे असे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्यांच्या सह्या आपल्या कार्यालयात ओळखल्या जातात. तेव्हा अशा गोष्टी तत्काळ नाकारल्या गेल्या पाहिजेत आणि त्या कोणी आणून दिल्या याची चौकशी झाली पाहिजे. ही अतिशय गंभीर घटना आहे. यामध्ये तीन घटना झालेल्या आहेत. एक म्हणजे खोट्या सहीचा प्रकार येथपर्यन्त पोहोचलेला आहे. माझ्या बाबतीत हा प्रकार घडला म्हणून तो मी येथे मांडत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:10

श्री. कपिल पाटील...

दुसरे म्हणजे या अर्धा-तास सूचनेचा आधार घेऊन ब्लॅकमेलिंग करुन वसुली केली जात आहे आणि तिस-या बाजूला कामगारांवर बेकारीचे संकट कोसळलेले आहे. हे मोठे रॅकेट आहे असे दिसते. या प्रकाराची चौकशी झाली पाहिजे आणि बंद पडलेली कंपनी तत्काळ सुरु केली पाहिजे. आज त्या कंपनीतील कामगार देशोधडीला लागलेले आहेत. काही लोक माझ्याकडे आले म्हणून ही गोष्ट मला कळली, मी त्यांना सांगितले की मला कागद दाखवा, कारण असे विषय मी कधी मांडत नाही. त्यांनी कागद दाखविल्यानंतर ती सही माझी नसल्याचे माझ्या लक्षात आले. ती इंग्रजी सही आहे. मी कधीही इंग्रजी सही करीत नाही. इतका धादांत खोटेपणा चालत असेल तर त्याची शासकीय पातळीवर देखील गंभीर दखल घेतली गेली पाहिजे.

**सभापती** : विधिमंडळाकडूनही अशा पध्दतीची सूचना नाकारण्यात आलेली आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. मी यापूर्वीही सदनात सांगितलेले आहे की असे किमान 25-30 प्रकार झालेले आहेत. या प्रकाराची कोणत्या पध्दतीने चौकशी करावी या अनुषंगाने मी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचा देखील सल्ला घेणार आहे आणि त्यासाठी मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलावणार आहे. त्यांच्या सल्ल्यासहीत अत्यंत कठोर पध्दतीने मी याचा पाठपुरावा करणार आहे.

श्री. कपिल पाटील : नोटीस मागे घेतली गेली पाहिजे.

**सभापती** : या बाबत जे जे करणे आवश्यक आहे ते सर्व मी करणार आहे. जी फॅक्टरी अशा पध्दतीच्या एका प्रकारामुळे बंद पडलेली आहे ती कशी सुरु होईल या दृष्टीने देखील आपण मदत करु.

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासकीय विधेयकासंबंधी**

श्री. हर्षवर्धन पाटील : आजच्या कामकाजपत्रिकेवर दोन शासकीय विधेयके दाखविण्यात आलेली आहेत. ही दोन्ही विधेयके सभागृहाने आज मंजूर करावीत अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही विधयके चर्चेला घ्यावीत अशी माननीय मंत्री महोदय विनंती करु शकतात. विधेयके मंजूर करावीत असे ते कसे काय सांगू शकतात ?

....नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, दोन विधेयके कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आली आहेत. शासनाच्या वतीने या विधेयकांवर माननीय सदस्यांनी चर्चा करुन ही विधेयके मंजूर करावीत अशी मी विनंती करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा अधिवेशनाचा तिसरा आठवडा आहे. आज या आठवड्याच्या कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. माननीय सदस्यांना त्यांच्या मतदारसंघात जाण्याच्या दृष्टीने सायंकाळी सभागृहाची बैठक लवकर संपली पाहिजे. अशी विनंती आम्ही अनेकदा केलेली आहे. संसदीय कार्यमंत्री काय करतात? आठवड्याच्या शेवटच्या दिवशी कामकाजामध्ये दोन-दोन विधेयके दाखवून ती संमत करावीत अशी विनंती करण्यात येते.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, संसदीय कार्यमंत्री काय करतात? दोन विधेयके आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविली आहेत ती मंजूर करावीत एवढीच आम्ही विनंती करीत आहोत.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी या अनुषंगाने महत्वाची बाब निदर्शनास आणली आहे. सभागृहाच्या कामकाज पत्रिकेवर असणाऱ्या कामकाजाव्यतिरिक्त कोणतेही कामकाज घ्यायचे नाही असा निर्णय आपण कटाक्षाने घेतला तर सगळे व्यवस्थित होईल. ज्या वेळी अत्यंत महत्वाच्या बाबी सभागृहापुढे उपस्थित होतात त्या वेळी सदनाच्या भावना लक्षात घेता एखादी महत्वाची बाब चर्चेकरिता स्वीकारणे हे देखील सभापतींचे काम आहे. म्हणून माझी अशी अपेक्षा आहे की, महत्वाच्या ज्या बाबी आहेत त्या त्या वेळेप्रमाणे स्वीकारुन जास्तीत जास्त कामकाज कसे होईल या दृष्टीने आपण सर्वांनी सहकार्य करावे. आजचा वार शुक्रवार नाही. परंतु आठवड्यातील कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत दोन्ही विधेयकांसहित कामकाज संपविण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करु.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (जलसंपदा राज्यमंत्री {कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून}) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने वर्ष 2012-2013 चे वार्षिक नियोजन आणि सन 2011-12 मधील वितरित तरतूद व जानेवारी, 2012 अखेर झालेल्या खर्चाबाबतचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने खर्चाबाबतचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे

श्री.एस.क्यू.जमा़ (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे सहासष्टावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : आश्वासन समितीचा एकशे सहासष्टावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, संसदीय कार्यपध्दतीमध्ये आपण ज्या प्रणालींचा अवलंब केला आहे त्यातील लोकशाहीची ही एक चांगली प्रणाली आहे आणि ती गौरवशाली आहे. माननीय सदस्यांना सन्मान देणारी आहे. माननीय सदस्य सभागृहात प्रश्न विचारतात, त्या प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्री महोदय सर्वज्ञ नसतात, परंतु अधिकारी त्यांना चिठ्ठीच्या माध्यमातून काय उत्तर द्यावे हे लिहून देतात आणि मंत्री महोदयांकडून सभागृहात आश्वासन दिले जाते. तो लोकशाहीचा सन्मान असतो. आम्ही गृहित धरतो की, मंत्री महोदयांनी जे आश्वासन दिले आहे त्याला अनुसरुन योग्य ती माहिती माननीय सदस्यांना मिळेल.

सभापती महोदय, सभागृहात देण्यात आलेली आश्वासने आश्वासन समितीपुढे छाननी करण्यासाठी पाठविली जातात. त्या समितीपुढे विभागीय सचिवांना साक्षीसाठी बोलावले जाते. मंत्री महोदयांनी जरी सभागृहात आश्वासन दिलेले असले तरी त्याची अंमलबजावणी संबंधित विभागाच्या प्रशासनाने करावयाची असते. आश्वासनांची पूर्तता करणे ही वैयक्तिकरित्या मंत्री महोदयांची जबाबदारी नसते. सचिवांच्या माध्यमातून आश्वासन समितीपुढे जाबजबाब, साक्षीपुरावे नोंदविले जातात. आमच्या असे लक्षात आले आहे की, अनेक वर्षापासूनची आश्वासने समितीपुढे प्रलंबित आहेत. एकदा सभागृहात आश्वासन दिल्यानंतर त्याची पूर्तता पुढील दोन अधिवेशनापर्यंत झाली पाहिजे. अगदीच कठीण विषय असेल तर एका वर्षामध्ये पूर्तता व्हावी अशी अपेक्षा आहे. परंतु कितीतरी आश्वासने वर्षानुवर्षे समितीपुढे प्रलंबित आहेत. सचिवांच्या साक्षी घेण्यासाठी वेळ लागतो. या सदनाच्या माध्यमातून लोकशाहीची परंपरा जपावयाची आहे. आश्वासने दिली जातात. परंतु विभागाकडून त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत कार्यक्षमता दाखविली जात नाही. कालांतराने आश्वासनाच्या पूर्ततेचा विसर पडतो. आश्वासन समितीपुढे मात्र आश्वासने तशीच प्रलंबित राहतात. लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये दिरंगाई निर्माण होत आहे. लोकशाही प्रगल्भ करणारी ही प्रक्रिया आहे.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 12:15

श्री.दिवाकर रावते........

मंत्री महोदयांनी सभागृहात काहीही सांगितले तरी आम्हाला ते बंधनकारक नाही असे प्रशासनाला वाटते. आश्वासन समितीच्या संदर्भात मी आपल्याला विनंती करणार आहे. तो सर्वस्वी आपला अधिकार आहे. आपण या संदर्भात लक्ष घालावे आणि मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता लवकरात लवकर झाली पाहिजे. मंत्री महोदयांनी ही आश्वासने जनतेच्या दृष्टीने दिलेली असतात.

नंतर श्री.खर्चे...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

त्याला कसा न्याय मिळेल यादृष्टीने आपण शासनाला निर्देशित करावे अशी विनंती करतो.

श्री. भास्कर जाधव : महोदय, सभागृहात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने या सभागृहात तसेच आपण आणि खालच्या सभागृहात देखील माननीय अध्यक्षांकडून निदेश दिले जातात. त्यानुसार हा कार्यकाल निश्चित करण्याबाबत निदेश दिले. 10-10 वर्षांपासूनची आश्वासने प्रलंबित होती ती लवकरात लवकर पूर्ण करावीत असेही निदेश देण्यात आले होते. त्यानुसार सन 2010 पर्यंतच्या आश्वासनांची पूर्तता होत आलेली आहे. या वर्षभराचीच आश्वासने आता शिल्लक असून ती देखील लवकरच पूर्ण करण्यात येतील. तसेच मागील अधिवेशनात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता पुढील अधिवेशनापर्यंत कशी करता येईल यादृष्टीनेही शासनाकडून प्रयत्न करण्यात येतील.

**सभापती** : मंत्री महोदयांनी प्रलंबित आश्वासनांची संख्या सोमवार, दिनांक 9 एप्रिल, 2012 रोजी सभागृहात निवेदनाच्या स्वरुपात पटलावर ठेवावीत, असे मी निदेश देत आहे.

--------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. रामदास कदम : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, यापूर्वी सुध्दा श्री. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या बाबतीत हक्कभंग झालेला आहे हे सर्वांनाच ज्ञात आहे, त्याबाबत पुढे काय झाले याची मला माहिती नाही. पण पुन्हा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, एका पुस्तकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे पाय संत रामदास स्वामी धरतात आणि छत्रपती त्यांना पायाने उडवितात असे चित्र आहे. अशा प्रकारचे चित्र छापून संत रामदास स्वामींच्या बाबतीत अत्यंत अश्लील आणि घाणेरडे लिखाण केलेले आहे की ते येथे बोलणे सुध्दा उचित वाटत नाही. मी हे पुस्तक पाठवितो. त्यावरुन श्री. पुरुषोत्तम खेडेकर यांची विकृती लक्षात येईल. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, या भूमीत संतांचा अशा प्रकारे अवमानकारक उल्लेख करणे योग्य नाही. म्हणून या पुस्तकाच्या बाबतीत तातडीने कारवाई करण्याबाबतच्य सूचना शासनाला देण्यात याव्यात अशी माझी विनंती आहे.

----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : महोदय, मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एनसीईआरटीचे "सोशल सायन्सेस" हे नवीन पुस्तक प्रकाशित झाले असून तेच पुस्तक आपल्या राज्यात सुध्दा लागू आहे. या पुस्तकाच्या पहिल्या धड्यात "कॉन्स्टिट्युशन, व्हाय अँड हाऊ" च्या पृ.क्र. 18 वर एक कार्टुन असून त्यात गोगलगाय दाखविलेली आहे. ही गोगलगाय घटना असून त्यावर पूजनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बसले असे दाखविण्यात आलेले आहे आणि पंडित नेहरु हंटर हातात घेऊन त्यांना घटना लवकर बनवा असे त्यांना सांगत आहेत, असे चित्र दाखविले आहे व तेच मुलांनाही शिकविले जाते. पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटनाकार आहेत. घटना लिहायला ते वेळ लावतात आणि नेहरु त्याबाबत आग्रही आहेत, आणि घटनेला वेळ लागला त्यामुळे पंडित नेहरु नाराज आहेत असे दाखविण्यात आले आहे. तसेच मनुष्यबळ विकास मंत्री म्हणून कपिल सिब्बल साहेब दाखविले आहेत. हीच पुस्तके शिकवली जातात, त्यामुळे अशा प्रकारचे चुकीचे कार्टुन्स छापणे मग ते पूजनीय डॉ. बाबासाहेबांच्या विषयी असेल किंवा फॅक्चुअल पंडित नेहरुंच्या संदर्भात असेल अशा चुकीच्या गोष्टी विद्यार्थ्यांपर्यंत जातात. माझी विनंती आहे की, या पुस्तकाच्या संदर्भात आपण केंद्र शासनाला तर कळवावेच पण किमान आपल्या राज्यात निदान डॉ. बाबासाहेबांचा अपमान होईल असे पुस्तक प्रकाशित होऊ नये याची दक्षता घेण्याचीही विनंती करावी. या पुस्तकाच्या बाबतीत सुध्दा शासनाने विचार करावा, अन्यथा ते राज्याच्या बाहेर गेले तर त्याचा भावनिक उद्रेक सुध्दा होऊ शकतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून एनसीईआरटीच्या पुस्तकात ज्या पध्दतीची काही चित्रे आहेत असा किंवा अन्य बाबीचा उल्लेख करण्यात आलेला आहे ही बाब केंद्रीय शिक्षण विभागाशी संबधित आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभाग किंवा उच्च शिक्षण विभागाच्या माध्यमातून याबाबतीत केंद्र सरकारला कळविणे गरजेचे आहे त्यामुळे यासंदर्भात आपण शिक्षण विभागाशी संपर्क साधणे गरजेचे आहे.

प्रा. फौजिया खान : होय.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी पाठविलेले पुस्तक माझ्याकडे आलेले असून या पुस्तकाच्या संदर्भात कोणत्या प्रकारे कारवाई करता येईल हे पाहण्यासाठी मी हे पुस्तक विशेष हक्क समितीकडे पाठवित आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, श्री. पुरुषोत्तम खेडेकर यांची दोन प्रकरणे ऑलरेडी प्रिव्हीलेज कमिटीपुढे सुरु आहेत. पुरुषोत्तम खेडेकर यांचे असे प्रकार सातत्याने सुरु आहेत.

**सभापती** : विधान परिषद विशेष हक्क समिती पुढे श्री. पुरुषोत्तम खेडेकर यांची दोन प्रकरणे सुरु असून आजच्या विषयाच्या संदर्भात सुध्दा विशेष हक्क समितीने काम करणे गरजेचे आहे. विशेष हक्क समितीची यासंदर्भात जी काही शिफारस किंवा प्रस्ताव आपल्याकडे येईल त्यावेळेस आपण निर्णय घेऊ.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

राज्यात कुपोषणाचा नायनाट करण्यासाठी वाडया , वस्त्या व गावपातळीवर एकात्मिक बाल विकास प्रकल्प केंद्र व राज्याच्या संयुक्त विद्यमाने गाव पातळीसह शहरी भागात अंगणवाडया सुरु करणे, अंगणवाडयांमार्फत सहा वर्षे वयोगटातील बालकांना पोषक आहार दिला जातो. परंतु गत काही दिवसांपासून बीड जिल्हयातील बहुतांशी अंगणवाडयांमध्ये पोषण आहारा शिजला न जाणे,त्याबद्दल काही महिन्यांपासून उपमा आणि शिऱ्याची बंद पाकीटे घरपोहच दिली जाणे, सदर शिरा मुले खात नसल्यामुळे मुलांचे पालक सदर शिऱ्याचा वापर जनावरांसाठी करीत असणे, सदर पोषण आहाराची टंचाईचे उत्तर एकात्मिक बाल प्रकल्प अधिकारी देऊ न शकणे, एकंदरीत बालविकास अधिकारी हे केवळ नावालाच असल्याचे दिसून येते. पोषण आहार शिजलाच जात नसेल तर या बाबतीत सखोल चौकशी करुन एकात्मिक बालविकास प्रकल्प राबविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे व पोषण आहार रेग्युलर देण्याची व्यवस्था करण्यात यावी यासाठी मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.
धन्यवाद.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. खोपोली नगरपालिकेच्या मंगल कार्यालय व ऑडीटोरियम इमारतीचे काम 8 टक्के अबाऊव्ह रक्कम देऊन 2,13,85,274/- रुपये इतक्या रक्कमेच्या कामाची अंदाजपत्रकीय निविदा काढून मे.दादाई इंटरप्रायेझ ेस, मुंबई या कंपनीला हे काम देण्यात आलेले आहे. दि. 29.3.2006 रोजी नगरपालिकेने ठराव क्रमांक 84 अन्वये ही निविदा पास केली होती व ठेकेदाराने सदर काम 18 महिन्याच्या मुदतीत करणे बंधनकारक असतांनाही हे काम आतापर्यंत पूर्ण केलेले नाही. नगरपालिकेचा ठराव क्रमांक 22 नुसार सदर ठेकेदाराला 45,11,515/- रुपयांचे बिल अदा करुन सदर ठेका रद्द करण्यात आला. सदर काम बरोबर झालेले नसल्या कारणाने या ठिकाणच्या नागरिकांनी माहितीच्या अधिकाराखाली सदर माहिती मागवली असता "मिलिट्री इंजिनिअरिंग कॉलेज पुणे" यांनी 10.11.2008 रोजी तपासणी केली असता झालेले सर्व काम निकृष्ठ दर्जाचे असल्याने ते काम पाडून टाकून नव्याने काम करावे अशी शिफारस केलेली आहे. ज्या ठेकेदाराने अर्धवट काम केले, नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी 10 टक्के अबाऊव्ह काम दिले त्यावर कारवाई झाली पाहिजे. या प्रकारामध्ये खोपोली नगरपालिकेचा 45 लाख रुपयांचा अपहार झालेला आहे त्यामुळे या प्रकरणाची पूर्ण चौकशी करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे मागणी करीत आहे.

**सभापती** : या विषयाची नोंद घेऊन संबंधित विभागाला कळविण्यात यावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

----

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

केंद्र सरकारच्या नुकत्याच जाहीर झालेल्या एका अहवालामध्ये देण्यात आलेली बाल अत्याचाराची आकडेवारी धक्कादायक आहे. ती मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. पुणे मुंबईत खूप घटना घडल्या आहेत. त्यामुळे हा विषय महाराष्ट्र शासनाशी संबंधित आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, 12447 मुलांची पाहणी केल्यानंतर 48.29 टक्के बालकांचा छळ होतो असे आढळून आले आहे. सन 2010 मध्ये देशात लहान मुलांबाबतच्या छळाच्या झालेल्या एकूण घटना 26594 इतक्या आहेत. मी आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे की, पुण्या मुंबईमध्ये राजस्थान, उत्तर प्रदेश येथून मोठ्या प्रमाणावर मुले आणली जात आहेत. त्यांना भीक मागायला लावले जाते. यातून मोठ्या प्रमाणावर कलेक्शन होत असून ते कुठे जाते याचाही शोध घेण्याची आवश्यकता आहे. पुण्या मुंबईमध्ये एकेका खोलीमध्ये 8 ते 10 मुले ठेवली जातात. त्यांना दिवसभर भीक मागण्याचे काम दिले जाते. अशा प्रकारे या मुलांवर अन्याय होत आहे. तेव्हा अतिशय संवेदनशील अशा विषयाकडे मी शासनाचे लक्ष वेधत आहे.

**सभापती** : माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव आपण याची नोंद घ्यावी.

श्री.भास्कर जाधव : होय.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांचे लक्ष वेधू इच्छितो. सांगली जिल्ह्यामध्ये वाढदिवसाच्या दिवशी लहान मुलांना बैलगाड्यांना जुंपले गेले होते. त्यामुळे यातील खरे काय आहे हे आम्हाला समजले पाहिजे. वर्तमानपत्रातील बातमी खरी मानण्याचे कारण नाही.

**सभापती** : ग्रामीण भागामध्ये बैलांच्या शर्यती ह्या पंरपरेनुसार चालत आल्या होत्या. मधल्या काळात जनावरांना क्रूर पद्धतीने वागविले जाते म्हणून त्यावर कायदेशीर निर्बंध घालण्यात आले. त्या बाबतीतील ते चित्र असावे. मी शासनाला याची चौकशी करायला सांगतो.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील जोगनकुडा या गावात महात्मा गांधी तंटामुक्ती योजनेच्या माध्यमातून वाद सोडवित असलेल्या बापू कन्ना ऐंका याची कुऱ्हाडीने, तर अर्जुन बंडे तलांडी यांची गोळ्या झाडून हत्या करणे, नक्षलवाद्यांकडून त्यांना कोणतेही सरकारी किंवा तंटा मुक्तीचे काम न करण्यास या पूर्वी बजावण्यात आले होते. तरी सुद्धा त्यांनी नक्षलवाद्यांचे म्हणणे न ऐकल्यामुळे त्यांची हत्या करण्यात आली. त्या आदिवासी कार्यकर्त्यांच्या मृता जवळ नक्षलवाद्यांनी ठेवलेल्या पत्रकात वारंवार सूचना देऊनही तंटा मुक्तीचे काम करीत असल्याने हत्या केल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, गोंदिया जिल्ह्यातील चिंचगड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सुकडी गावाजवळ दिनांक 30 मार्च 2012 रोजी लाकूड नेण्यासाठी आलेल्या दोन ट्रॅक्टरना 60-70 च्या संख्येत असलेल्या नक्षलवाद्यांनी आग लावून भस्मसात केला आहे. या दोन्ही प्रकारामुळे आदिवासी बांधवांमध्ये नक्षलवाद्यांविषयी निर्माण झालेले भीतीचे वातावरण लक्षात घेता शासनाने या संबंधी तातडीने कारवाई करावी अशी मी विनंती करीत आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांना सांगू इच्छितो की, नक्षलवाद्यांनी केलेला हा अत्यंत जुलूम आहे. सदर बाब आपण माननीय गृह मंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

श्री.अनिल देशमुख : होय.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझ्या औचित्याचा मुद्दा आहे.

या राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यामिक शाळांसाठी 1981 ची नियमावली लागू आहे. या नियमावलीमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार काही बदल करणे अपेक्षित आहे. यासाठी शासनाला कोणतीही आर्थिक तरतूद करावी लागणार नाही. मागासवर्गीयांच्या पदोन्नती संबंधी, सरळसेवा भरती संबंधी न्यायालयाने निदेश दिले आहेत. त्यानुसार मागासवर्गीयांना आरक्षण लागू करण्यासाठी, पदोन्नतीमध्ये टक्केवारी ठेवण्यासाठी 1981 च्या नियमावलीमध्ये तातडीने बदल होणे अपेक्षित आहे. वारंवार विनंती करून देखील शासनाने याची दखल घेतली नाही. यासाठी कोणताही खर्च येणार नाही. केवळ अधिसूचना काढली तरी आपण मागासवर्गीयांना न्याय देऊ शकतो म्हणून शासनाने तातडीने कारवाई करावी म्हणून मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

**सभापती** : माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख याची आपण नोंद घ्यावी.

श्री.अनिल देशमुख : होय.

.....

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, पुरोगामी महाराष्ट्राचे थोर नेते, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, तसेच भारताचे उप पंतप्रधान, कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने समाजातील तरुण पिढीस त्यांच्या विचारधारेचे मौलिक मार्गदर्शन लाभावे यासाठी त्यांच्या जीवनावर आधारित "उद्याचा महाराष्ट्र, युगांतर, शिवनेरीच्या नौबत्ती, सह्याद्रीचे वारे, असे होते कर्मवीर, ऋणानुबंध, कृष्णाकाठ, शब्दांचे सामर्थ्य, सोनेरी पाने" वगैरे अशा निवडक साहित्यांचे प्रकाशन राज्य शासनाने करावे व राज्यातील सर्व शाळा कॉलेजातील ग्रंथालयास त्या पुस्तकांचा मोफत पुरवठा करण्यात यावा. त्याचप्रमाणे त्यांच्या जीवनावर आधारित डॉक्युमेंटरी म्हणजे लघुचित्रफीत बनवून प्रत्येक शाळेत जाऊन त्या प्रदर्शित कराव्यात अशी मागणी करीत आहे. सभापती महोदय, याबाबत आपण संबंधितांना निर्देश द्यावेत अशी विनंती करतो.

**सभापती** : ठीक आहे, मी याबाबत सांगेन.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, याची नोंद घेतली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कै. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शासनाने 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. माझी विनंती आहे की, माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मांडलेला औचित्याचा मुद्दा त्यांनी मागे घ्यावा. कै. यशवंतराव चव्हाण साहेबांचे एवढे मोठे साहित्य ही राज्याच्या दृष्टीने कौतुकास्पद बाब आहे वगैरे त्यांनी म्हटले आहे....

**सभापती** :माननीय सदस्यांनी त्याबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत....

श्री. दिवाकर रावते : तर मग ते साहित्य मोफत वाटण्यास कशासाठी सांगत आहात? हे बरोबर नाही. ते साहित्य मोफत वाटणे म्हणजे आम्ही कुणीही ते विकत घेत नाही असा त्याचा अर्थ होतो. ही गोष्ट फार वाईट आहे, कै. यशवंतराव चव्हाण साहेबांचा हा अपमान आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मागे घ्यावा, ही काही व्यक्तिगत बाब नाही अशी माझी त्यांना विनंती आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे महाराष्ट्रातील शाळा-महाविद्यालयांमधील ग्रंथालयामध्ये हे साहित्य ठेवण्याबाबत सूचना केली आहे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कै. यशवंतराव चव्हाण साहेबांचे साहित्य हे काही व्यक्तिगत बाब नाही....

**सभापती** : ठीक आहे, मी त्या बाबत काहीही बोलत नाही.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"पुणे शहरातील 152 पैकी सुमारे 20 वॉर्डामध्ये महिलांसाठी एकही स्वच्छतागृह नसणे, सुमारे 5 वॉर्डामध्ये फक्त दोनच स्वच्छतागृहे आहेत. या संदर्भात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी महिलांसाठीच्या अपुऱ्या स्वच्छतागृहाविषयी पुणे महानगरपालिकेच्या विरुध्द सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. पालिकेच्या प्रतिज्ञापत्रात महिलांसाठी "क्युनिमिटी लेवल" (चाळ, वाडया, वस्ती) पातळीवरच्या 2462 स्वच्छतागृहे, 4025 सशुल्क स्वच्छतागृहे दाखविण्यात येणे, परंतु प्रत्यक्षात कार्यालयांमधील, सार्वजनिक बागांमधील, शाळेतील स्वच्छतागृहेही सार्वजनिक असल्याचे प्रतिज्ञापत्रात सांगण्यात येणे, परंतु विविध रस्त्यांवर, मंडई आदी ठिकाणी महिलांसाठी असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या 62 आहे. महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधण्यासाठी पालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद केली जाते, पण त्याचा वापर न करता ती परत पाठविली जाते. ही परिस्थिती पुणे शहरात नव्हे तर राज्यातील सर्वच शहरांमध्ये असल्याने या बाबत शासनाने तत्काळ निवेदन करावे".

सभापती महोदय, सार्वजनिक क्षेत्रामध्ये शिक्षण घेत असतांना, नोकऱ्या करीत असतांना महिलांची संख्या दिवसें दिवस वाढत चालली आहे. या बाबत पुण्याच्या उच्च न्यायालयामध्ये काही सामाजिक कार्यकर्ते गेले व त्यांनी एक याचिका दाखल केली होती. त्या याचिकेबाबत पुणे महानगरपालिकेने एक प्रतिज्ञापत्र सादर करुन असे सांगितले की, पुण्यामध्ये 2462 स्वच्छतागृहे आहेत, आणि 4025 सशुल्क स्वच्छतागृहे आहेत. प्रत्यक्षात उच्च न्यायालयाला माहिती देत असतांना पुणे महानगरपालिकेने चुकीची माहिती दिली आहे. विशेषत: चाळीमध्ये आणि वस्त्यांच्या ठिकाणी जी स्वच्छतागृहे आहेत त्यांना सार्वजनिक स्वच्छतागृहे असे जरी म्हटले तरी देखील मंडया, शाळा, देऊळ, क्रीडांगण, बगिचा या ठिकाणी असलेल्या स्वच्छतागृहांची संख्या पाहिली तर पुण्याच्या पाच वॉर्डामध्ये फक्त दोनच स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत आणि 152 पैकी 20 वॉर्डामध्ये एकही स्वच्छतागृह बांधण्यात आलेले नाही. या करिता नगर विकास विभागाने ज्या ज्या ठिकाणी महानगरपालिकेच्या स्वच्छतागृहांसाठी तरतूद केली आहे त्यामधून निवासी क्षेत्रामध्ये स्वच्छतागृहे बांधली जातात त्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी देखील स्वच्छतागृहे बांधण्याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, त्याचप्रमाणे या विधान भवनाच्या इमारतीमध्ये आम्ही नेहमी वावरतो. या इमारतीमध्ये मोठया प्रमाणात महिला कर्मचारी काम करीत आहेत आणि महिला आमदार देखील आहेत. अशावेळी केवळ महिलांकरिता एक स्वच्छतागृह होते ते रद्द करुन त्या ठिकाणी फक्त पुरुषांकरिता स्वच्छतागृह तयार करण्यात आले आहे. सभापती महोदय, विधिमंडळामध्ये काम करीत असतांना आपल्याला महिला आमदार देखील भेटल्या आहेत. राज्य पातळीवर सोयी-सुविधा निर्माण करीत असतांना विधान भवनामध्ये देखील सोयी-सुविधा देण्याबाबत पुनर्विचार करुन त्या उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही व्हावी याकडे मी औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

**सभापती** : शासनाने यामध्ये लक्ष घालावे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, मागील आठवडयात औचित्याच्या मुद्दयाव्दारे आपण मला विद्यापीठाचा मुद्दा सभागृहासमोर आणण्याची परवानगी दिली होती आणि तसा तो आणला होता. या औचित्याच्या माध्यमातून त्या प्रोसिडींगमधील माननीय मंत्री महोदयांचे एक वाक्य मी आपल्यासमोर उधृत करु इच्छितो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:40

डॉ.दीपक सावंत . . . .

त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"दोन दिवसापूर्वी परीक्षेचा पेपर फुटला याची चौकशी होणार आहे."आजचा पेपर फुटलेला नाही. पण हा पेपर फुटला अशी वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झालेली आहे.परंतु माननीय मंत्री महोदयांनी ठामपणे सांगितले की, "आजचा पेपर फुटलेला नाही." त्या नंतर मात्र या शासनाने आणि वृत्तपत्रांनी सांगितल्याप्रमाणे पेपर फुटला हे सिध्द झाले. पहिली गोष्ट अशी आहे की, मला याबाबतीत हक्कभंगाचा प्रस्ताव आणण्यासाठी परवानगी द्यावी आणि या पेपर फुटीमुळे आपण 11 तारखेला पुन्हा परीक्षा घेणार आहात आणि त्याबाबतीत फेस बुकवर विद्यार्थ्यांच्या खूप मोठ्या प्रमाणावर प्रतिक्रिया आलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे पुढील सगळे कार्यक्रम डिस्टर्ब होणार आहेत. त्यामुळे या परीक्षा 11 तारखेला न घेता, यासाठी दुसरा पर्याय शोधून काढावा आणि मला यासंबंधात हक्कभंग आणण्यासाठी परवानगी द्यावी हे दोन मुद्दे मी औचित्याच्या माध्यमातून मांडत आहे.

-----

. . . .यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या संबंधात व्यक्तिगतरित्या बोललो होतो. याबाबतीत मी स्पष्ट शब्दामध्ये सांगितले तेव्हा माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की,अमुक वाजता पेपर फुटल्याचा एस.एम.एस.आलेला आहे. तर अशा प्रकारे पेपर फुटला आहे काय? असा प्रश्न विचारल्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी अधिकृतरित्या "नाही" असे सांगितले.त्यामुळे तीन दिवस संपूर्ण महाराष्ट्राची आणि मुंबई विद्यापीठाची प्रचंड बदनामी चाललेली आहे.हा अतिशय गंभीर विषय आहे. सभापती महोदय, मी आपल्याकडे व्यक्तिगतरित्या येऊन सांगितले की, हा हक्कभंगाचा विषय आहे आणि त्याप्रमाणे करावे लागेल.

**सभापती** : या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय उच्च शिक्षण विभागाच्या मंत्री महोदयांकडून मी सर्व माहिती घेतो. ज्यादिवशी सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडलेला आहे, त्या अनुषंगाने या सदनामध्ये उच्च शिक्षण विभागाच्या मंत्री महोदयांनी जे भाष्य केलेले आहे, ते देखील मी पहातो आणि त्या नंतर आपण याठिकाणी हक्कभंगाचा प्रस्ताव आणावा काय किंवा अन्य बाबी या दृष्टीकोनातून मी तुम्हाला माझा निर्णय सांगतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मला हक्कभंगाचा प्रस्ताव मांडण्यासाठी परवानगी द्यावी. शेवटी आपला निर्णय अंतिम राहील.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना हक्कभंगाचा प्रस्ताव कधीही मांडता येतो. परंतु ज्यावेळी यासाठी तुम्ही सभापतींकडे परवानगी मागता तेव्हा यासंबंधातील संपूर्ण माहिती घेऊनच तशी परवानगी देणे योग्य आहे की नाही हे मला पाहिले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी याठिकाणी औचित्याचा मुद्दा दिलेला नाही. पण महत्वाचा विषय असा आहे की, परवा सभागृहामध्ये वाळू माफियांच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी आपण आम्हाला परवानगी दिली आणि त्यावर मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. अशा वेळी सदनामध्ये झालेल्या चर्चेचा परिणाम म्हणून ही बाब शासनाने गांभीर्याने घेतली पाहिजे. पण दुर्दैवाने शासनाने ही बाब गांभीर्याने न घेतल्यामुळे आज रायगड जिल्ह्यातील महसूल कार्यालये तीन दिवसापासून बंद आहेत. एका घटनेच्या बाबतीत सदनामध्ये चर्चा झाली आणि त्यावर माननीय गृह मंत्री आणि माननीय महसूल मंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबतीत आम्ही कारवाई केल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही वगैरे सगळे काही झाले. परंतु त्यानंतर तीन दिवस झाले तरी तेथील महसूल कार्यालये बंद आहेत, त्यामुळे रायगड जिल्ह्यातील लोकांची गैरसोय होत आहे. याठिकाणी सध्या





श्री.दिवाकर रावते . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधानसभेचे अधिवेशन सुरु आहे. अशा वेळी राज्यामध्ये हे सरकार अस्तित्वात आहे की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.याचा अर्थ काय आहे हे आपल्या माध्यमातून आम्हाला कळले पाहिजे.आपण याबाबतीत सरकारला काही सांगणार आहात की नाही? त्याठिकाणी अत्यंत गंभीर परिस्थिती आहे, तरीही तेथे लक्ष दिले जात नाही."त्या ठिकाणी राजकीय संरक्षण दिले जात आहे" असे म्हटले की,"आमच्यावर राजकीय आरोप केले जात आहेत" असे म्हटले जाते. त्यामुळे याबाबतीत दखल घेणे आवश्यक आहे नाहीतर उद्यापासून येथे चर्चा करण्यात काही अर्थच नाही. मग आम्ही येथे येतच नाही. सरकारने काय करावयाचे असेल ते करावे. मग सभागृह कशासाठी सुरु ठेवावयाचे ?

श्री.राजन तेली (खाली बसून) : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, सगळे कोकणातील होते . . ..

**सभापती** : विशेषत: रायगड जिल्ह्यामध्ये वाळू तस्करांच्या माध्यमातून झालेला जो प्रकार आहे, ती बाब गंभीर आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : कोकण बंद आहे.

**सभापती** : याबाबत अशी अपेक्षा आहे की, वाळू तस्करांच्या बाबतीत मग ते रायगडमधील असतील, कोकणामध्ये असतील किंवा महाराष्ट्रातील अन्य भागामध्ये असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करणे हे शासनाचे काम आहे. माझी अशी सूचना आहे की,याबाबतीत माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी आजच निवेदन करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,आपण या विषयाच्या बाबतीत सरकारला आजच निवेदन करावे असे सांगितले आहे. पण वाईट याचे वाटते की, सरकार या गोष्टी किती सिरिअसली घेते. त्यावेळी बीडमध्ये पोलीस जमादाराचा खून झाला होता.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

हा गंभीर विषय आहे तेव्हा या विषयावर आजच निवेदन करावे असे आपण आदेश दिले होते, परंतु त्या दिवशी सरकारकडून निवेदन झाले नाही. मी दुसऱ्या दिवशी आठवण केली, निवेदन करण्याबाबत सरकारला निरोप दिला, परंतु काल, परवा देखील त्या बाबत निवेदन करण्यात आलेले नाही.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

माननीय सभापती महोदय असताना मी सांगत होतो की, आम्ही येथे महत्वाचे विषय मांडतो. त्या संदर्भात पीठासीन अधिकारी निर्णय देतात. बीड मध्ये जमादाराचा झालेला खून या विषयी मी प्रश्न उपस्थित केला असता आपण आदेश दिले की, आज कामकाज संपण्यापूर्वी निवेदन करावे, परंतु त्या दिवशी निवेदन करण्यात आले नाही. दुसऱ्या दिवशी मी आठवण करुन दिली त्या दिवशी देखील निवेदन करण्यात आले नाही. काल देखील निवेदन करण्यात आले नाही. आपण दिलेले आदेश सरकार गंभीरपणे घेत नाही.

सभापती महोदय, मी या ठिकाणी गिरणी कामगारांना घरे देण्या संदर्भातील एक मुद्दा मांडला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, गिरणी कामगारांना कोणत्या दराने घरे देण्यात येतील याची माहिती सात दिवसांत घोषित करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या या घोषणेला चौदा दिवस झालेले आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी रायगड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय बंद असल्याचा मुद्दा येथे उपस्थित केला. तेव्हा माननीय सभापतींनी या संदर्भात आजच निवेदन करावे असे सरकारला आदेश दिले. मला या ठिकाणी एवढेच सांगायचे आहे की, आपण सरकारला आदेश देता परंतु ते आदेश सरकार गंभीरपणे घेत नाहीत. आम्ही आठवण करुन सुध्दा निवेदन केले जात नाही. विधिमंडळाकडून कळवून सुध्दा निवेदन करण्यात येत नाही. आपण दिलेल्या आदेशांचे सरकारकडून पालन होत नसेल तर या सभागृहात दिलेल्या शब्दाला काही अर्थ नाही असे माझे मत आहे. येथे गिरणी कामगारांच्या घरासंबंधीची चर्चा सुरु असताना माननीय मुख्यमंत्री महोदयांनी ही चर्चा मध्येच थांबवून निवेदन केले की, गिरणी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

कामगारांच्या घरांच्या किंमती बाबतच सात दिवसांत निर्णय घेण्यात येईल. आज त्यास चौदा दिवस झाले आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केलेली घोषणा सुध्दा अशीच समजायची काय ? माननीय मुख्यमंत्री येथे येतात आणि आमच्या तोंडाला पाने पुसून निघून जातात. माननीय मुख्यमंत्री येथे जे सांगतात त्याची अंमलबजावणी होईल अशी जनतेची अपेक्षा असते. या संदर्भात बैठक झ ाली आहे हे माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर यांना माहीत आहे. बैठक झाली असेल तर त्याबाबत सांगितले पाहिजे की आमची बैठक झाली आहे. आम्ही मंत्रिमंडळापुढे आज जाणार आहोत अशी काही तरी माहिती सभागृहाला दिली पाहिजे. आपण सभागृहास जबाबदार आहोत, आपले उत्तरदायीत्व आहे अशी मानसिकता सत्ताधारी पक्षाची जाणवत नाही. आपण दिलेल्या आदेशांचे पालन होत नसेल तर मग सभागृहाचे कामकाज कशीला करायचे असे आम्हा विरोधी पक्षांना आवर्जून वाटते. तेव्हा आपण माननीय संसदीय कार्य मंत्री महोदयांना बोलावून त्यांना ताकीद दिली पाहिजे की, सभापतींनी आठवण करुन देखील त्यांचे आदेश पाळणार नसाल तर ताकीद देण्याची वेळ आलेली आहे. सरकार बेफिकीरीने वागत आहे असे आम्हाला दुदैवाने म्हणावे लागत आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अतिशय गंभीर प्रश्न उपस्थित केलेला आहे. मागील तीन दिवसांपासून कोकणातील सर्व कार्यालये ठप्प आहेत. शासकीय कार्यालये बंद असल्यामुळे आपल्या कामासाठी आलेल्या लोकांना त्याचा फार त्रास होतो. एका राजकीय पक्षाचा नेता तहसीलदाराच्या छातीवर रिव्हॉल्व्हर ठेवतो. सत्ताधारी पक्षाकडून सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ला होण्याची शक्यता निर्माण होते किंवा हल्ले होत आहेत. या सभागृहामध्ये माननीय सभापतींनी दिलेले आदेश सरकार पाळत नसेल, जुमानत नसेल तर आम्ही न्याय कोणाकडे मागायचा ? हे सरकार हतबल झालेले आहे. मानननीय सभापतींनी दिलेले आदेश सरकार पाळत नाही त्याचा आम्ही धिक्कार करुन, निषेध करुन वॉकआऊट करु.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मांडलेल्या मुद्याशी आम्ही सहमत आहोत. परंतु आम्ही वॉकआऊट करीत नाही. आपण कामकाज स्थगित करुन माननीय मंत्री महोदयांना निवेदन करण्यासाठी बोलवावे.

..3..



AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 12:45

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : नेमके काय करायचे ते आपण दोघांनी मिळून प्रथम ठरवावे. जो पर्यंत आपल्या दोघांमध्ये एकमत होत नाही तो पर्यंत मला निर्णय घेणे कठीण आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण हा प्रश्न लाईट करणार असाल तर सरकारचा त्याचा फायदा घेणार. आपण आम्हाला संरक्षण देणार आहात काय ?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**उप सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आपल्या भावना मांडताना सांगितले की, आम्ही सभात्याग करु,

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.......

त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी त्यांना त्यांच्या जागेवर बसविले. आता मला या आसनावरुन निर्णय द्यावयाचा आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य माननीय उप सभापतींशी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संसदीय कार्यमंत्री या सभागृहात येऊन आजच्या कामकाजात दाखविण्यात आलेली दोन विधेयके मंजूर करुन द्यावीत अशी सभागृहाला विनंती करतात, ही त्यांची जबाबदारी आहे तशीच नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या संदर्भात निवेदन करण्याची शासनाची जबाबदारी नाही का? सभापती महोदय, आपण निदेश दिलेले असताना सुध्दा सदर निवेदन आता पर्यत करण्यात आलेले नाही ते या ठिकाणी तातडीने झाले पाहिजे अशी आमची मागणी आहे.

( गोंधळ )

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या सभागृहात माननीय मंत्री महोदयांना बोलावण्यात येईल. निवेदन करण्याच्या संदर्भात सभापती महोदय, आपल्या माध्यमातून शासनाला सूचना करण्यात आल्यामुळे सदर निवेदन जरुर केले जाईल.

( गोंधळ )

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य आपली मागणी अशा पध्दतीने सांगण्या ऐवजी आपल्या जागेवर जाऊन सांगू शकतात. सर्व सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असल्यामुळे मला आपला एकही शब्द समजलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे आणि शांतपणे सांगावे, मी ऐकायला तयार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, परवा नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या माध्यमातून मी या सभागृहात मागणी केली होती. पहिल्यांदा फक्त रायगड जिल्हयात दोन दिवस बंद होता आज संबंध कोकण बंद आहे. रोहा शहराचे राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. परब यांनी तहसीलदाराच्या छातीवर रिव्हॉल्व्हर लावले त्याबद्दल त्यांना अद्याप अटक होत नाही. त्या ठिकाणची सर्व पोलीस यंत्रणा ठप्प झालेली आहे. रायगड जिल्ह्यातील गृह खाते काय करीत आहे हा ,खरा प्रश्न निर्माण झालेला आहे. कोठे गणपती चोरीला जातो तर कोठे दरोडे पडतात आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील......

चक्क रिव्हॉल्व्हर लावून राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते काम करीत असतील तर हे बरोबर नाही. या संदर्भात आम्ही नियम 289 अन्वये चर्चेची मागणी केली होती. त्यावेळी या संदर्भातील निवेदन उद्या करण्यात यावे असे माननीय सभापतींनी निदेश दिले होते, पण अद्याप सदर निवेदन झालेले नाही. त्या ठिकाणी पालक मंत्र्यांच्या दबावाखाली सर्व महसूल खाते हतबल झालेले आहे म्हणून जोपर्यंत या संदर्भातील निवेदन आज सभागृहात होत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही अशी आमची भूमिका आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी अतिशय समर्पक शब्दात मागणी मांडलेली आहे मी त्यांची मागणी मान्य करतो आणि या सभागृहात सन्माननीय महसूल मंत्री किंवा महसूल राज्य मंत्री आणि गृह मंत्री किंवा गृह राज्य मंत्री जे कोणी मंत्री महोदय, उपलब्ध असतील त्यांनी या सभागृहात तातडीने यावे आणि सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबत या सभागृहात थोडक्यात आपले म्हणणे मांडावे, एवढेच मी सांगतो आणि पंधरा मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज तहकूब करतो. त्यानंतर मात्र कामकाजाला सुरुवात होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.53 ते 01.08 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : रोहा येथील तहसीलदार श्री. गणेश सांगळे यांच्यावर झालेला हल्ला

**मु. शी.** : रोहा येथील तहसीलदार श्री. गणेश सांगळे यांच्यावर झालेला हल्ला या विषयावर श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंबंधी माननीय गृह मंत्र्यांचे निवेदन

श्री. आर. आर. पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, रोह्याच्या प्रकरणाबद्दल आपण निवेदन करण्यास सांगितले त्याप्रमणे मी पुढील निवेदन करीत आहे.

सभापती महोदय, कुंडलिका नदीच्या किनाऱ्यावर अनधिकृत रेती उत्खनन सुरु आहे अशी माहिती मिळाल्याने दिनांक 1.4.2012 रोजी रात्री 10.30 चे सुमारास श्री. गणेश दत्तात्रय सांगळे, तहसीलदार, रोहा हे शासकीय वाहनामधून प्रभारी चालक श्री. दळवी, कारकून श्री. सुरेश पाटील, शेडसही तलाठी श्री. सुनील जाधव यांच्यासोबत कुंडलिका नदीच्या किनाऱ्यावर व परिसरामध्ये पाहणी करीत होते. सदर प्रसंगी तहसीलदार, रोहा यांनी रोहा पोलीस ठाण्याकडे कारवाई करतेवेळी पोलीस बंदोबस्ताची मागणी केलेली नव्हती अगर करावयाच्या कारवाईबाबत कोणतीही कल्पना पोलिसांना दिली नव्हती. त्यावेळी त्यांना पाहणी करीत असताना सिमेंटच्या पोत्यामध्ये चोरटी रेती तसेच दोन सक्शन पंप, दोन लोखंडी होड्या आढळून आल्या. चौकशीअंती तेथील कामगारांनी ते सक्शन पंप व लोखंडी होड्या मनोज शिंदे व नितीन परब यांच्या असल्याचे सांगितले.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

त्यानंतर तहसीलदार यांनी अनधिकृतपणे उत्खनन केलेली 30 ब्रास रेती जप्त केली. सदर मालाचा पंचनामा करुन त्यांनी तो माल तेथेच ठेवला व हायड्रा आणण्यासाठी सोबत असलेले कर्मचारी घेऊन रोहा येथे जात असताना रोहा-चणेरा मार्गावर आरोपी नितीन पुंडलिक परब याने श्री.सांगळे यांचा जाण्याचा मार्ग आपल्या चार चाकी वाहनाने अडविला. त्यावेळी आरोपीने श्री.सांगळे यांना दमदाटी करण्यास सुरुवात केली. तसेच श्री.सांगळे यांनी आरोपीच्या जप्त रेतीवर व सक्शन पंपांवर कारवाई केल्यास आरोपीने त्यांना रिव्हॉलव्हरचा धाक दाखवून त्यांना ठार मारण्याची धमकी दिली व ठार मारण्याचा प्रयत्नही केला. यावेळी आरोपीबरोबर असणारे मनोजकुमार नारायण शिंदे यांनी आरोपीला अडविले.

याबाबत फिर्यादी श्री.सांगळे यांनी रोहा पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी नितीन पुंडलिक परब याच्याविरुध्द रोहा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.39/2012 अन्वये भादंवि कलम 307, 341, 506, 186 सह भारतीय हत्यार कायदा, कलम 27 प्रमाणे दि.02.04.2012 रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू असून गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाला आहे. आरोपीच्या सध्याच्या ठावठिकाणाची माहिती पोलिसांनी मिळविली असून आरोपीचा शोध सुरु आहे. आरोपीचा शस्त्र परवाना रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यातील महसूल खात्यातील कर्मचाऱ्यांनी काम बंद केलेले आहे. त्याबाबत माननीय महसूल मंत्र्यांनी देखील सभागृहात निवेदन करणे आवश्यक आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, महसूल विभागाचे निवेदन एक तासामध्ये करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कोकणातील तीन जिल्ह्यातील महसूल कार्यालयातील कारभार बंद आहे. अधिवेशन सुरु असताना सरकार हा विषय गांभीर्याने घेणार आहे की नाही ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील योग्य माहिती घेऊनच ती सदनामध्ये दिली पाहिजे. मी याबाबत माहिती घेतली असता रायगड जिल्ह्यातील सर्व कार्यालये आता सुरु झालेली आहेत अशी माहिती मिळालेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणातील आरोपीला अटकपूर्व जामीन मिळू नये म्हणून संघटनेने प्रयत्न केलेला आहे. माणगांव येथील जिल्हा कोर्टामध्ये संघटनेचे सर्व पदाधिकारी, तहसीलदार उपोषणास बसलेले आहेत. सरकारी वकील दबावाखाली मॅनेज होऊ नये म्हणून तेथील महसूल खात्याचे अधिकारी व कर्मचारी जज्जसमोर उपस्थित होते. मी त्यांच्याशी रात्री फोनवरुन बोललो आहे. त्यांनी मला असे सांगितले की, आम्ही सर्वजण उपस्थित राहून पर्सनल लेव्हलवर वकील नेमले आहेत. या गुन्ह्यातील आरोपीस अटकपूर्व जामीन मिळू नये म्हणून प्रयत्न केला आहे. या प्रकरणातील पार्टी एक पदाधिकारी आहे. रोह्यामध्ये घडलेली ही घटना आहे. रायगड पोलिसांना गणपतीची मूर्ती चोरी करणारे आरोपी मिळत नाहीत. या प्रकरणातील आरोपी परब हा राजरोसपणे माणगावमध्ये फिरतो, माणगाव शहरामध्ये राहतो, अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी प्रयत्न करतो. कोर्टामध्ये येऊन तो कार्यकर्त्यांना भेटून गेला तरीही तो पोलिसांना सापडत नाही. म्हणजे दबावाखाली पोलीस त्याला अटक करीत नाहीत का असा माझा सवाल आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

श्री.आर.आर.पाटील : या संघटनेने त्याला अटकपूर्व जामीन मिळू नये असा जरुर प्रयत्न केला असेल. पण मी सूचना केल्याप्रमाणे त्याला अटकपूर्व जामीन मिळू नये यासाठी पोलिसांनी सुध्दा निश्चितपणे प्रयत्न केलेला आहे. पोलिसांना त्याला दबावाखाली अटक करावयाची नसती तर त्याच्याविरुध्द गुन्हाही रजिस्टर्ड केला नसता. त्याच्याविरुध्द या गुन्ह्यातील सर्व कलमाखाली गुन्ह्याची नोंद केलेली आहे. या सरकारची कार्यपध्दती बघितली तर आरोपींना तो पक्षाचा कार्यकर्ता असला तरी त्यांना पाठिशी घालण्याची भूमिका स्वीकारली जात नाही.

-----

4....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/

**पृ.शी.**: अर्जुन किसनराव दुबाले, सहायक पोलीस उपनिरीक्षक, जि.बीड यांचा आकस्मिकपणे झालेला मृत्यू.

**मु.शी.**: अर्जुन किसनराव दुबाले, सहायक पोलीस उपनिरीक्षक,जि.बीड यांचा आकस्मिकपणे झालेला मृत्यू या विषयावर श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.सतेज ऊर्फ बंटी.डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी अर्जुन किसनराव दुबाले, सहायक पोलीस उपनिरीक्षक, जि.बीड यांचा आकस्मिक मृत्यू होणे या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे :-

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 302 कलम लावलेल्या अरोपीला अटक का केली नाही ?

श्री. आर.आर.पाटील : दिलेल्या तक्रारी प्रमाणे गुन्हा नोंद केलेला आहे. पोलीस खात्यामध्ये काम करणा-या आरोपीची पार्श्वभूमी पाहिली तर असे दिसून येईल की, हा आरोपी हार्टचा रुग्ण होता आणि त्याने त्यासाठी ट्रीटमेण्ट घेतलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : आपल्या पक्षाच्या कायकर्त्यांना वाचविण्याचा प्रयत्न माननीय गृहमंत्री करीत आहेत..

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी हा आरोप कधीही मान्य करणार नाही. कारण मरणारा आरोपी हा माझ्या विभागाचा कर्मचारी आहे. त्यामुळे येथे पक्षाचा संबंध येत नाही. आम्ही केलेली कारवाई कोर्टामध्ये सुध्दा टिकली पाहिजे. आरोपीला मारहाण झाल्याची तक्रार चार दिवसांनी आलेली आहे. सदर आरोपी दवाखान्यामध्ये ॲडमिट झाला. तीन दिवसांनी त्याला डिस्चार्ज मिळाला. डिस्चार्ज घेऊन घरी गेल्यानंतर पुन्हा त्याला त्रास व्हायला लागला, पुन्हा त्याला दवाखान्यामध्ये ॲडमिट केले. आम्ही गुन्हा नोंदलेला आहे. पोस्टमार्टेम रिपोर्टनंतर जेव्हा मृत्यूचे कारण स्पष्ट होईल त्यावेळी निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : एका पोलिसाचा बळी गेला तरी चालेल. परंतु आपल्या राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्याला वाचवायचे आहे...

श्री. आर.आर.पाटील : अशा पध्दतीने आरोप करणे योग्य नाही. या घटनेमध्ये त्यांच्या नातेवाईकांनी जी तक्रार केली त्याप्रमाणे आम्ही गुन्हयाची नोंद केलेली आहे. मेडिकल सर्टिफिकेट येण्याची आवश्यकता आहे. आरोपीच्या अंगावर मारहाण केल्याच्या जखमा आहेत असा रिपोर्ट डॉक्टरांनी दिलेला नाही. कोणत्याही जखमा अंगावर नाहीत. तरी सुध्दा मृत्यू कशामुळे झाला हे जोपर्यन्त स्पष्ट होत नाही तोपर्यन्त कुणाला अटक करणे योग्य होणार नाही, उद्या आमची कारवाई कोर्टात टिकणार नाही आणि एखाद्यावर अन्याय करण्याचा पोलिसांना देखील अधिकार नाही.

श्री. विनोद तावडे : निवेदन करताना माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, संबंधित मयत पोलीस हा दारुच्या अंमलाखाली होता. म्हणजे त्याची मेडिकल टेस्ट झालेली होती. मग ही मेडिकल टेस्ट पहिल्या दिवशी कशासाठी केली होती, मेडिकल करण्याचे काय कारण होते ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

कोणताही गुन्हा दाखल न करता तुम्ही आधी आरोपीची मेडिकल टेस्ट घेण्याचे कारण काय ? ज्याअर्थी मेडिकल टेस्ट घेण्यात आली त्याअर्थी काही तरी गुन्हा झालेला होता, काही तरी मारहाण झालेली होती. जो कोणी गोरे नावाचा माणूस आहे त्याने दोन दिवस आधी बसगाड्या फोडल्या होत्या, त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी होती. तो मंत्र्यांच्या जवळचा आहे. हे सर्व माहीत असताना ज्याने एका पोलिसाला मारले आहे त्याला अटक न करता त्याला वाचविण्याचा प्रयत्न मंत्री महोदय करीत आहेत. यामधून त्यांना जनतेला कोणता संदेश द्यायचा आहे ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

यातून कोणता मॅसेज देत आहात? आपण मेडिकल तपासणी केली. याचे कारण काय होते? त्या ढाब्यावर मारामारी झाली म्हणूनच मेडिकल तपासणीसाठी पाठविले होते. त्या संदर्भात गुन्हा काय नोंदविला आहे, मारहाण कोणाला झाली, अटक कोणाला झाली? हे सगळे सभागृहाला कळले पाहिजे. गृह खात्याच्या मागण्यांवर चर्चा करताना पोलीस कमी पडतात, अधिक पदे मिळाली पाहिजेत अशी आपण बाजू घेत असताना आज आपल्याच पोलीस दलातील एक कर्मचारी मृत झाला आहे, त्याची बाजू न घेता आरोपी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी त्याची बाजू घेत आहात. त्याला अटक करण्यासाठी काय करणार आहात हे सांगितले पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : मोठ्याने बोलले म्हणजे केस खरी होत नाही.

श्री.विनोद तावडे : पोलीस दलातील एक कर्मचारी मेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ढाब्यावर दारु पिऊन गेला होता अशी तक्रार केल्यामुळे त्यांची मेडिकल टेस्ट करण्यात आली. मेडिकल रिपोर्टमध्ये दारु प्यायल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांना यापूर्वी हृदयविकाराचा आजार होता त्यामुळे ते रुग्णालयात दाखल झालेले होते. उपचार घेत होते. त्यासाठी वेळोवेळी त्यांनी रजा घेतली होती. हे केसमध्ये स्पष्ट झालेले आहे. मारहाण झाल्याची तक्रार आहे ती पोलिसांनी नोंदवून घेतली आहे आणि त्याचा तपास सुरु आहे. त्याचा हार्टअटॅकने मृत्यू झाला की मारहाणीमुळे झाला हे जोपर्यंत मेडिकल सर्टिफिकेट येत नाही तोपर्यंत निश्चित होणार नाही.

श्री.दिवाकर रावते : मारहाणीची तक्रार आल्यामुळेच 327 कलम लावण्यात आले आहे. तुमचा अहवाल आला आणि त्यात मारहाणीमुळे मृत्यू झाला असे लिहिले असेल तर 302 कलम लावले जाईल. परंतु कलम 327 लावल्यानंतर अटक झाली पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, रोह्यामध्ये कार्यकर्त्यांना वाचविणारे, बीडमध्ये कार्यकर्त्यांना वाचविणारे हेच आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते म्हणत असतील तर कोणत्याही इम्पार्शल यंत्रणेकडे हा तपास देण्याची माझी एका पायावर तयारी आहे. परंतु हा आरोप खोटा ठरला तर माननीय विरोधी पक्षनेते काय शिक्षा भोगणार आहेत? ते विधानपरिषदेत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

पुन्हा कधीच बोलणार नाही का? या संदर्भात स्पष्ट आश्वासन सभागृहाला द्यावे. आपण सांगितले तर या केसचा तपास गुजरात पोलिसांकडून करवून घ्यायची माझी तयारी आहे. मला कोणाला पाठीशी घालायचे नाही. माझ्या विभागाचा कर्मचारी मेला आहे. मी कधी राजकीय कार्यकर्त्यांना पाठीशी घातलेले नाही. कोणावर चुकीच्या पध्दतीने कारवाई करणे मला योग्य वाटत नाही. त्याच्या अंगावर जखम नाही. मेडिकल सर्टिफिकेट येऊ द्यावे. मृत्यूचे कारण स्पष्ट होऊ द्यावे. मी सदनाला आश्वासन देतो की, मारहाणीमुळे मृत्यू झाला असेल तर यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांना कलम 302 खाली अटक होईल. आपण सांगत असाल तर सीआयडी, सीबीआय किंवा गुजरात पोलिसांकडे या केसचा तपास द्यायची माझी एका पायावर तयारी आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गुजरात पोलीस, सीबीआय यांच्याकडे तपास देण्याची तयारी दाखविण्यामुळे मंत्री महोदयांचे निर्दोषत्व सिध्द होत नाही. विरोधी पक्षाकडे जी माहिती प्राप्त होते त्या माहितीच्या आधारे आम्ही बोलण्याचा प्रयत्न करीत असतो. आम्ही काही विचारायचेच नाही असे शासनाला वाटते का? श्री.गोरे, जे माजी जिल्हा परिषद सदस्य आहेत. त्यांच्यावर कोणतीही केस नाही का? मी कधी खोटे किंवा चुकीचे बोलत नाही हे मंत्री महोदयांना माहिती आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य श्री.गोरे हा मंत्र्यांचा नातेवाईक आहे. टी.व्ही.वरील बाईटमध्ये जिल्हयातील लोकांनी त्याने मारहाण केली असल्याचे सांगितले आहे. त्याच्यावर एकही केस नाही असे म्हणत असाल तर मी त्या क्षणाला सभागृह सोडून जायला तयार आहे. माननीय गृहमंत्र्यांच्या घोषणा आम्हाला माहिती आहेत. सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याची त्यांनी घोषणा केली होती.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, तो एका पक्षाचा जिल्हाध्यक्ष आहे, तो राजरोस येतो, फिरतो, सामान्य माणसांमध्ये वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न करतो. ते खोटे असेल तर आपण त्या पध्दतीने सांगावे. म्हणजे तो प्रश्न मिटेल. मृत कर्मचाऱ्याच्या मुलांनी येऊन आम्हाला सविस्तर सांगितले. फोटो पाहिल्यानंतर विरोधी पक्षाला वाटले की, यात तथ्य आहे. मग आम्ही प्रश्न विचारायचे नाहीत का? प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पोलिसांना मारले जात आहे, ते खरे असेल तर असे प्रकार थांबले पाहिजेत यासाठी आम्ही पोटतिडकीने बोलत आहोत. हे बोलल्यानंतर मंत्री महोदयांनी भावनाविवश होण्याचे काही कारण नाही.

नंतर श्री.खर्चे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ......

नक्षलग्रस्त भागावरील चर्चेच्या वेळेस विरोधी पक्षांनी सुध्दा कोणतेही राजकारण न आणता माननीय गृह मंत्र्यांचे कौतुक केले. पण आम्हाला जी माहिती मिळाली त्याच्या आधारे सभागृहात आम्ही हा मुद्दा मांडत असताना अशा प्रकारे चॅलेंज करणे हे योग्य नाही. म्हणून आमची मागणी आहे की, आम्ही जी वस्तुस्थिती सांगितली ती मंत्री महोदयांनी तपासून पहावी.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सभागृहात बोलताना राष्ट्रवादी पक्षाचा कार्यकर्ता असल्याचे सांगून त्याला शासन पाठीशी घालते अशा प्रकारचा हेत्वारोप करण्यात आला म्हणून मी आपण सांगाल त्या यंत्रणेकडे तपास देण्याची तयारी आहे असे सांगितले. आपण आता सांगत आहात ती वस्तुस्थिती सांगितली असती तर शासनाकडून तसे स्पष्ट केले असते.

श्री. विनोद तावडे : मी कोणत्याही पक्षाचे नाव घेतलेले नाही........

श्री. आर.आर. पाटील : सभागृहात अशाच प्रकारचा हेत्वारोप झाला असून हा कार्यकर्ता काही दिवस आपल्याच पक्षात युवा मंचमध्ये होता, तो आयुष्यातील किती वर्षे आपल्या पक्षात होता आणि धुतल्या तांदळासारखा होता असे आपण सांगू शकता काय, असल्यास त्याचा हिशेब जनतेला अगोदर द्यावा.....

श्री. विनोद तावडे : हेच सरकारचे संरक्षण आहे असे आमचे म्हणणे आहे.

**उप सभापती** : सभागृहात एकाच प्रश्नावर किती वेळ चर्चा व्हावी यालाही मर्यादा असतात. मी आता नियम 93 अन्वये सूचना पुकारतो.

श्री. आर.आर.पाटील : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्या गांभीर्याने हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला त्याचा मेसेज सभागृहाच्या माध्यमातून चांगलाच गेला पाहिजे. या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, या संपूर्ण घटनेची इम्पार्शल, नि:पक्षपातीपणाने चौकशी होईल आणि त्यात आढळून आलेल्या दोषींना पाठीशी घालण्याची भूमिका शासनाकडून स्वीकारली जाणार नाही. तसेच हा तपास पोलीस करतील पण सीआयडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुध्दा त्यावर नियंत्रण ठेवण्यास सांगण्यात येईल. त्यांचा अंतिम अहवाल आल्यानंतर त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल, ज्यांनी चूक केली असेल त्या कोणालाही पाठीशी घालणार नाही अशी ग्वाही मी देतो.

----------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "मुंबईमध्ये निविदा न काढता बेरोजगारांना काम न देता बोगस मजदूर संस्थांच्या नावाने एक काम 5 ते 6 वेळा दाखवून 70 ते 80 कोटी रुपयांची केलेली लूट, गृह विभागाच्या वसाहतीसाठी व बांधकाम खात्यामधून मंजूर झालेला निधी एकाच कामासाठी वापरणे, तसेच एक काम 5 ते 6 वेळा कागदावर दाखवून एका बिल्डींग दुरुस्तीला 2 ते 3 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार मुंबई वरळी विभागाने केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "महाराष्ट्रातील 1981 च्या महाराष्ट्र सुरक्षा मंडळातील सुरक्षा रक्षकांना नव्याने अस्तित्वात आलेल्या सुरक्षा रक्षकांना सामावून घेण्यासाठी सुरक्षा रक्षकांनी दि. 12.3.2012 रोजी आझाद मैदान, मुंबई येथे सुरु केलेले आमरण उपोषण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वाळू/खडी वाहतुकीमध्ये देण्यात येणाऱ्या वाहतूक परवाना पासामध्ये खाडाखोड करुन शासनाचा महसूल बुडविण्याचा प्रकार उघडकीस येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "उल्हासनगर महापालिका शिक्षण मंडळाच्या वतीने सुरु असलेल्या विविध माध्यमांच्या प्राथमिक शाळांमध्ये 2011-12 या शैक्षणिक वर्षात गणवेश, पुस्तके, लेखन साहित्य, रेनकोट, बूट मोजे इ. साठी 3 कोटी रुपयांची तरतूद करुन व नुकतेच मागील आर्थिक वर्ष संपल्यानंतरही उपरोक्त वस्तुंचा पुरवठा अद्याप पर्यंत विद्यार्थ्यांना न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....3



PFK/ पूर्वी श्री. भोगले..... 01:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ......

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी "खताचे व्यापारी शेतकऱ्यांना लिंकींग पध्दतीने खताची विक्री करीत असल्यामुळे शेतकऱ्यांना खताच्या मूळ किंमतीपेक्षा अधिक किंमत मोजावी लागणे, शेतकऱ्यांची पिळवणूक लक्षात घेता खताच्या किंमतीत झालेली दरवाढ कमी करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "केंद्र शासनाच्या बजेटमध्ये नॉनब्रँडेड सुवर्णालंकारांवर उत्पादन शुल्क प्रस्तावित असल्याने संतप्त झालेल्या सराफांनी केलेले देशव्यापी आंदोलन " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आयुष डॉक्टरांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, डॉ. रणजीत पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य राज्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आयुष डॉक्टरांच्या माध्यमातून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामार्फत नवसंजीवनी योजना चालवली जाते. आयुष डॉक्टर हे पीएम,एमएलसी,सीएमओ, डीएमओ तसेच जनरल ड्यूटी करीत असतात. सदर डॉक्टर आयुर्वेदिक असतांना सुध्दा ते ॲलोपॅथीचे काम करतात. आयुर्वेदिक डॉक्टरावर रोज 5-10 रुग्णांवर आयुर्वेदिक उपचार करण्याचे कंपल्शन आहे.. आयुर्वेदिक डॉक्टरांना अन्य राज्यात 6 ते 7 तास करावे लागते तर आपल्या राज्यात 8 ते 10 तास काम करावे लागते तसेच या आयुर्वेदिक डॉक्टरांना कमी वेतन दिले जाते. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, 93 च्या सूचनेच्या उत्तरामध्ये आयुर्वेदिक डॉक्टरांना सन 2012-2013 या वर्षामध्ये 8 टक्के वाढ दाखवलेली आहे. आयुर्वेदिक डॉक्टर रुग्णालयातील सर्व कामे करीत असतात त्यामुळे आयुर्वेदिक डॉक्टरांचे वेतन किमान 25,000/- रुपये करण्याच्या संदर्भात शासन काही विचार करणार आहे काय ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, निवेदनामध्ये म्हटले आहे की, सोयी सुविधा व औषधांसाठी निधीची आवश्यकता आहे. त्यामुळे सोयी सुविधा व औषधांसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत ?

प्रा. फौजिया खान :सभापती महोदय, "आयुष" ही योजना राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राबविली जाते. यात बी.ए.एम.एस.,बी.एच.एम.एस.,बी.यु.एम.एस.त्यातील एम.डी.असणा-या डॉक्टरांना कॉन्ट्रक्ट बेसिसवर घेतले जाते. अशा प्रकारे 216 बी.ए.एम.एस., 196 बी.एच.एम.एस. व 110 युनानी डॉक्टर्स सेवा करीत आहेत. जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुगणालय तसेच ग्रामीण रुग्णालयात हे डॉक्टर्स काम करीत आहेत. पी.जी. पदविका धारक डॉक्टरांना 18,000/- रुपये व ग्रॅज्युएट डॉक्टर असेल तर त्यांना 14,000/- मानधन दिले जाते. 851 पीएचसीमध्ये 25 टक्के पदे बी.ए.एम.एस.साठी आरक्षित असून ते कार्यरत आहेत. आयुष अंतर्गत 805 डिस्पेन्सरीज असून त्या ठिकाणी सुध्दा हे डॉक्टर्स काम करीत आहेत व त्यांना अर्हतेनुसार दिले जाणारे मानधन कमी आहे.

सभापती महोदय, औषधांच्या संदर्भात केंद्र शासनाने दोन वर्षापासून निधी वितरित केला नव्हता पण आता 8 कोटी रुपये मंजूर केलेले असून हा निधी मिळाल्यानंतर औषधांचा प्रश्न मिटेल. आयपीएचएस मधून रुग्ण कल्याण समितीच्या पैशांमधून तसेच अनटाईड फंड, डीपीडीसीच्या फंड मधून औषधांसाठी खर्च करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: दाभा,ता.मंगरुळपीर, जि.वाशिम येथील बोगस शाळेला मान्यता देवून शासनाच्या तिजोरीवर मारलेला डल्ला या विषयाबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दाभा, ता.मंगरुळपीर येथील सरपंचानी शाळा चोरीला गेली आहे अशी तक्रार केली होती ते खरे आहे काय ? परंतु निवेदनात ही शाळा बंद आहे असे म्हटलेले आहे. एकाच गावात दोन्ही शाळांना परवानग्या देण्यात आल्या होत्या ही गोष्ट खरी आहे काय ? एकाच गावात ज्या अधिकाऱ्याने सर्व्हे न करता दोन शाळांना परवानगी दिली त्या अधिकाऱ्यावर कारवाई केली जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मंगरुळपीर मधील दाभा या गावात दोन शाळा आहेत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

महात्मा जोतिबा फुले विद्यालय या शाळेला सन 2005-2006 मध्ये कायम विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात आली होती. सन 2008 मध्ये नूतनीकरणा नुसार इयत्ता आठवीसाठी विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात आली होती. दुसरी शाळा स्व.गंगारामजी काळे विद्यालयास सन 2008-2009 मध्ये परवानगी देण्यात आली होती. लहान गाव असल्यामुळे महात्मा फुले या शाळेत सगळ्या मुलांना समयोजित केले आहे व शासनाकडे स्थलांतराचा प्रस्ताव पाठविला. त्यांना परवानगी मिळाली नसल्यामुळे ती शाळा बंद होती. आजही ती शाळा बंद आहे आणि एकाच शाळेमध्ये सर्व विद्यार्थी शिकत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासन दुसऱ्या शाळेला परवानगी देणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, त्यांचा स्थलांतराचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन 2012 च्या जूनमध्ये स्थलांतर करून शाळा आता अनुदानावर येणार आहे. तेथे शाळेची गरजच नव्हती. असे असताना आपण तेथे दोन शाळांना परवानगी दिली आहे. ती परवानगी रद्द करण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, तेथे शाळाच नाही. त्यामुळे स्थलांतराचा प्रस्ताव तपासून पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आधार कार्ड बाबत श्री.विनोद तावडे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आधार कार्डाच्या नोंदणीचे काम जानेवारी 2011 पासून सुरू झाले आहे. या कार्डाची नोंदणी करताना नागरिकांना असंख्य अडचणी येत आहेत. अनेकांनी नोंदणी करून सुद्धा अद्याप पर्यंत आधार कार्ड आले नाही, ही मुख्य अडचण आहे. विधान भवनात देखील आधार कार्ड नोंदणीचा कॅम्प घेण्यात आला होता. अनेकांनी आपली सर्व माहिती वेळच्या वेळी दिलेली आहे. अद्याप बऱ्याच जणांना आधार कार्ड मिळालेले नाही म्हणजे दिव्या खाली अंधार आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की, ज्यांची नोंदणी झाली आहे, त्यांना ठराविक दिवसात आधार कार्ड मिळालेच पाहिजे असे बंधन आपण त्या कंपन्यांना घालणार आहात काय ? ठराविक मुदतीत त्यांना काम केले नाही तर त्या कंपनीवर कोणती दंडात्मक कारवाई करणार आहात ? त्या कंपनीचे काम आपण काढून घेणार आहात काय, अशी काही आपली योजना आहे काय ? अपात्र नागरिकांना या कंपन्यांनी कार्ड इश्यू केली तर कोणती कारवाई करणार आहात ? अडीच कोटी पैकी 54 लाख शिधावाटप पत्रिका ह्या अपात्र, बोगस ठरल्या आहेत. शेवटी आधार कार्डाचा पुरावा हा अनेक गोष्टींसाठी मानला जाणार आहे. खोटे आधार कार्ड दिले गेले तर त्या कंपनीवर गुन्हेगारी स्वरूपाची गुन्हे दाखल करण्याची सोय आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आधार कार्ड प्रकल्प राष्ट्रीय पातळीवरील आहे. महाराष्ट्रात या प्रकल्पाचे काम सप्टेंबर 2009 पासून सुरू झाले. या 13 कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. या कंपन्यांचे फक्त एन्रोलमेंट करणे एवढेच काम आहे. बंगळूर येथे राष्ट्रीय पातळीवरील संस्था असून तेथे त्याचे प्रोसेसिंग होते. मग कलकत्ता येथून कार्ड पोस्ट करून ते लोकांना मिळते. यासाठी तीन टप्पे आहेत. या तिन्ही ठिकाणी अडचणी येत होत्या. या संबंधात राष्ट्रीय पातळीवर कालच एक परिषद झालेली आहे. आपल्याकडे जे प्रश्न उद्भवतात ते मुख्य

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

सचिवांनी, सचिव, तंत्रज्ञान यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहेत. बॉटल नेक कशा प्रकारे होत आहे ते त्यांच्या लक्षात आणून दिले आहे. त्याची नोंद घेण्यात आली आहे. त्यात त्यांनी दुरूस्ती केलेली आहे. आता पहिला फेज संपलेला आहे. आपण 4 कोटी आधार कार्डाची नोंदणी केलेली आहे.

यानंतर श्री.सरफरे......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

मला सभागृहाला सांगण्यास अभिमान वाटतो की, संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्याला पहिल्या क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे. यामध्ये राष्ट्रीय पातळीवर ज्या अनेक त्रुटी होत्या त्या दूर करण्याचा आपण निर्णय घेतला आहे. या बाबतची कार्यपध्दती लवकर पूर्ण व्हावी या करिता बेंगलोर येथील संस्थेमध्ये त्यांनी तांत्रिक दुरुस्त्या केलेल्या आहेत. यामध्ये एन्रोलमेंट जरी जास्त झाले असले तरी नंबर प्राप्त करुन घेण्याची संख्या 2 कोटी 83 लाख 94 हजार इतकी आहे. ही संख्या थोडी कमी असली तरी त्यामध्ये निश्चितपणे वाढ होईल. त्याचप्रमाणे मे 2012 पर्यन्त सर्व आधार कार्डांचे वाटप करण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये काही त्रुटी आढळल्या किंवा बोगस कार्डाचे प्रकार आढळले तरी बायोमॅट्रिक पध्दतीने या कार्डाची रचना करण्यात आली असल्यामुळे त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा बागायतदारांचे झालेले आर्थिक नुकसान याबाबत सर्वश्री रामदास कदम, परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ.विजयकुमार गावित (फलोत्पादन मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक दोन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, गेल्या दोन दिवसापासून कोकणामध्ये पाऊस पडत आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर आंब्याचे नुकसान झालेले आहे. या अगोदर आंब्यावर कीड पडल्यामुळे आंब्याचे कमी उत्पादन झाले. त्यामुळे झाडावर दहा टक्के आंबा शिल्लक होता तो देखील या पावसामुळे नाहीसा झालेला आहे. आंब्याच्या झालेल्या नुकसानीबाबत किती दिवसात सर्व्हे करण्यात येईल आणि नुकसान भरपाई म्हणून किती रक्कम देण्यात येणार आहे?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मागील आठ दिवसामध्ये हवामानातील बदलामुळे आणि गारा पडल्यामुळे, पाऊस पडल्यामुळे झालेल्या नुकसानीबाबत सर्व्हे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आठ दिवसामध्ये सर्वेक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर नेहमीप्रमाणे जी मदत दिली जाते त्याप्रमाणे मदत देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. तसेच, जे काही नुकसान झ ालेले आहे त्याबाबत मागील वेळी सांगितल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांकडे संबंधित आमदारांबरोबर एकत्र बसून विशेष बाब म्हणून ही मदत कशी देता येईल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मागील वेळी जाहीर करण्यात आलेली नुकसान भरपाई अजून शेतकऱ्यांना मिळालेली नाही. ती आपण किती दिवसात देणार आहात?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन 2008-09 आणि 2009-10 मध्ये नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली होती, तो संपूर्ण निधी आपण वितरित केलेला आहे. परंतु मागील वेळी सन 2010-11 मध्ये हवामानामध्ये बदल झाल्यामुळे नुकसान झाले होते त्यामध्ये अति थंडी पडणे किंवा अति उष्णता या बाबी नैसर्गिक आपत्तीमध्ये धरल्या जात नाहीत. या करिता विशेष बाब म्हणून मंत्री मंडळापुढे प्रस्ताव नेऊन मंत्री मंडळाची मान्यता घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील निवृत्ती वेतन धारक आर्थिक लाभापासून वंचित राहणे याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. गुलाबराव देवकर ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक तीन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील निवृत्त झालेल्या प्राध्यापकांच्या निवृत्ती वेतन अंशदानासंबंधी मुद्दा उपस्थित केल्यानंतर शासनाने आपल्या निवेदनामध्ये 67 कोटी 41 लक्ष 59 हजार रुपयांची मागणी प्रस्तावित करुन 54 कोटी 44 लाख 10 हजार रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे म्हटले आहे. असे असतांना सन 2011-12 या आर्थिक वर्षात सुधारीत अंदाजानुसार निवृत्तीवेतन विषयक खर्चासाठी 40 कोटी 92 लाख 27 हजार इतके पुरवणी अनुदान वितरीत करण्याचे आदेश काढले आहेत तर मग 54 लाख 44 हजार 10 हजार रुपयांची तरतूद करण्याचे कारण काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन 2011-12 च्या अर्थसंकल्पामध्ये आर्थिक तरतूद करण्यात आलेली असून हे निवृत्ती वेतन देण्याची कार्यवाही सुरु झालेली असून ती आठ ते दहा दिवसात पूर्ण होणार आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : अंधेरी येथील नवभारत सोसाटीची जागा खाजगी विकासकाला देणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, केशवराव मानकर, वि. प. स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अंधेरी येथील जुहू गल्लीजवळ वायरलेस रोडवर नवभारत सोसायटी आहे. या नवभारत सोसायटी आणि म्हाडा यांच्यामध्ये एक करार होऊन 1991 साली या सोसायटीची स्थापना झाली होती.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

याठिकाणी सोसायटीची स्थापना झाल्यानंतर ती 2000 मध्ये बरखास्त करण्यात आली. त्यानंतर तेथे श्री.केकाणे यांना प्रशासक म्हणून नेमण्यात आले आणि 2006 मध्ये श्री.केकाणे यांनाही बदलण्यात आले आणि त्याठिकाणी श्री.के.डी.पाटील यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आले. मध्यंतरीच्या काळामध्ये श्री.के.डी.पाटील आणि विकासक यांनी संगनमत केले व या सोसायटीतील पात्र लोकांना हाकलून देण्यात आले आणि अपात्र लोकांना घुसवण्यात आले. त्यानंतर एस.आर.ए. खाली योजना बनविण्यात आली. माझ्याकडे निवेदन आहे आणि त्यामध्ये म्हटल्याप्रमाणे ही अल्पसंख्यांक लोकांची सोसायटी आहे. परंतु तेथील लोक जागा सोडण्यास तयार नव्हते तेव्हा त्यांना गुंडाकरवी मारहाण करण्यात आली आणि या सोसायटीतून लोक कसे बाहेर जातील या दृष्टीने प्रयत्न करण्यात आला. ही सोसायटी बरखास्त करुन दहा वर्षाचा काळ मध्ये गेलेला आहे. मग माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, या कालावधीमध्ये सोसायटीची पुन्हा नव्याने निवडणूक का घेण्यात आली नाही? एवढ्या उशिरा निवडणूक का घेण्यात आली?

सभापती महोदय, मधल्या दहा वर्षाच्या काळामध्ये तेथील प्रशासकाने एका विकासकाला तयार करुन त्या सोसायटीची संपूर्ण जागा त्याला देण्याचा घाट घातला. त्याच्याबरोबर करार झाले आणि त्यामध्ये जे मूळ सभासद होते त्यांना अपात्र करण्यात आले आणि नंतर त्या सोसायटीमध्ये अनधिकृत सभासद घुसविले. मात्र ही सोसायटी अल्पसंख्यांकांची असल्यामुळे तेथे जे पात्र सभासद होते, त्यांना मारहाण करुन तेथे दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण केली. यामुळे त्या लोकांवर अन्याय झालेला आहे. याबाबतीत माझी एकच मागणी आहे की, या सोसायटीचे जे मूळ सदस्य होते त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने आपण या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे 2006 मध्ये नवीन प्रशासक म्हणून श्री.के.डी.पाटील यांची नेमणूक करण्यात आली. तद्नंतर जॉन रॉड्रीक्स यांनी तक्रार केल्यानंतर 2010 मध्ये तेथे रितसर निवडणुका घेण्यात आल्या आणि तेथे नवीन कमिटी अस्तित्वात आली. या निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये जी लोक सहभागी झाली नव्हती, त्यांनी 8 जुलै 2011 मध्ये हाय कोर्टामध्ये रिट पिटीशन फाईल केले. पण कोर्टाने ती रिट पिटीशन डिसमिस केली. त्यानंतर त्यांनी परत रिव्ह्यु पिटीशन 16 डिसेंबर रोजी केले आणि ते देखील कोर्टाने डिसमिस केले. त्यानंतर आता कोर्टासमोर एक नवीन रिट-पिटीशन आहे. त्यामुळे तो मुद्दा कोटामध्ये प्रलंबित आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर . . . .

सभापती महोदय, याबाबतीत ब्रिफींग घेत असताना एक वस्तुस्थिती लक्षात येते की, 2000 मध्ये श्री.केकाणे नावाच्या व्यक्तीची प्रशासक म्हणून नेमणूक केल्यानंतर त्यांनी सहा महिन्यामध्ये निवडणुकीची प्रक्रिया करावयास पाहिजे होती. परंतु त्यांनी सहा वर्षे वाट का पाहिली असाही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. श्री.केकाणे यांच्यानंतर श्री.के.डी.पाटील यांना का नेमण्यात आले? तसेच श्री.के.डी.पाटील हे सुध्दा 2006 नंतर चार वर्षे का थांबले हा देखील एक मुद्दा असून तो रास्त आहे असे मला वाटते. यामुळे याबाबतीत देखील योग्य ती चौकशी केली जाईल. जर यामध्ये काही अयोग्य झाले असेल, अनियमितता झाली असेल तर त्या-त्या संबंधित लोकांवर कारवाई केली जाईल.

----

. . . .2 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी.** : राज्यात गॅस सिलेंडरची निर्माण झालेली अभूतपूर्व टंचाई याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "राज्यात गॅस सिलेंडरची निर्माण झालेली अभूतपूर्व टंचाई" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो."

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील लक्षावधी गृहीणींच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. आज गॅस सिलेंडरचा तुटवडा प्रचंड प्रमाणात जाणवत आहे. याठिकाणी निवेदनामध्ये असे उत्तर देण्यात आलेले आहे की, "22 मार्च 2012 पासून त्यांच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी अचानक संप पुकारला होता आणि एलपीजीच्या सिलेंडर्सच्या पुरवठ्यावर याचा विपरीत परिणाम होत असल्यामुळे जीवनावश्यक वस्तू कायदा, 1955 आणि महाराष्ट्र अधिग्रहण (आणि नियंत्रण) मोटार वाहन कायदा 1965 च्या तरतुदीनुसार एलपीजी बल्क टँकर्स अधिग्रहित करण्याबाबतचे आदेश दिनांक 29 मार्च 2012 अन्वये राज्य शासनाने निर्गमित केले."याबाबतीत माझे दोन प्रश्न आहेत.

सभापती महोदय, पहिला प्रश्न असा आहे की, गॅस डिलर्सचा आणि बाकी संघटनांचे जे प्रश्न आहेत त्याबाबत संप सुरु होणार याची तुम्हाला कल्पना होती. अशा वेळी अगोदरच याबाबतीत मध्यस्थी करुन तोडगा काढण्याचे प्रयत्न केले असते तर यामध्ये काळाबाजार करणाऱ्या लोकांचे फावले नसते.त्यामुळे याबाबतीत आपण लवकर प्रयत्न का केले नाही ? याठिकाणी निवेदनातील पान क्र.3 वर सविस्तर उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "गॅस कनेक्शन सोबत शेगडी घेणे सक्तीचे करु नये. विक्रीस ठेवलेल्या साहित्याची पावती ग्राहकांना कोणत्याही परिस्थितीत देण्यात यावी." परंतु आमचा मुद्दा असा आहे की, याबाबतीत तुम्ही स्वतःच्या नात्यातील किंवा परिचयातील 25 नाही तर 10 महिलांना विचारले तरी समजेल की, गॅस सिलेंडर संपला आहे म्हणून फोन केल्यानंतर पलीकडून उत्तरच मिळत नाही. तुम्हाला 3 दिवसाचा क्यू आहे किंवा 8 दिवसांचा क्यू आहे असे रेकॉर्डडेड उत्तर मिळते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्रीमती रणदिवे. 01:50

डॉ.नीलम गोऱ्हे......

आम्ही तीन चार दिवसांनी येऊन स्वत: गॅस सिलेंडर जाऊ का या प्रश्नाचे देखील उत्तर मिळत नाही. गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई केली जात आहे असे आमच्या निदर्शनास आले आहे. म्हणून मी नाईलाजाने 93 अन्वये हा विषय उपस्थित केला होता. तेव्हा आपण या संबंधी हेल्पलाईन सुरु करावी. तेव्हा गॅस सिलेंडरचा पुरवठा झाला नाही हा दुकानदारांचा दावा किती खरा आहे हे स्पष्ट होईल. हा राजकीय प्रश्न नाही. सर्व गृहिणींच्या दृष्टीने हा महत्वाचा प्रश्न आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे, गॅस पुरवठ्या संबंधी प्रत्येक जिल्ह्यात हेल्पलाईन सुरु करण्यात येईल काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, हा केंद्र शासनाशी संबंधित विषय आहे. आयओसी, बीपीसीएल, एचपीसीएल या सर्व कंपन्या केंद्र शासनाशी संबंधित आहेत. वेस्टर्न रिजनमध्ये महाराष्ट्र, गुजरात, गोवा, मध्य प्रदेश, छत्तीसगड इत्यादी राज्ये येतात. वेस्टर्न रिजनमध्ये संप होता. वाहतुकदारांनी संप पुकारलेला आहे त्या बाबत लवकरात लवकर निर्णय घेतला पाहिजे अशी आम्ही केंद्र सरकारला विनंती केलेली आहे. केंद्र शासनाने आम्हाला सांगितले की, आपण देखील मिटींग घ्याव्यात. शासनाने देखील वाहतुकदारांच्या प्रतिनिधी सोबत तीन-चार बैठका घेतल्या. आता दिनांक 30 मार्च रोजी संप मिटला असून वाहतूक सुरु झालेली आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, गॅस एजन्सीबाबत अनेक तक्रारी येतात. तेव्हा गॅस एजन्सींना सूचना देण्यात आलेल्या आहेत की, प्रत्येक गॅस एजन्सीने गॅस सिलेंडर किती रुपयांना मिळेल याची माहिती देणारा फलक लावला पाहिजे. तसेच गॅस एजन्सी ग्राहकांना वेगवेगळ्या ॲक्सीसरीज घेण्याचा आग्रह धरतात, सिलेंडर पाहिजे असेल तर गॅस शेगडी घ्या वगैरे वगैरे अशा पध्दतीचा आग्रह ग्राहकांजवळ धरु नये अशा सूचना देखील देण्यात आलेल्या आहेत. ग्राहकांनी सिलेंडरचे वजन करुन मागितले तर तसे वजन करुन दिले पाहिजे इत्यादी सूचना गॅस एजन्सींना देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी हेल्पलाईन सुरु करण्या बाबत सांगितले. त्या बाबत सांगू इच्छितो की, केंद्र शासनाच्या मदतीने आम्ही तीन चार महिन्यापूर्वी मुंबईत हेल्पलाईन सुरु केलेली आहे आणि ती राज्यभरासाठी उपयोगात येईल.

**उप सभापती** : मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी आज जो पेहराव केलेला आहे त्यावर एक गुलाबाचे फूल लावल्यास आपण थोडे स्व.पंडित जवाहरलाल नेहरु सारखे दिसाल.

-------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : एक विशेष बाब म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी देत आहे.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्य शासनाने दिनांक 9 ऑगस्ट 2007 पासून राज्यातील ग्रामीण भागातील तंटे गाव पातळीवर मिटावेत आणि पोलीस विभागाचा कामावरील ताण हलका व्हावा म्हणून "महात्मा गांधी तंटामुक्त गाव" मोहीम सुरु केली. या मोहिमेमध्ये पत्रकारांचा सहभाग रहावा आणि प्रबोधनाचे काम जोमाने व्हावे या उदात्त हेतूने गृह विभागाने पत्रकारांसाठी राज्य विभाग व जिल्हा विभाग स्तरावर रोख स्वरुपाचे पुरस्कार जाहीर केले. हे पुरस्कार प्रत्येक वर्षी दिनांक 9 ऑगस्ट रोजी जाहीर होतात. गृह विभागाने 2007, 2008, 2009, 2010 पर्यत पत्रकारांना पुरस्कार जाहीर केले. परंतु सन 2010-2011चा पुरस्कार देताना महाराष्ट्र शासनाने दिनांक 20 जानेवारी 2012 रोजी अचानक बदल केला. पुण्यनगरीचे उप संपादक श्री.संतोष शिंदे यांना औरंगाबाद विभागीय स्तरावर 75 हजार रुपयांचा द्वितीय पुरस्कार विभागीय आयुक्त, अध्यक्ष असलेल्या समितीने दिनांक 9 ऑगस्ट 2011 रोजी जाहीर केला. लातूर पोलीस अधीक्षक कार्यालयाने दिनांक 12 जानेवारी रोजी त्यांना बोलावून धनादेश दिला. परंतु नंतर त्यातील 50 टक्के रक्कम म्हणजे 37 हजार रुपये परत मागितले आहेत.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल...

75 हजार रुपयाचा पुरस्कार देण्यात आला. सात महिन्यानंतर गृह विभागाला साक्षात्कार झाला आणि सदर पुरस्कार निम्मा-निम्मा देण्यासाठी 35,500 रुपये परत मागण्यात आले आहेत.

**उप सभापती** : यामध्ये औचित्याचा मुद्दा काय आहे?

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. पुरस्कार देण्यात आला आणि सात महिन्यानंतर तो पुरस्कार दोन पत्रकारांना निम्मा-निम्मा देण्यात आला आहे अशा प्रकारचे पत्र आलेले आहे. अशा प्रकारे पत्रकारांचा अवमान होऊ नये, एवढीच विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभगृहाच्या कामकाजा बाबत**

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना आता चर्चेला घ्यावयाच्या की, मध्यंतराच्या सुट्टीनंतर चर्चेला घ्यावयाच्या?

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, लक्षवेधी सूचना मध्यंतराच्या सुट्टीनंतर चर्चेला घेण्यात याव्यात. अन्यथा विधेयकावरील चर्चेसाठी सभागृहात कोणीही सन्माननीय सदस्य थांबणार नाहीत. त्यावेळी सभागृहात गणपूर्ती झाली नाही, तर ती माझी जबाबदारी राहणार नाही.

**उप सभापती** : असे असेल तर प्रथम विधेयके घेण्यात येतील.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात याव्यात त्यानंतर मध्यंतराची सुट्टी देण्यात यावी. त्यानंतर सभागृहात गणपूर्ती संबंधीचा मुद्दा उपस्थित करण्यात येऊ नये.

**उप सभापती** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरातील जुनाबाजार झोपडपट्टीला लागलेली आग

**मु. शी.** : पुणे शहरातील जुनाबाजार झोपडपट्टीला लागलेली आग यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"दिनांक 22 फेब्रुवारी 2012 रोजी पुणे शहरातील जुनाबाजार झोपडपट्टीला मध्यरात्रीच्या सुमारास लागलेली आग, यात काही दुकाने, गोदामे व झोपड्या जळून खाक होणे,यातील जळीतग्रस्तांची पर्यायी व्यवस्था केली नसल्याने नातेवाईके व शेजाऱ्यांकडे राहण्याची आलेली वेळ, त्यातच मुलांच्या परीक्षा आल्याने या झोपडपट्टीमधील विद्यार्थ्यांचे होत असलेले हाल, शहरात अशा प्रकारे झोपडपट्ट्यांना एसआरएकरिता जमिनी बळकाविण्यासाठी आगी लावण्याचे प्रकार अनेक ठिकाणी घडत असणे, अशा सर्व झोपडपट्ट्यांना लागलेल्या आगीची सीआयडीमार्फत चौकशी करुन कडक कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच जळीतग्रस्तांच्या निवाऱ्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याची तसेच त्यांना मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका,"

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे शहरात जुना बाजार, मंगळवार पेठ, काची वस्ती या नावाची झोपडपट्टी असून या झोपडपट्टीला आग लागलेली आहे.अग्नीशमन दलाच्या संदर्भात माझा प्रश्न आहे. एसआरए योजनेसाठी जमिनी लागतात त्यामुळे बहुतेक शहरांमध्ये असे चित्र आणि वस्तुस्थिती आहे की, एसआरए योजनेसाठी लागणाऱ्या जमिनींवरच्या झोपडपट्टीवासियांना हलविण्यासाठी या आगींचा उपयोग केला जातो. या ठिकाणी शॉर्ट सर्किटने आग लागलेली आहे असे मोघम उत्तर देण्यात आलेले आहे. या आगीचे नेमके कारण शोधण्याच्या संदर्भात सीआयडी चौकशी करणे गरजेचे आहे. अशा आगी विझवत असतांना त्या-त्या महानगरपालिकांनी दक्षता घ्यावयास पाहिजे. पुणे नगरपालिकेतील फायर ब्रिगेडच्या चिफ ऑफिसरचे पद एक वर्षापासून रिक्त आहे. तसेच त्यांना जी साधनसामुग्री लागते, ऑक्सिजनचे सिलेंडर्स किंवा फायरप्रूफ वेशभूषा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. कुठल्याही दाट वस्तीमध्ये आग लागल्यानंतर पाणी उपलब्ध करण्यासाठी लागणारी योजना नाही, अशा वस्त्यांमध्ये वाहने जाऊ शकत नाही. हायराईज बिल्डिंगमध्ये उंचपर्यत जाण्यासाठी ज्या शिडया लागतात त्या शिडयांची सुध्दा पुणे महानगरपालिकेकडे व्यवस्था नाही.

सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, पूर्ण जळालेल्या झोपडयांना प्रत्येकी रुपये,10,000/- बहुतांश जळालेल्या झोपडयांना प्रत्येकी रुपये 7,500/- आणि अंशत: जळालेल्या झोपडयांना प्रत्येकी रुपये 5,000/- देण्यात आलेले आहेत परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, पहिले तीन-चार दिवस या लोकांना कोणी तरी शिधा पुरवावा लागतो.शासनाचे पैसे मिळेपर्यंत चार-पाच दिवस या लोकांना भिकाऱ्यासारखी दुसऱ्यांकडून गरजेच्या वस्तुंच्या मदतीची अपेक्षा ठेवावी लगते. म्हणून घटना घडल्यानंतर पहिल्या तीन ते चार दिवसासाठी त्यांच्या मदतीचा काही भाग शिधा स्वरुपात देणार का आणि सदर घटनेची चौकशी सी.आय.डी.मार्फत करण्या बरोबरच अन्य ठिकाणी जेथे-जेथे अशा आगी लागतात त्या सर्व ठिकाणी चौकशीच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल का?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी दिनांक 22 फेब्रुवारी, 2012 रोजी पहाटे 1.00 च्या सुमारास आग लागलेली आहे अग्निशमन दलाच्या जवानांनी त्याठिकाणी तत्काळ जाऊन ही आग विझवलेली आहे. या आगीमध्ये 6 दुकाने आणि 18 झोपडया भस्मसात झालेल्या आहेत. प्रथमदर्शनी ही आग शॉर्टसर्किटमुळे लगल्याचे निष्पन्न झाले आहे. तत्काळ या लोकांची राहण्याची सोय करण्यात आली व सामाजिक संस्थांमार्फत त्यांना भांडी, कपडे,धान्य देण्याची व्यवस्था करण्यात आली.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

आणि महानगरपालिकेने त्यांना आर्थिक मदत देखील केलेली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी चौकशीच्या संदर्भात, अग्निशमन दलाच्या इक्विपमेंटच्या संदर्भात तसेच ज्यावेळी आग लागते त्यावेळी त्यांना शिधा स्वरुपात शासन ताबडतोब मदत देईल का असे तीन प्रश्न विचारले. त्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, ज्यावेळी ग्रामीण भागामध्ये अशी दुर्घटना घडते त्यावेळी महसूल विभाग त्यांना तत्काळ मदत करतो आणि ज्यावेळी शहरी विभागामध्ये अशा प्रकारची घटना घडते त्यावेळी तेथील जी लोकल ॲथॉरिटी असेल त्यांनी त्यांना मदत करणे अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, आपण बाकीची मदत देता परंतु अशी घटना घडल्यानंतर त्यांना तत्काळ प्राथमिक स्वरुपाची मदत दिली जावी जेणेकरुन त्यांनी कोणाच्या तोंडाकडे बघू नये. तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : गोंदिया जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये नियुक्त केलेल्या संगणक चालकांना चार-पाच महिन्यांपासून वेतन न मिळणे

**मु. शी.** : गोंदिया जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये नियुक्त केलेल्या संगणक चालकांना चार-पाच महिन्यांपासून वेतन न मिळणे यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोंदिया जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामपंचायतीमध्ये पंचायत समिती अंतर्गत संगणक चालकांची करण्यात आलेली नियुक्ती, या संगणक चालकांच्या नियुक्तीसाठी महाऑनलाईन या कंपनीला कंत्राट देण्यात येणे, या संगणक चालकांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेची कामे, तसेच अनेक रेकॉर्ड ऑनलाईन करण्याची कामे देण्यात आली असणे, परंतु काही दिवसांपूर्वी कंपनीकडून देण्यात आलेली इंटरनेट सुविधा खोळंबली असल्यामुळे संगणक चालकांना तालुक्याच्या ठिकाणी जाऊन ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड ऑनलाईन करावे लागत असणे, आज सदर संगणक चालकांना ४ ते ५ महिन्याचा कालावधी लोटूनही अद्याप वेतन देण्यात आले नसणे, त्यांच्यावर उपासमारीची आलेली वेळ लक्षात घेता, शासनाने त्यांच्या वेतनाची तात्काळ व्यवस्था करुन त्यांना प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेटची सुविधा पुरविण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री. जयंत पाटील ( ग्रामविकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात आलेल्या ई-गव्हर्नन्स अंतर्गत ई-पंचायत हा कार्यक्रम पंचायती राज संस्थांमार्फत संगणकीकरणाच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेला आहे. यामध्ये महाऑनलाईन कंपनीला या कामाची जबाबदारी दिलेली आहे. त्यामध्ये नेमणुका करण्याचा अधिकार महाऑनलाईनला आहे. त्यांचा पगार शासन देते. या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करीत असताना त्यामध्ये ग्रामपंचायतीचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप नसतो किंवा त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची विचारपूस केली जात नाही. ते कर्मचारी त्या ठिकाणी नेमले जातात. ही योजना अत्यंत चांगली आहे. एमआरइजीएसची कामे, तेराव्या वित्त आयोगाची कामे इंटरनेटच्या माध्यमातून तातडीने व्हावी यासाठी हे जे कर्मचारी नेमलेले आहेत त्या बाबतीत निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, जानेवारी, 2012 पासूनचे मानधन अदायगीबाबतची प्रक्रिया सुरु आहे. म्हणजे याच्या आधी त्यांना पेमेंट दिले गेले नाही. या संगणक परिचालकांना शासन किती वेतन देते आणि त्यांना दरमहा वेतन देण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

ग्रामपंचायतींना इंटरनेटने जोडावयाचे आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, ज्या ग्रामपंचायतींची इंटरनेट जोडणी काही तांत्रिक कारणास्तव होऊ शकली नाही त्या ग्रामपंचायतीसंबंधीची माहिती जवळच्या इंटरनेट जोडणी असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये किंवा तालुक्याच्या ठिकाणी जाऊन करणे अपरिहार्य ठरले आहे. म्हणजे त्यांना दुसऱ्या ठिकाणी जाऊन काम करावे लागते. म्हणजे इंटरनेटची जी सेवा आहे ती अत्यंत निकृष्ट दर्जाची आहे किंवा जे काही तांत्रिक दोष असतील ते तातडीने दुरुस्त केले जात नाहीत. म्हणून महाऑनलाईन कंपनीला सांगून इंटरनेटची जी व्यवस्था 24 तास त्या ग्रामपंचायतींना पुरविली जाईल या संबंधात शासन उपाययोजना करणार का ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रात राज्य सरकार आणि टाटा कन्सल्टन्सी या दोघांनी मिळून ही महाऑनलाईन संस्था स्थापन केलेली आहे आणि त्यांच्यामार्फत हा प्रकल्प राबविणे सुरु आहे. त्यामध्ये कॉन्ट्रॅक्टवर जो कर्मचारी घेतलेला आहे त्याला प्रत्यक्षात 3800 रुपये देण्यात येतात पण त्या स्टेशनरीचा वगैरे खर्च मिळून जवळपास 7705 रुपये आणि सगळे मिळून एकूण 8 हजार रुपये त्याला उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याचे प्रशिक्षण त्यांना दिलेले आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. जयंत पाटील .....

त्यांना जानेवारी, 2012 पर्यंतचे संपूर्ण मानधन देण्याची व्यवस्था झालेली आहे. हे मानधन आपल्या यंत्रणेमार्फत दिले जाते. फेब्रुवारी, 2012 चे मानधन देण्याची प्रक्रिया सुरु आहे. सभागृहाला हे सांगणे आवश्यक आहे की, यामध्ये कनेक्टिव्हिटीचा जो स्प्रेड होता त्यामध्ये गोंदियाचे उदाहरण घेतले तर त्या जिल्ह्यामधील 556 गावांपैकी 300 गावात बीएसएनएलने कनेक्टिव्हिटी आहे असे सांगितले त्यामुळे बीएसएनएलची यंत्रणा वापरली. नंतर असे लक्षात आले की, काही ठिकाणी त्यांची कनेक्टिव्हिटी चालत नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

म्हणून मूळच्या काही न चालणाऱ्या व उरलेल्या 311 गावामध्ये आयडियाची कनेक्टिव्हीटी एस्टॅब्लिश करण्याचा प्रयत्न केला. आता 556 गावात हे कव्हरेज होईल. सर्वदूर कनेक्टिव्हीटी मिळत नाही असे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये लक्षात आलेले आहे. त्यामुळे ज्या गावांची कनेक्टिव्हीटी वेगवेगळ्या कंपन्यांच्या माध्यमातून सुरु आहे. कोठे आयडियाचे कनेक्शन असेल, बीपीएलचे असेल किंवा इतर सेवा देणाऱ्या कंपन्यांचे असेल. तेथे ते ते कार्ड वापरण्याचे अधिकार स्थानिक स्तरावर देण्यात आलेले आहेत. तेथे कनेक्टिव्हीटी एस्टॅब्लिश करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

ऑक्टोबर-नोव्हेंबर या महिन्यांपासून ग्रामपंचायतींमध्ये कॉम्प्युटर इन्स्टॉलेशनचे काम केल्यावर या क्षेत्रात विशेष काम करण्यात आले आहे. 72 लाख 98 हजार 537 व्यवहार मागील आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींनी केले आहेत. त्यामधून 40 हजार 388 कोटी रुपयांच्या रिसीटस् आणि 42 हजार 265 कोटी रुपयांच्या पेमेण्टस्ची संगणकीय व्यवस्थेत नोंद करण्यात आली आहे. देशामध्ये महाराष्ट्र राज्य असे आहे की जेथे एवढ्या मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायत स्तरावर संगणकाचा वापर नुकताच सुरु केलेला आहे. ही व्यवस्था पुढील 3-4 महिन्यात स्टेबल होईल असा मला विश्वास आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, भारत निर्माण कार्यक्रमामध्ये ई-गव्हर्नन्स व ई-पंचायत हा कार्यक्रम समाविष्ट केलेला आहे. एक चांगला कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. परंतु या कार्यक्रमामध्ये कोणत्या अडचणी येत आहेत ते मी सांगतो. टाटा कन्सलटन्सी आणि महाराष्ट्र शासन यांनी मिळून संगणक परिचालक आणि हार्डवेअर इंजिनिअर व सॉफ्टवेअर इंजिनिअर पुरविण्याचे ठरविलेले आहे. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायतींकडून खर्च होणार आहे, या इंजिनिअर्संना ग्रामपंचायतच पगार देणार आहे. संगणक परिचारकांची नेमणूक त्या कंपनीने केलेली आहे. त्यामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. या कंपनीच्या एजंटनी पैसे घेऊन या लोकांच्या नेमणुका केलेल्या आहेत. नेमणूक करताना ग्रामपंचायतींना विश्वासात घेतलेले नाही. त्याचप्रमाणे संगणक परिचारक त्याच गावाचा असला पाहिजे असा नियम असताना बाहेरच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

लोकांची नेमणूक केली. तसेच या पदासाठी लायक नसलेल्या लोकांना संगणक परिचारक म्हणून नेमणूक केली आहे त्याची चौकशी केली जाईल काय आणि नेमणूक करीत असताना पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांना सुध्दा सामावून घेण्याचे बंधनकारक केले पाहिजे. तसे बंधनकारक करुन त्यानंतर नेमणुका करण्याचा निर्णय घेतला जाईल काय आणि बुलढाणा जिल्ह्यामध्ये संगणक परिचालकांच्या नेमणुकांची संपूर्ण चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मागील अधिवेशनात देखील हा प्रश्न विचारला होता हे माझ्या स्मरणात आहे. त्यावेळी मी सभागृहात माहिती दिली होती की, अशा स्वरुपाचे कोणी चुकीचे केले असेल तर त्याबाबत कारवाई करण्यात येईल. संगणक परिचालक त्याच गावातील असला पाहिजे अशी त्यांची मागणी आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : ही मागणी माझी नाही, नियमात तरतूद असल्याची माहिती मला बी.डी.ओं.नी दिली आहे.

श्री.जयंत पाटील : त्या गावात कोणी उमेदवार उपलब्ध झाला नाही तर कोणत्याही ठिकाणच्या उमेदवाराला नेमले पाहिजे. कारण कंत्राटी तत्वावर त्यांची नेमणूक केली जात आहे. गावातील माणूस असेल तर त्याची नेमणूक प्राधान्याने करण्याची सूचना गाईड लाईन्समध्ये दिलेली आहे. तसेच पैसे घेऊन परिचालकांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत अशी सन्माननीय सदस्यांनी तक्रार केलेली आहे. त्यावेळी त्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

सन्माननीय सदस्यांची स्पेसिफिक तक्रार असेल तर ती त्यांनी माझ्याकडे द्यावी.

संगणक चालकाची शैक्षणिक अर्हता काय असली पाहिजे हे स्पष्ट आहे आणि त्या पेक्षा कमी दर्जाचा माणूस नेमलेला नाही. तेव्हा या संदर्भातील काही स्पेसिफिक तक्रार असेल तर ती सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे दिली तर त्यामध्ये मी जरुर लक्ष घालीन. ही माणसे कॉण्ट्रॅक्टर नेमतो आणि ती दर्जेदार नसतील तर त्यांना बदलण्याचा अधिकार आपल्याला आहे. यांनी तालुका आणि ग्रामस्तरावरील सर्व यंत्रणा कार्यरत ठेवली पाहिजे. संगणक बंद पडलेले आहेत अशा प्रकारच्या तक्रारी अद्यापपर्यन्त आलेल्या नाहीत. या माणसांना नेमण्याचे कारण असे की, आम्हाला संगणकाचे ज्ञान नाही, आम्हाला काही कळत नाही या सबबीखाली गावातून तक्रारी येऊ शकत होत्या. केन्द्र सरकारने 11 सॉफ्टवेअर लोड केलेले आहे. प्रिया सॉफ्टवेअर आणि प्लॅन प्लस हे सॉफ्टवेअर देखील लोड केलेले आहे. हे संगणक चालक योग्य अर्हतेचे असले पाहिजेत, त्यांना मराठी टायपिंग आले पाहिजे, एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असले पाहिजेत. त्यांच्याकडून कोणी पैसे घेतलेले नाही यासंबंधी त्यांच्याकडून शपथपत्र घेतलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे कोर्टात कोणतीही केस प्रलंबित नाही.

श्री एस.क्यू.जमा :सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार ने भारत निर्माण योजना के अंतर्गत ई-गवर्नेंस का बहुत अच्छा प्रोजेक्ट हाथ में लिया है. माननीय मंत्रीजी ने ग्राम पंचायत से जुड़ने की ई-गवर्नेंस की योजना बनायी है. इसलिए मुझे पूछना है कि विदर्भ के 6 जिलों में जहां पर किसान ज्यादा आत्महत्या करते हैं, वहां के सौ प्रतिशत गांवों की कनेक्टिविटी चालू करने संबंधी काम को माननीय मंत्री महोदय प्रॉयर्टी देंगे या नहीं ?

दूसरी बात माननीय मंत्री महोदय ने कही कि जहां पर बीएसएनल की कनेक्टिविटी नहीं है, वहां पर दूसरी सर्विसेज की मदद लेंगे. हमारा कहना है कि बीएसएनल के पास बहुत ज्यादा फंड है, उनकी कॅपेसिटी भी काफी है. इसलिए हर गांव से बीएसएनएल की कनेक्टिविटी बढ़नी चाहिए, साथ ही लोन लेने की कॅपेसिटी बढ़ाने के बारे में आप बीएसएनएल के उच्च अधिकारियों एवं केंद्र सरकार से, इस बारे में कोई चर्चा करेंगे ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : बीएसएनएल ही केन्द्र सरकारची कंपनी आहे. त्या कंपनीने सर्व महाराष्ट्रात कनेक्टिव्हीटी आहे असे सांगितले म्हणून त्या कंपनीला पहिले प्राधान्य देण्यात आले. त्यानंतर त्या कंपनीने सांगितले की 10 हजार गावामध्ये कनेक्टिव्हीटी आहे. मग 10 हजार गावात कनेक्टिव्हीटी देण्यास सांगितले. परंतु संपूर्ण 10 हजार गावामध्येही कनेक्टिव्हीटी ती कंपनी देऊ शकली नाही. म्हणून तालुका आणि जिल्हा परिषद स्तरावर ज्यांची कनेक्टिव्हीटी आहे त्यांच्याकडून ती घेण्यास सांगितले आणि जेव्हा बीएसएनएलची कनेक्टिव्हीटी मिळेल त्यावेळी केन्द्र सरकारची ती व्यवस्था घ्यावी असे सांगितलेले आहे. यवतमाळ जिल्ह्यामध्ये आणि जेथे शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत अशा 6 जिल्ह्यामध्ये कनेक्टिव्हीटी जास्त प्रमाणात उपलब्ध व्हावी यासाठी केन्द्र सरकारला विनंती करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : हे जे संगणकीकरण करण्यात येत आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु ही यंत्रणा हाताळण्यासाठी, ग्रामपंचायतींचा कारभार चांगल्या त-हेने व्हावा यासाठी ग्रामसेवक पदवीधर असला पाहिजे. कृषी विद्यापीठामध्ये पदवीधरांना प्रवेश देऊन ग्रामसेवक तयार करा. केन्द्र सरकारच्या अनेक योजना थेट ग्रामपंचायत पातळीवर राबविल्या जातात. त्यासाठी ग्रामसेवक सक्षम असला पाहिजे. तेव्हा ग्रामसेवक पदाची शैक्षणिक अर्हता "पदवीधर" करण्यात येईल काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सुचविलेली सूचना चांगली आहे. सजेशन फॉर ॲक्शन म्हणण्याच्या पात्रतेची आहे असे म्हणणे अवघड आहे. ग्रामसेवकांचे क्वालिफिकेशन 12 वी उत्तीर्ण असे आहे. दहावी अधिक शेती शाळेचा डिप्लोमा अशी पूर्वी अट होती. ती अट बदलून आता 12 वी उत्तीर्ण अशी अट केली आहे. याबद्दल आंदोलने सुरु झाली आहेत. पदे भरण्याची जाहिरात काढली जाते त्यावेळी पदवीधर, द्विपदवीधर उमेदवार मिळू लागले आहेत. त्यामुळे माननीय सदस्यांनी केलेली सूचना तपासून पाहून मान्य करण्याचा प्रयत्न करता येईल काय हे पाहू.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लातूर येथे राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमांतर्गत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरामध्ये रुग्णांना शस्त्रक्रियेनंतर आलेले अंधत्व

**मु. शी.** : लातूर येथे राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमांतर्गत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरामध्ये रुग्णांना शस्त्रक्रियेनंतर आलेले अंधत्व यासंबंधी ॲड.उषा दराडे, सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, विक्रम काळे ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सर्वोपचार रुग्णालयात दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी १५ जणांवर मोतीबिंदूची तर दोघाजणांवर डोळ्याचा पडदा काढण्याची शस्त्रक्रिया करण्यात येणे, एका दिवसाच्या विश्रांतीनंतर सदर रुग्णांना घरी सोडण्यात येणे, मात्र एक सप्ताहानंतर तपासणी केली असता शस्त्रक्रिया सदोष झाल्याने डोळ्यासमोर अंधार झाल्याचे उघडकीस येणे, सदर प्रकरणी सदोष शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, तसेच शस्त्रक्रियेत संसर्ग झालेल्या रुग्णांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विजयकुमार गावीत (वैद्यकीय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये सुधारणा करु इच्छितो. निवेदनातील नवव्या ओळीतील "4 रुग्णांच्या" या शब्दांऐवजी "2 रुग्णांच्या" असे वाचावे. लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी सुधारणा केल्याप्रमाणे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3...

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, 15 डिसेंबर, 2011 रोजी 15 जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यापैकी 5 जणांना डोळे लाल होणे, डोळयात खुपणे असा त्रास सुरु झाला. त्या 5 पैकी 4 जणांना जे.जे.रुग्णालय, मुंबई येथे उपचारासाठी पाठविले. परंतु 3 रुग्णांना अंधत्व आले आहे. उर्वरित 2 रुग्णांना पूर्ण दृष्टी येणार आहे का? संबंधित डॉक्टरांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल काय? 1 लाख रुपये आणि 50 हजार रुपये आर्थिक मदत दिली त्यात वाढ करण्यात येईल काय?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, दिनांक 15.12.2011 रोजी 17 जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. दिनांक 16 डिसेंबर,2011 रोजी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. आठ दिवसानंतर एक रुग्ण त्या ठिकाणी आला त्याचा डोळा लाल झाला होता, डोळ्यात खुपत होते. 27 डिसेंबर, 2011 ते 1 जानेवारी, 2012 दरम्यान 5 रुग्णांच्या डोळ्यामध्ये इन्फेक्शन झाल्याचे दिसून आले. त्यामुळे दोन जणांवर पुन्हा शस्त्रक्रिया करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये सुधारणा होत नाही असे दिसून आल्यानंतर त्यांना 5 जानेवारी रोजी मुंबईत आणून शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यापैकी 2 रुग्णांना बोटे मोजता येतील एवढे दिसत असून उर्वरित 3 रुग्णांना व्यवस्थित दिसते. 10 ते 12 वर्षापूर्वी असा प्रकार घडला होता तेव्हा मुख्यमंत्री निधीतून 25 हजार रुपये मदत दिली होती. आता विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री निधीतून एका डोळ्यास अंधत्व आलेल्यांना 1 लाख रुपये आणि अंशत: अधत्व आले त्यांना 50 हजार रुपये आर्थिक मदत दिली आहे. या शिवाय ही प्रथा पडू नये म्हणून दोन नेत्र तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करीत आहोत. असा प्रकार घडल्यास किती भरपाई द्यायची याचा निश्चित आकडा ठरविला जाईल. संबधित डॉक्टरांना निलंबीत करण्यात आले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, रुग्णांना जंतू संसर्ग कशामुळे झाला? भविष्य काळात असे प्रकार घडल्यास भरपाई किती द्यावी याबाबत दोन सदस्यांची समिती नेमणार आहात. जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमाप्रमाणे 100 पैकी 10 शस्त्रक्रिया माफ असतात. तो नियम लक्षात घेऊन शासन कोणती भूमिका घेणार आहे?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, या रुग्णांना सुडोमॉनस ऑरगॅनिझममुळे संसर्ग झ ाला होता. डॉक्टरांना 100 पैकी 0.07 शस्त्रक्रिया माफ आहेत.

नंतर श्री.खर्चे...

अग्रधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित ............

या लोकांना घरी सोडल्यानंतर त्यांना इन्फेक्शन झाले व त्यानंतर 24 तासात पुन्हा रेफर करणे आवश्यक होते पण तसे संबंधित डॉक्टरांनी केले नाही म्हणून त्यांना निलंबित करण्यात आले.

--------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. मुख्यमंत्र्यांनी आदर्श सोसायटीसंबंधी सभागृहात केलेल्या खुलाशासंबंधी**

श्री. दिवाकर रावते : महोदय, आपण आम्हाला न्याय देता म्हणून मी आपल्या परवानगीने लक्षवेधी सूचनेशी संबंधित नसलेला एक मुद्दा उपस्थित करु इच्छितो. तो मुद्दा म्हणजे आम्ही वर्तमान पत्रातून नेहमी वाचत असतो तसेच गेले महिनाभर वाचत आहोत आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील आदर्श सोसायटीच्या बाबतीत सभागृहात खुलासा केला. या घोटाळ्यातील 9 आरोपी अटकेत आहेत पण त्यांना नक्की कोठे ठेवले आहे हे जाणून घ्यावयाचे आहे. या आरोपींना ऑर्थर रोड मध्ये ठेवले की, पोलीस स्टेशनमध्ये ठेवले आहे याची माहिती मिळाली पाहिजे. कारण सामान्य माणसाला जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात येते तेव्हा त्याला पोलीस लॉक-अप मध्ये किंवा पोलीस स्टेशनमधील बाकड्यावर बसविले जाते. पण या आरोपींना कदाचित हायमाऊंट सारख्या गेस्ट हाऊस मध्ये ठेवले की कोठे हे जाणून घ्यावयाचे आहे.

**उप सभापती** : आपल्यापैकी किती लोकांना तेथे जाऊन पहाण्याची इच्छा आहे हे सांगावे.

---------

........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 02:20

**पृ. शी**. : कोकणातील आंबा व काजू पिकाचे घटत चाललेले उत्पादन
**मु. शी**. : कोकणातील आंबा व काजू पिकाचे घटत चाललेले उत्पादन यासंबंधी श्री राजन तेली, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नैसर्गिक संकटांना तोंड देणारा सिधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातील बागायतदार अद्याप सावरला नसून वारंवार आलेल्या मोहोरामुळे सुरूवातीपासून आंबा बागायदारांना बसलेला फटका, यावर्षी फुलकीडी तसेच बऱ्याच कालावधीसाठी लांबलेली थंडी व तापमानातील बदल यामुळे आंबा पीक कमी तयार होऊन फळे झाडावरच खराब होऊन त्याची प्रचंड प्रमाणात गळ होणे, तसेच वाढत्या उष्णतेमुळे काजू पिकाचा मोहोर जळून जाणे, यावर्षी एकूण अपेक्षित उचलाच्या 10 टक्के इतके उत्पादन येणेही अपेक्षित नसणे, सन 2008-2009 व 2009-2010 या दोन वर्षींचा नुकसान भरपाईचा निधी प्राप्त झाला नसणे, सन 2010-2011 ची नुकसान भरपाई अद्याप जाहीर झाली नसणे व अजूनपर्यंत सर्व्हेही पूर्ण करून झालेला नसणे, आजपर्यंत झालेल्या नुकसानीपेक्षा यंदा फार मोठे नुकसान झाले असणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारात आंबा जाणे शक्य नसणे, नुकसानीमुळे नेस्तनाबूत झालेल्या आंबा, बागायतदारांच्या समस्यांवर तोडगा काढून अचानक उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्ती समस्यां निवारणासाठी शासनाने कायमस्वरुपी एक तज्ञ समिती गठीत करण्याची आवश्यकता या बागायतदारांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. विजयकुमार गावित (फलोत्पादन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

महोदय, मी आपल्या अनुमतीने लेखी निवेदनात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो :--

पहिल्या परिच्छेदातील शेवटच्या ओळीत "सन 2011-12 मध्ये तापमानातील बदलामुळे काजू पिकाचे नुकसान झालेले नाही" याऐवजी " सन 2011-12 मध्ये तापमानातील बदलामुळे काजू पिकाच्या नुकसानीबाबत सर्व्हे झालेला आहे" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

......4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सुधारित निवेदन सुधारल्याप्रमाणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : महोदय, अनेक वर्षे कोकणातील आंबा व काजूच्या संदर्भात हवामानातील बदलामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. यासंदर्भात कोकणातील बागायतदार माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांच्या मार्गदर्शनानुसार माननीय मुख्य मंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांना भेटले होते, तसेच आपणासही भेटण्याचा प्रयत्न केला. मंत्री महोदयांनी उत्तरात म्हटले आहे की, सन 2010-11 मध्ये तापमानातील बदलामुळे आंबा पिकाचा हंगाम उशीरा सुरु झाला तरी सद्य:स्थितीत बाजारपेठेवर त्याचा परिणाम झालेला नाही. पण अशा प्रकारचे उत्तर देणे म्हणजे एक प्रकारे बागायतदारांची चेष्टा आहे. सोमवार दिनांक 2 एप्रिल रोजी एकदम वातावरणात बदल होऊन कोकणात तसेच राज्यातही इतर ठिकाणी पाऊस पडला. अशा सर्व गोष्टींमुळे आंबा पीक अडचणीत आले आहे. त्यामुळे कोकणातील शेतकरी हवालदिल झाला आहे. या निमित्ताने माझा प्रश्न आहे की, कोकणातील बागायतदार माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्र्यांना भेटल्यानंतर त्यांनी आंब्याच्या नुकसानीसाठी 50 हजार रुपयाची मागणी केली आहे, ती शासन देणार काय, तसेच आंबा पिकाच्या नुकसानीचे पूर्णपणे सर्व्हेक्षण पुन्हा करुन ही नुकसान भरपाई अदा केली जाणार काय ?

मागील वर्षी मी याच प्रश्नावर औचित्याचा मुद्दा उपस्थित केला असता मला शासनाने उत्तर दिलेले आहे की, सन 2009-10 ची नुकसान भरपाई लवकरात लवकर देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे पण हा विचार कधी होणार आहे, त्याचबरोबर काल आपण आंबा बोर्ड सभागृहात जाहीर केले त्याबद्दल मी धन्यवाद देतो. पण कापूस किंवा ऊसाच्या बाबतीत नुकसान झाल्यानंतर तात्काळ नुकसान भरपाई जाहीर करण्यात येते त्याप्रमाणे वरील सर्व गोष्टींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन कोकणातील शेतकऱ्यांसाठी शासन मदतीचा हात पुढे करणार काय, तसेच तापमानातील बदल रोखण्यासाठी तज्ज्ञांची नियुक्ती करुन शेतकऱ्यांना त्यानुसार मार्गदर्शन करण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन 2011-2012 चा उल्लेख करण्यात आला नसून सन 2010-2011 चा उल्लेख करण्यात आलेला आहे. सन 2010-2011 मध्ये तापमानात बदल झाला होता व यासंदर्भात जो सर्व्हे झाला त्यामध्ये हवामानाच्या बदलामुळे आंबा पिकाचे नुकसान झाले होते व त्यामुळेच ही नुकसान भरपाई देता आली नाही. नैसर्गिक आपत्तीमध्ये आपण नुकसान भरपाई देत असतो परंतु नैसर्गिक आपत्तीचे जे काही ट्रिगर दिलेले आहेत त्यामध्ये तापमान येत नाही. कमी तापमान किंवा जास्त तापमानामुळे नुकसान झाले असेल तर अशा वेळेस नुकसान भरपाई दिली जात नाही. मंत्रिमंडळात जेव्हा हा विषय उपस्थित करण्यात आला होता त्यावेळेस थंडी जास्त पडल्यावर किंवा उष्णता जास्त पडल्यानंतर नुकसान भरपाई द्यावयाची की, नाही याबाबत चर्चा झाली होती परंतु यासंदर्भात नंतर ठरवू म्हणून सांगितल्यामुळे यावर निर्णय होऊ शकला नाही.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, गेल्या 8-10 दिवसामध्ये राज्याच्या काही भागात पाऊस तर काही ठिकाणी गारा व वादळ आले होते. यामध्ये जे काही नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात सर्व्हे करुन त्याचा अहवाल आल्यानंतर निश्चितपणे कार्यवाही केली जाईल. तापमान तसेच अवेळी पावसाच्या संदर्भात प्रायोगिक तत्वावर विमा पध्दत सुरु केलेली आहे. विम्याच्या संदर्भात ट्रिगरच्या माध्यमातून अवेळी पाऊस आणि जास्त तापमानाचा उल्लेख केलेला आहे. या वर्षी कोकणामध्ये तापमानाची वाढ होत असून त्याचा दिलासा कोकणातील आंबा उत्पादकांना होणार आहे. तरी सुध्दा यामध्ये अजून काय सुधारणा करता येईल याबाबत तज्ज्ञ मंडळींबरोबर बसून निर्णय घेतला जाईल. तापमानात जे काही बदल होतील त्यामध्ये मदत देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांना शिष्टमंडळे भेटलेली आहेत. नुकसानीच्या संदर्भात सर्व्हेचा रिपोर्ट आल्यानंतर नुकसान भरपाई दिली जाईल, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन 2008-2009,2009-2010 ची नुकसान भरपाई कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना अद्याप पावेतो मिळालेली नाही. ही नुकसान भरपाई शासनाने जाहीर केलेली आहे परंतु शेतक-यांपर्यंत ती गेलेली नाही. गेल्या चार वर्षापासून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सातत्याने हा मुद्दा या सभागृहात उपस्थित केला जातो आहे. परंतु यांना भेटले, त्यांना भेटले, ते असे म्हणाले असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी न देता कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना हेक्टरी 50,000/- रुपये दिले जातील अशी घोषणा करणार आहात काय ? असे झाले नाही तर शेतकरी पूर्णपणे संपल्यानंतर यांचा सर्व्हे येईल. सन 2007-2008 मध्ये आंबा पिकाचे जे नुकसान झाले होते त्यासाठी 13 कोटी रुपये नुकसान भरपाई शासनाने मंजूर केली होती परंतु ती शेतक-यांना न मिळाल्यामुळे शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. सात-बाराच्या उताऱ्यावर 25/25 लोकांची नावे असल्यामुळे ते सर्व लोक त्यासाठी उपस्थित न राहू शकल्यामुळे नुकसान भरपाई दिली गेली नाही असे शासनातर्फे सांगण्यात आले होते. त्यामुळे आंबा उत्पादक शेत-याचे जे 13 कोटी रुपये नुकसान भरपाई द्यावयाची राहून गेली होती नवी मुंबईतील व्हेपर हीट ट्रीटमेंट प्लँटसाठी त्यातील काही पैसे दिले जाणार आहेत काय ? जे पैसे आंबा उत्पादकांसाठीचे होते त्यातील काही पैसे आंबा उत्पादकांच्या प्रयोगासाठी खर्च केले जाणार आहेत काय ? तसेच आंबा उत्पादक शेतक-यांसाठी प्रती हेक्टरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई घोषित केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी वारंवार तापमाना मध्ये बदल होत असल्यामुळे तज्ज्ञ समिती स्थापन करणार काय अशा प्रकारचा प्रश्न विचारला होता. त्या संबंधी मी असे सांगू इच्छितो की, अशा प्रकारची तज्ज्ञ समिती निश्चितपणे निर्माण केली जाईल. त्याच बरोबर त्यांना लागणारा निधी देखील उपलब्ध करून दिला जाईल. आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई देण्यासंबंधी मी या पूर्वी सांगितल्याप्रमाणे अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांकडे, माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे सर्व आमदारांची बैठक घेऊन निधी देण्या बद्दलचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आज येथे घोषणा केली पाहिजे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, नैसर्गिक आपत्ती मध्ये नुकसान झाले असेल तर आपण मदत जाहीर करतो. सदर बाब या निकषात बसत नसल्यामुळे एक विशेष बाब म्हणून या संबंधीचा निर्णय माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या समवेत बसून घ्याव लागेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण देखील कोकणातील आहात. चार वर्ष कोणातील आंबा बागायतदारांना मदत केली जात नाही. कापूस, सोयाबीन, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मदत केली जाते. कोकणातील आंबा बागायतदार मात्र निकषात बसत नाही.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आपण आंबा व काजू या पिकांचा प्रायोगिक तत्त्वावर विमा काढला आहे. पुढच्या वर्षी पासून तो सर्व जिल्ह्यांना लागू करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गेली चार वर्षे शासन कोकणातील आंबा बागायतदारांना मदत करत नाही. शासन कोकणाला नेहमीच सापत्नभावाची वागणूक देते.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन 2008-2009 आणि 2009-2010 या दोन वर्षांची मदत दिलेली आहे. मागच्या वर्षी तापमानाच्या बदला मुळे आंबा पिकावर परिणाम झालेला आहे. ही नैसर्गिक आपत्ती नसल्यामुळे एक विशेष बाब म्हणून मदत देण्यासंबंधीचा विषय मंत्रिमंडळा पुढे आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत बहिर्गमन करतात.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पदवीस्तरावरील अनुदान प्राप्त विज्ञान शाखेत शिकविल्या जाणाऱ्या संगणक, इलेक्ट्रॉनिक्स आणि शारीरिक शिक्षण या सारख्या वैकल्पिक विषयात अनुदान देण्यास होत असलेला विलंब

**मु. शी.** : पदवीस्तरावरील अनुदान प्राप्त विज्ञान शाखेत शिकविल्या जाणाऱ्या संगणक, इलेक्ट्रॉनिक्स आणि शारीरिक शिक्षण या सारख्या वैकल्पिक विषयात अनुदान देण्यास होत असलेल विलंब या संबंधी श्री.वसंतराव खोटरे,प्रा.दिलीपराव सोनवणे सर्वश्री विक्रम काळे, एम.एम.शेख,चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पदवीस्तरावरील अनुदान प्राप्त विज्ञान शाखे अंर्तगत शिकवल्या जाणाऱ्या संगणक शाखा इलेक्ट्रॉनिक्स आणि शारीरिक शिक्षण यासारख्या वैकल्पिक विषयात अनुदान देताना होत असलेला विलंब, मा.उच्च शिक्षण मंत्र्यांनी या महाविद्यालयांना अनुदानावर आणले जाईल असे आश्वासन देऊन ही अद्याप पर्यंत शासन निर्णय निर्गमित करण्यास होणारी टाळाटाळ, परिणामी शैक्षणिक संस्थावर होणारा आर्थिक ताण मा. उच्च न्यायालयाने याबाबत याचिका क्रमांक 3510/2010 बाबत दिनांक 18 जानेवारी,2011 रोजी दिलेल्या निर्णयानुसार अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई झालेली नसल्यामुळे शिक्षकामध्ये निर्माण झालेला संभ्रम, शासना विषयी पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरूस्ती करू इच्छितो.

..3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत.....

सभापती महोदय, निवेदनाच्या शेवटच्या ओळीमध्ये "सदर बदलास माननीय मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येत आहे." असे नमूद करण्यात आले आहे. त्या ऐवजी "माननीय मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळाली असून या संबंधी आज संध्याकाळ पर्यंत किंवा जास्तीत जास्त सोमवार पर्यंत शासन निर्णय निर्गमित होईल." असे वाचावे.

**उप सभापती** : सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत खोटरे : सभापती महोदय, सर्वप्रथम मी माननीय उच्च शिक्षण राज्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. सदर प्रलंबित प्रश्न 15 वेळा सभागृहात आलेला आहे. शासन या संबंधातील शासन निर्णय 2-4 दिवसात निर्गमित करणार आहे. त्यामुळे मी शासनाला धन्यवाद देतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी आता आपणास मान्यता दिलेली आहे. दिनांक 1.4.2000 पासून अनुदान देण्याबाबतचा शासन निर्णय काढणार आहात काय ? कारण 1.4.2000 पासून अनुदान देणार असे ठोस आश्वासन दिले होते.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, दिनांक 1.4.2012 पासून अनुदान देण्याचा निर्णय मंत्रिमंडळामध्ये झालेला आहे. त्याच अनुषंगाने शासन निर्णय आज निर्गमित होत आहे.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, यह विषय काफी समय से पेंडिंग है. मैं शासन को धन्यवाद देता हूं कि अब यह सन् 2012 से शुरु हो जाएगा. लेकिन इसी तरह के प्रश्न का एक उत्तर आपने पिछले साल दिया था कि नागपुर में मॉयनारिटी के जो कॉलेज हैं, जैसे हिसलॉप कॉलेज जो कि क्रिश्चियन कम्युनिटी का है. कम्पयूटर साइंस एण्ड इलेक्ट्रानिक्स साइंस की कट ऑफ डेट 1988-89 है. वह कॉलेज उससे पहले का होने के बाद भी उनको नहीं दिया गया. आपने 1988-89 कट ऑफ डेट दी थी कि जो उनसे पहले के हैं, उनको दिया जाएगा और 1988-89 के लोगों को नहीं नहीं दिया जाएगा. अब आप निर्णय कर रहे हैं कि सन् 2012 से दिया जाएगा. मेरा कहना है कि 1988-89 से पहले से होने के बाद भी आपने मॉयनारिटी कम्युनिटी के इन्स्टीटयुशन को परमीशन दी. लेकिन उनको आपने ग्रांट नहीं दी. क्या उस बारे में आप कोई उचित निर्णय करेंगे ?

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मंत्री मंडळामध्ये झालेल्या निर्णयानुसार संपूर्ण महाराष्ट्रामध्ये किती कॉलेजमध्ये असे कोर्सेस सुरु आहेत यासंबंधी सर्वकष अभ्यास करुन निर्णय घेण्यात आला आणि त्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून आमच्याकडे माहिती पाठविण्यात आली. त्या माहितीच्या अनुषंगाने संगणक शास्त्राची 100 पदे, इलेक्ट्रिकलची 13 पदे, शारीरिक शिक्षणची 41 पदे अशी एकूण 261 पदे महाविद्यालयामध्ये अनुज्ञेय ठरतात. त्या पदांसाठी हा निर्णय लागू असून तो दिनांक 1.4.2012 पासून लागू करणार आहोत. सन 2000 पर्यंत जेवढया कॉलेजेसना विना अनुदानित तत्वावर मान्यता दिली होती त्या सर्व कॉलेजेसना याचा फायदा मिळणार आहे. आपण सन 2001 पासून कायम विना अनुदानित तत्वावर कॉलेजेसना मान्यता दिली होती त्यापूर्वी जेवढी कॉलेजेस होते त्या सर्वांना हा निर्णय लागू होणार आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. मंत्री महोदय मोठया शिक्षण संस्था चालवीत असल्यामुळे त्यांना शिक्षणाची दृष्टी आहे. जुलै 2007 च्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता व त्यावर अर्धा तास चर्चा करण्यात आली होती. आता नऊ महिने झाले आहेत, आपल्याला माहीत आहे की, नऊ महिन्यानंतर नवीन जन्म होतो. नऊ महिन्यानंतर मंत्री मंडळाने 17.40 कोटींना मान्यता दिली आहे. प्रत्यक्षात 8 कोटी रुपये खर्च होणार आहेत. म्हणजे मान्यतेपेक्षा खर्च कमी होणार आहे. तरी सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांची सही घेण्यासाठी नऊ महिने लागले असे आपण म्हणता. प्रश्न असा आहे की, मंत्री महोदय, बाणेदारपणा दाखवून आजचे सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी किंवा सोमवारपर्यंत हा आदेश सभागृहाच्या पटलावर ठेवणार काय?

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे आजच माननीय मुख्यमंत्र्यांची मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यामुळे आज संध्याकाळपर्यंत आदेश निर्गमित होतील किंवा जास्तीत जास्त सोमवारपर्यंत आदेश निर्गमित होतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु जे मान्यताप्राप्त कोर्सेस आहेत त्यांच्या विद्यार्थ्यांना फी माफी किंवा शिष्यवृत्ती मिळते ती व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मिळत नाही. म्हणून या विभागासाठी सुध्दा हा निर्णय लागू करणार काय?

श्री. डी. पी. सावंत : ही बाब तपासून घेण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

## विशेष उल्लेख

**पृ. शी./मु. शी.** : मराठी मालिकांच्या चित्रीकरणासाठी देण्यात येत असलेली 50 टक्के सवलत बंद करणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"सभापती महोदय, हा विशेष उल्लेख चित्रपट सृष्टीसंबंधी असून आमच्या चित्रपट सेनेचे अध्यक्ष श्री. अभिजित पानसे यांनी मागणी केली आहे की, मराठी मालिकांच्या चित्रीकरणासाठी राज्य सरकार पूर्वी 50 टक्के सवलत देत होते ती सवलत आता बंद करण्यात आली आहे. त्यामुळे मराठी मालिकांच्या चित्रीकरणामध्ये अडचणी येत आहेत. त्यामुळे यापुढे देखील महाराष्ट्र शासनाने मराठी मालिकांच्या निर्मितीसाठी 50 टक्के सवलत द्यावी अशी विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे."

**उप सभापती** : या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, माझ्याकडे देखील या संदर्भात एक तक्रार प्राप्त झालेली आहे. हिंदी मालिकांच्या निर्मितीसाठी 50 टक्के सवलत आज देखील दिली जाते. परंतु आपली मराठी मंडळी ज्या ठिकाणी चित्रीकरणासाठी जातात त्या ठिकाणचे व्यवस्थापक हे त्यांच्याबरोबर अतिशय उद्दामपणे वागतात अशाप्रकारच्या अनेक तक्रारी आहेत. तेव्हा शासनाने पहिल्या प्रथम त्या व्यवस्थापकांवर कारवाई करुन त्यांना त्या जागेवरुन दूर केले पाहिजे. या ठिकाणी माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मी स्वत: देखील सांस्कृतिक संचालकांना एक पत्र लिहिले आहे. आपल्या मराठी कलावंताना अशाप्रकारची वागणूक मिळत असेल आणि त्यांना अशाप्रकारे सवलती नाकारल्या जात असतील तर ती अतिशय खेदाची बाब आहे. या बाबत मंत्री महोदयांनी तत्काळ कृती करुन पुढील आठवडयामध्ये या सभागृहामध्ये निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. (श्रीमती) वर्षा एकनाथ गायकवाड : सभापती महोदय, आपण या ठिकाणी सांगितलेली बाब गंभीर स्वरुपाची असून त्या संदर्भात माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या माध्यमातून निवेदन करण्यात येईल.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, गेल्या महिन्यापर्यंत मराठी मालिकांसाठी भाड्यामध्ये सवलत दिली जात होती.पण अचानकपणे तेथील अधिकाऱ्यांच्या मनात काय आले ते माहिती नाही.

**उप सभापती** : त्याठिकाणी श्री.सैनी नावाचे अधिकारी आहेत.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मराठी मालिकांसाठी भाड्यामध्ये जी सवलत दिली जात होती, ती सवलत बंद करण्याचे काहीही कारण नव्हते. अचानक ही सवलत बंद केली. मराठी मालिकांचे जे निर्माते आहेत, त्यांची त्या मालिकेमध्ये असलेली एकूण इन्व्हेस्टमेंट आणि त्यांना मिळणारा जो फायदा आहे त्यातून जर हा भाग वगळला तर आपल्या चित्रनगरीमध्ये मराठी मालिकांची होत असलेली निर्मिती थांबेल.त्यादृष्टीने हा अतिशय महत्वाचा विशेष उल्लेख असल्याने याबाबतीत त्वरित कारवाई व्हावयास पाहिजे.

**उप सभापती** : या विषयाच्या बाबतीत पुढच्या आठवड्यात शासनाकडून केलेल्या कार्यवाहीसह निवेदन करण्यात येईल काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, होय. याबाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना माहिती देईन.

-----

. . . .2 क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : पावसाळ्यामध्ये वृक्ष पडल्यामुळे होणारी मनुष्य हानी टाळण्यासाठी जुन्या वृक्षांचे ऑडीट करणे याबाबत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आपण मला विशेष उल्लेख मांडण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबईमध्ये पावसाळ्यात अनेक वृक्ष पडतात. आपल्याला आठवत असेल की,गेल्याच वर्षी सी-आर-2 मॉल आहे आणि तेथे आयनॉक्स थिएटर आहे, त्याच्या शेजारी असलेले मोठे झाड पडल्याने काही लोक मृत्यूमुखी पडले. आज मुंबईमध्ये अशा प्रकारची अनेक जुनी झाडे आहेत आणि त्याचे आपण संवर्धन करतो, त्याची जोपासना करतो.पण त्यातील काही वृक्ष हे धोकादायक परिस्थितीमध्ये आहेत. आपल्याकडे पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून वृक्षतोडीला बंदी आहे. पण मुंबईमध्ये एकंदर किती वृक्ष आहेत आणि त्यातील किती वृक्ष धोकादायक स्थितीमध्ये आहेत याचे कधीही ऑडीट झालेले नाही. कदाचित हे वृक्ष इमारतींवर किंवा माणसांवर पडतील, गाड्यांवर पडतील आणि त्यामुळे मनुष्यहानी, वित्त हानी आणि इमारतींची हानी इ.गोष्टी होऊ शकतात.त्यामुळे माझी या सभागृहाच्या मार्फत विनंती आहे की, जर आपल्याला येत्या पावसाळ्या-मध्ये वृक्ष पडल्यामुळे होणारी मनुष्य हानी वाचवावयाची असेल तर जुन्या वृक्षांचे ऑडीट होणे महत्वाचे आहे आणि आपण तशा प्रकारचे ऑडीट कराल अशी अपेक्षा मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून व्यक्त करीत आहे.

-----

. . . .2 क्यु- 3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: बीड जिल्ह्यातील शिरुर कासार तालुक्यातील डोंगरी
भागामध्ये चारा, पाणी यांच्या अभावामुळे वन्य प्राण्यांचे
होत असलेले मृत्यू याबाबत सन्माननीय सदस्या ॲड.
उषाताई दराडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने खालील महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

बीड जिल्ह्यातील शिरुर कासार तालुक्यातील डोंगरी भागामध्ये वन्य प्राण्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी वन खात्याने गेल्या चार वर्षामध्ये पाणवठे बनविण्यास प्रारंभ केला. मात्र ते योग्य ठिकाणी न उभारल्याने त्यात पाणी साठून राहिले नाही. त्यामुळे सदर साठ्याचा फायदा वन्य प्राण्यांना झाला नाही. त्यामुळे डोंगरी भागासह माळ रानातील वन्यप्राणी पठारावर आले. परिणामी मोरांची शिकार फार मोठ्या प्रमाणावर झाली. याशिवाय चारा, पाणी यांच्या अभावामुळे वन्य प्राण्यांचे होत असलेले मृत्यू याबाबत सर्वेक्षण करुन वन्य प्राण्यांची शिकार होऊ नये व त्यांना चारा-पाणी मिळावा यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना.

------

. . . .2 क्यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी./मु.शी. : केंद्र शासनाकडून माध्यमिक शाळांना सर्वशिक्षा

अभियानाअंतर्गत मदत न मिळणे याबाबत
सन्माननीय सदस्य श्री.सुधीर तांबे यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, याठिकाणी आपण मला विशेष उल्लेख मांडण्यासाठी परवानगी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, राज्यात सर्वशिक्षा अभियान प्राथमिक बरोबर माध्यमिक विभागालाही लागू झालेले आहे.परंतु महाराष्ट्रातील बहुतांशी ज्या माध्यमिक शाळा आहेत, त्या खाजगी शिक्षण संस्थांतर्फे चालविल्या जातात. वस्तुत: या सर्व शाळांना शासनाकडून अनुदान मिळते. त्यामुळे केंद्र शासनाकडून या माध्यमिक शाळांना सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकत नाही. आज वेतनेतर अनुदानही बंद आहे. त्यामुळे या खाजगी शाळा असल्या तरी त्या शासनाच्याच माध्यमातून चालविल्या जातात अशा प्रकारची भूमिका केंद्र शासनाकडे मांडण्याची गरज आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे गायरानच्या ज्या जागा आहेत त्या नुकत्याच देण्यात आलेल्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे खाजगी शाळांना इमारतीसाठी उपलब्ध होत नाहीत. याबाबतीत देखील सुप्रीम कोर्टामध्ये स्पष्टीकरण मागणे गरजेचे असून त्यासाठी राज्य शासनाने विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करतो. धन्यवाद.

------

2क्यु-5 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी./मु.शी. : पुणे शहरातील एन.ए.टॅक्स महसूल विभागाऐवजी
महानगरपालिकेने वसूल करण्याबाबतच्या अध्यादेशाची

होत असलेली टाळाटाळ याबाबत सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

पुणे शहराच्या हद्दीतील अकृषिक कर म्हणजे एन.ए.टॅक्स हा महसूल विभागाऐवजी महानगरपालिकेने वसूल करावा असा अध्यादेश राज्य शासनाने चार वर्षापूर्वी काढूनही अद्याप महसूल विभाग अंमलबजावणी करण्यामध्ये टाळाटाळ करीत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी..

महानगरपालिकेने महसूल विभागाकडे वारंवार पाठपुरावा करुनही संबंधित अभिलेखही महसूल विभाग देत नाही. परिणामी, सर्वसाधारण कर वसुलीचे वेळी अकृषिक कराची वसुली होणे अशक्य झाले आहे. वसूल झालेल्या कराच्या रकमेच्या 75 टक्के राज्य सरकार कडून महापालिकेस येणे असलेल्या अनुदानाच्या रकमेतून वळवून 25 टक्के रकमेपैकी 20 टक्के रक्कम राज्य शासनाच्या कोषागारात जमा करणे व 5 टक्के कलेक्शन चार्जेस म्हणून महानगरपालिकेने स्वत:कडे ठेवून देण्याबाबतचा अध्यादेश 2008 मध्येच शासनाने निगर्मित केलेला आहे. माहे डिसेंबर महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत देखील यावर निर्णय होऊनही अद्याप महसूल विभागाच्या निरुत्साहामुळे महानगरपालिकेस अकृषिक कराची वसुली करता येत नाही. तरी शासनाने संबंधितांना योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कुपोषण असणे या बाबत श्री.केशवराव मानकर, वि.स.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ल्ेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य कुपोषण मुक्त करण्यासाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात येते. परंतु महाराष्ट्राच्या टोकावर असलेल्या आदिवासीबहुल व नक्षलदृष्टया अतिसंवेदनशील असलेल्या गोंदिया जिल्हयात कुपोषणाची समस्या अधिक तीव्र आहे. कारण दिनांक 14 नोव्हेंबर, 2011 रोजी झालेल्या सर्वेक्षणात 1 लाख 2 हजार 754 बालकांपैकी 25 हजार 190 बालके कुपोषित (कमी वजनाची) असून 3 हजार 81 बालके तीव्र कुपोषित (तीव्र कमी वजनाची) असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच गोंदिया येथे शासनातर्फे बालकांचे वजन वाढविण्यासाठी आणि त्यांना संतुलित आहार देण्यासाठी बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयात कुपोषण पुनर्वसन केंद्र उघडण्यात आले आहे. परंतु या केंद्रात फक्त 10 कुपोषित बालकांची व्यवस्था करण्यात आली असून ही 10 बालके पंधरा दिवस उपचार घेऊन घरी परत जात आहेत. त्यामुळे पुनर्वसन केंद्रात जिल्ह्यातील अतितीव्र तीन हजार बालकांवर उपचार होणे शक्य नाही. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उप केंद्रात कुपोषण पुनर्वसन केंद्र तातडीने सुरु करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन शासनाने या बाबत तातडीने उपाय योजना करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औरंगाबाद जिल्ह्यात गॅस सिलेंडरचा असलेला तुटवडा या बाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, औरंगाबाद शहराची लोकसंख्या दहा लाखाहून अधिक असून किमान पाच ते सहा लाख गॅसधारक कुटुंबे आहेत. सदर शहरात मागील एक महिन्यापासून गॅस नोंदणी केलेल्या ग्राहकांना सुमारे तीन आठवडे ते महिनाभर अशा विलंबाने सिलेंडर मिळत आहे. त्यामुळे औरंगाबाद शहरातील महिलांची सिलेंडरविना स्वयंपाकाची कुचंबणा होत आहे. औरंगाबाद शहरातील गॅस सिलेंडरच्या तुटवड्याची चौकशी करुन गॅसधारकांना विहित वेळेत सिलेंडर पुरविण्यात यावे अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मृतदेह सीमेबाहेर नेण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र त्याच रुग्णालयात उपलब्ध करुन देणे या बाबत श्री.अनिल भोसले, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक अधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

रुग्णाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्यास व त्याचा मृतदेह जिल्ह्याच्या बाहेर न्यायावयाचा असल्यास मृताच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणीला तोंड द्यावे लागते. कारण मृतदेह जिल्ह्याच्या बाहेर न्यावयाचा असल्यास महानगरपालिकेच्या दवाखान्यात जाऊन परवानगी घ्यावी लागते. तेव्हा महानगरपालिकेच्या दवाखान्यात न जाता उपचार घेत असलेल्या दवाखान्यात तसे प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था शासनाने करावी.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..5..

**पृ. शी**. : श्री.गणेश सांगळे, तहसीलदार, रोहा, जि.रायगड यांना श्री.नितीन परब यांनी रिव्हॉल्व्हर रोखून जीवे मारण्याची दिलेली धमकी

**मु. शी**. : श्री.गणेश सांगळे, तहसीलदार, रोहा, जि.रायगड यांना श्री.नितीन परब यांनी रिव्हॉल्व्हर रोखून जीवे मारण्याची दिलेली धमकी या बाबत श्री दिवाकर रावते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला औचित्याचा मुद्दा

श्री.प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री दिवाकर रावते यांनी "श्री.गणेश सांगळे, तहसीलदार, रोहा, जि.रायगड यांना श्री.नितीन परब यांनी रिव्हॉल्व्हर रोखून जीवे मारण्याची दिलेली धमकी" या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यास अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

यानंतर कु.थोरात..

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी शस्त्र परवाना रद्द करण्याच्या ऑर्डर्स दिलेल्या आहेत असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कर्मचाऱ्यांनी संप केल्यामुळे या तीनही जिल्ह्यातील महसूल कार्यालये बंद आहेत, अशा प्रकारचा प्रश्न या सदनामध्ये उपस्थित करण्यात आला होता. माननीय मंत्री महोदयांनी केलेल्या निवेदनामध्ये दिनांक 2-4-2012 पासून कर्मचारी संपावर आहेत असे सांगितलेले आहे. संपाची आजची काय परिस्थिती आहे हे या ठिकाणी सांगितले पहिजे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, , दिनांक 4-4-2012 रोजी कोकण विभागातील सर्व महसूल कार्यालये सुरळीत चालू आहेत असे मी या ठिकाणी निवेदन करताना सांगितलेले आहे.

----

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.30 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 2.52 ते 3.30 मध्यंतर )

-----

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरानंतर )

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ. शी.** : नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XIV OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आले)

**तालिका सभापती** : या विधेयकावर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचे भाषण अपूर्ण होते. त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, या विधेयकामध्ये असे म्हटले आहे की, "सभेच्या कार्यपध्दतीचे (त्यातील गणपूर्तीसह) नियमन करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास, गणपूर्तीच्या अभावी एकदा सभा रद्द किंवा तहकूब केल्यानंतर पोट-कलम (2) च्या तरतुदीनुसार बोलाविलेली सभा, त्याच्या मते पुरेशी असतील अशा कारणांसाठी, तहकूब करण्यास नकार देता येईल." मूळात आपण 50 टक्केच्यावर गणपूर्ती असल्यानंतरच ती सभा घेतो. तेवढी जर गणपूर्ती झाली नसेल तर सभा तहकूब करण्याचा अधिकार असतो आणि तहकुबीनंतर जेवढे सदस्य उपस्थित असतील तेवढ्यावर त्या सभेचे कामकाज चालते. त्या बाबतीत आपण बंधन घातले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या मते पुरेशी म्हणजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

किती ? यामध्ये 30 टक्के, 35 टक्के, 40 टक्के अशी काही तरी मर्यादा असण्याची गरज आहे. नाही तर जिल्हाधिकाऱ्यांच्या मनात आले तर 50 टक्के गणपूर्ती नाही म्हणून ते सभा तहकूब करुन टाकतील. हे सर्व अधिकार आपण नोकरशाहीला देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार कमी करीत आहात असे मला या ठिकाणी म्हणावेसे वाटते. त्यामुळे या बाबतीत कोठे तरी मर्यादा घालावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये असे म्हटले आहे की, "परंतु, स्थायी समिती किंवा नगरपरिषद, विहित करण्यात येईल इतक्या रकमेपेक्षा अधिक खर्चाचा रस्ता, पूल, इमारत किंवा पाणीपुरवठा अथवा जलनिस्सारण योजना यांसारखे बांधकाम अंतर्भूत असलेल्या कोणत्याही प्रकल्पास किंवा योजनेस, राज्य सरकार पदनिर्देशित करील अशा राज्य अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्यांची तांत्रिक पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज किंवा नगरपरिषदेने, कलम 75 च्या पोट-कलम (2) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या अभियंत्याची नेमणूक केली असेल आणि अशा अभियंत्यास या बाबतीत राज्य शासनाकडून मान्यता मिळाली असेल तर अशा अभियंत्याची, त्यासाठी तांत्रिक पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज, मंजुरी देणार नाही." म्हणजे याकरिता शासनाने मंजुरी दिलेला इंजिनिअरच द्यावा लागेल. शासन सर्व नगरपरिषदेला ते देणार आहे का ?

आज नगरपरिषदांची स्थिती इंजिनिअर ठेऊन त्यांना पगार देण्याइतपत चांगली नाही. शासन सांगणार की, जे पैसे जमा करतात त्यातून पगार द्यावा. त्या ठिकाणी किती खर्चाच्या रस्ते आणि पुलाला मंजुरी देण्यास लावणार ? स्थायी समितीचे आज जे अधिकार आहे त्यामध्ये सिमेंटचे वाढीव दर, लोखंडाचे वाढीव दर किंवा मजुरीचे वाढीव दर या वाढीव दरांचा विचार केला तर आज आपली जी मर्यादा आहे ती अतिशय कमी आहे. त्यामुळे ती मर्यादा शासन वाढवून देणार आहे का ? असल्यास ते किती मर्यादेपर्यंत वाढवून देणार याचे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण द्यावे. त्यांची मर्यादा किती आणि किती मर्यादेनंतर आपण अधीक्षक अभियंत्याला खऱ्या अर्थाने मंजुरी देणार ? मग हे सगळे पुन्हा राज्य शासनाच्या ताब्यात देणार आहात का ? आपण स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार कमी करत आहात का हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे खऱ्या

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

अर्थाने माझ्या सूचनेचा विचार करुन त्याला शासनाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, त्यांनी किती दिवसात मंजुरी द्यावयाची आहे ? आपण राज्य शासनाकडे किंवा अभियंत्याकडे ते देणार पण त्याला कालमर्यादा असणे गरजेचे आहे. कारण जेव्हा एखादे बिल किंवा एखादा प्रकल्प शासनाकडे किंवा अधिकाऱ्याकडे पाठवतो तेव्हा त्याला कालमर्यादा नसते. सहा सहा महिने ते त्या ठिकाणी पडलेले असते. पुन्हा आम्ही मागणी केल्यानंतर सांगितले जाते ते आता आमच्याकडे सापडत नाही त्यामुळे पुन्हा पाठवा. दरवेळी नुसती कागदपत्रे पाठविण्यामध्ये नगरपरिषदेचा वेळ जातो आणि त्यामुळे खऱ्या अर्थाने याला न्याय मिळत नाही. ती कालमर्यादा आपण यामध्ये घातलेली नाही. आपल्याला ती कालमर्यादा यामध्ये घालावी लागणार आहे. ती कालमर्यादा आपण घालावी अशी मी सूचना करते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

मुळात आराखडे, निविदा त्यातील गैरव्यवहार होऊ नये यासाठी या विधेयकामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सध्या भ्रष्टाचाराची व गैरव्यवहाराची बरीच प्रकरणे उघडकीस येतात. नगरपालिका हे भ्रष्टाचाराचे कुरण आहे असे म्हटले जाते. अशा वेळी या नगरपालिकांना मोठे आर्थिक अधिकार दिले जाणार आहेत. मोठ्या प्रमाणात कर वाढविण्याची मुभा दिली जाणार आहे. त्यांना मोठमोठ्या प्रकल्प उभे करण्यास परवानगी दिली जाणार आहे. ही सर्व कामे करण्यासाठी आराखडे तयार करावे लागतील, निविदा काढाव्या लागतील आणि या दोन्ही गोष्टी भ्रष्टाचारास कारणीभूत ठरतात. 10 रुपयांचे काम असेल तर ते 15 रुपयांचे दाखवून वाढीव किंमतीचे टेंडर काढण्याचे नगरपालिकांचे सध्याचे धोरण आहे. असे गैरव्यवहार होऊ नयेत, नगरपालिकेचा कारभार चांगला चालावा, नगरपालिकेच्या बाबतीत मंत्री महोदयांनी भविष्यातील पाहिलेले स्वप्न पूर्ण होण्यासाठी, गैरव्यवहाराला आळा घालण्यासाठी शासनाने या कायद्यात तरतूद केलेली नाही, ती केली जाणार आहे काय ? कारण तशी तरतूद करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, या संदर्भात दोन वेगवेगळी अंदाजपत्रके तयार करण्यात येणार आहेत. एक नियमित अंदाजपत्रक असेल त्यामध्ये पाणीपुरवठा व जल निस्सारण या बाबी असतील आणि दुसरे अंदाजपत्रक सर्व बाबींशी संबंधित असेल. परंतु यामध्ये शासनाने आणखी एक मेख मारली आहे. पहिले बजेट तयार करीत असताना नगरपालिकांनीच निधीची व्यवस्था करावी असे नमूद केलेले आहे. नगरपालिकेला कराची आकारणी करावी अशी तरतूद केलेली आहे. सध्या लोकांकडून नगरपालिका आधीच घरपट्टी, पाणीपट्टी, विजेसाठी कर वसूल करते. तसेच पर्यावरण कर, रोजगार हमी कर, पथ कर, शिक्षण कर, आता वृक्ष कर सुध्दा वसूल केला जातो. या वृक्ष कराचे पुढे काय होते ते कळतच नाही. या बाबत मी वारंवार वेगवेगळ्या आयुधांमार्फत शासनाकडे विचारणा करीत असते. वृक्ष करातून किती पैसे जमा झाले, त्या पैशातून किती वृक्षांची लागवड केली, पर्यावरणामध्ये किती बदल झाला याचे उत्तर कधीही दिले जात नाही आणि भविष्यात मिळेल अशी आशाही वाटत नाही.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती शोभा फडणवीस....

त्याचप्रमाणे आता पाणीपुरवठा व जलनिस्सारणासाठी कर आकारण्याची तरतूद केलेली आहे. त्याशिवाय निधी जमा होणार नाही. हा कर किती आकारला जावा ते निश्चित केलेले नाही. 17 ते 20 हजार वार्षिक उत्पन्न असलेली 'क' वर्ग नगरपालिका असेल त्या नगरपालिका क्षेत्रामध्ये राहणारे लोक वेगवेगळ्या परिस्थितीत राहणारे असतील. विदर्भ पश्चिम महाराष्ट्राची बरोबरी कधीच करु शकत नाही. त्यातल्या त्यात पूर्व विदर्भ तर कधीच बरोबरी करु शकणार नाही. अशा वेळी कर लावण्याची तरतूद संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागू होणार आहे. म्हणून कर आकारणी करीत असताना त्याचे प्रमाण ठरविणे आवश्यक आहे. कायदा आणत असताना नियमामध्ये तरतूद केलेली आहे का, याबाबत स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पाणीपुरवठा योजना, भुयारी गटारे योजना एकीकडे आणि वॉटर ट्रिटमेंट प्लान्ट दुसरीकडे असतील. यासाठी दोन वेगवेगळे निधी गोळा करण्याची तरतूद केलेली आहे. एका निधीतून देखभाल दुरुस्ती असेल, पाईप लाईनद्वारे केली जाणारी पाणी पुरवठा योजना असेल, भुयारी गटारे असतील आणि दुसऱ्या बाजूला सिव्हरेज ट्रिटमेंट प्लान्टही असेल. भुयारी गटारासाठी आमच्या नगरपालिकेसाठी शासनाने कर्ज म्हणून काही निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामध्ये काही टक्के रक्कम नगरपालिकेनेही भरावी असे म्हटलेले आहे. भुयारी गटारे खोदल्यामुळे रस्ते खराब होतात. सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेले रस्ते खराब होतात. मग हे खराब झालेल्या रस्त्याचे डांबरीकरण किंवा कॉंक्रीटचे काम करण्यासाठी नगरपालिकेने पैसा कोठून आणावयाचा ? भुयारी गटारासाठी नगरपालिकेकडून त्यांच्या उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार 10 टक्के, 20 टक्के निधी घेण्यात येतो. परंतु रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आर्थिक तरतूद केलेली नाही. नगरपालिकेकडून 10 टक्के भरताना अडचण होते , त्यामुळे खराब झालेल्या रस्त्याची दुरुस्ती करु शकत नाही. कारण नगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबूत नाही. याचाही विचार शासनाने केला पाहिजे. भुयारी गटारे बांधताना रस्त्यासहित नियोजन केले पाहिजे. त्यासाठी निधी दिला पाहिजे. याचा या विधेयकात विचार केल्याचे दिसत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 03:40

श्रीमती शोभा फडणवीस...

कायदा केल्यानंतर तो कायदा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये चांगल्या त-हेने राबविला जावा असे वाटत असेल तर तो परिपूर्ण असा असला पाहिजे. आता गटारे केली आणि नगरपालिकेकडे पैसा नसल्यामुळे रस्ता केला नाही तर पडणा-या पावसामध्ये असलेला रस्ताही पूर्णपणे उखडून जातो. तेव्हा योजना व्यवस्थित असाव्यात यादृष्टीने विधेयकामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, नगरपालिका ह्या आर्थिकदृष्टया कमजोर आहेत. या नगरपालिकामध्ये आवश्यक असलेली नोकर भरती न करता केवळ प्लॅन प्रमाणेच नोकर भरती केली जाते. मग त्या व्यतिरिक्त झालेल्या नोकर भरतीचा भूर्दडं नगरपालिकेवर बसतो. रोजंदारीवर असलेल्या कर्मचा-यांचा भूर्दंड नगरपालिकेवर बसतो. नगरपालिकेने करावयाची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रस्त्यांची व्यवस्था, स्वच्छता या व्यवस्था होत नसल्यामुळे मोठया प्रमाणावर रोगराई पसरते आणि लोकांवर अन्याय होतो. या विधेयकामध्ये नव्याने काही गोष्टी करण्याकरिता कर्मचारी वर्ग लावण्यात येईल असे म्हटलेले आहे.आराखडा तयार करण्यासाठी कर्मचारी वर्ग नेमावा लागणार आहे. या कर्मचा-यांचा पगार या टॅक्सच्या माध्यमातून वसूल होणा-या रकमेतून द्यावा असे शासनाचे म्हणणे आहे. तसेच जे अधिकारी आपण नेमणार आहात त्यांचा पगार देखील यामधून दिला पाहिजे असे आपले म्हणणे आहे. ज्या नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मोठमोठे कारखाने आहेत अशा नगरपालिकांच्या बाबतीत मी बोलणार नाही. परंतु ज्या नगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये मोठे व्यवसाय नाहीत, कारखाने नाहीत, जेथे आदिवासी, मजूर, मागासवर्गीय आहेत अशा नगरपालिकांना आदिवासींच्या आणि मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्याची तरतूद या विधेयकामध्ये करणार काय असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, नगरपरिषद, प्रकरणे तेरा व चौदा यांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ "एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विल्हेवाट प्रकल्प निधी" या नावाने संबोधण्यात येणारा एक स्वतंत्र निधी स्थापन करील आणि तो , अर्थसंकल्पीय अंदाज "ब" च्या प्रयोजनार्थ वेगळा ठेवील." म्हणजे शासकीय योजनेतून आलेला निधी या प्रकल्प निधीमध्ये जमा करण्यात येणार आहे. विधेयकामध्ये पुढे असे नमूद केलेले आहे की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

"(अ) प्रकरणे तेरा व चौदा यांच्या प्रयोजनार्थ या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन कर्जाऊ घेण्यात आलेल्या कोणत्याही रकमा,

(ब) प्रकरणे तेरा आणि चौदा यांच्या प्रयोजनार्थ शासनाकडून मिळालेली कोणतीही अनुदाने,

(क) कलम 105 च्या पोट-कलम (2) च्या खंड (ह) किंवा (आय) अन्वये नगरपरिषदेने किंवा नगरपरिषदेच्या वतीने स्वीकारलेला सर्व पैसा,

(4) पोट-कलम (3) नुसार वापरण्यात न आलेला किंवा तात्काळ न वापरावयाचा प्रकल्प निधीतील कोणताही पैसा, मुख्य अधिकारी, स्थायी समितीच्या मंजुरीने त्यास योग्य आणि उचित वाटेल अशा रीतीने, नगरपरिषदेच्या वतीने, कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकत गुंतवील."

सभापती महोदय, कलम 90-ब मध्ये "जल व मलप्रवाह निधी" या नावाने आणखी एक निधी स्थापन करण्यात येणार आहे. या दोन निधीमध्ये प्रत्यक्षात किती निधी जमा होणार आहे ? "अ", "ब", "क" आणि "ड" वर्ग नगरपालिका अशी आपण नगरपालिकांची वर्गवारी केलेली आहे. यातील "क" आणि "ड" वर्ग नगरपालिकांची स्थिती चांगली आहे असे मला वाटत नाही. कारण मी नगरपालिकेच्या क्षेत्रात रहाते. मी आतापर्यन्त 50 रुपये टॅक्स भरते...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.......

मग मला पाणी पुरवठा व मलप्रवाह सुविधेसाठी 50 रुपये जादा द्यावे लागणार आहेत. आज अशा पध्दतीने कर गोळा केल्याशिवाय खर्च करता येत नाही. मी शासनाला 50 रुपये अधिक कर भरणा करीत असताना मला त्या बदल्यात 50 रुपयांच्या सुविधा मिळणार आहेत का याचा विचार होण्याची आवश्यकता आहे.

कर्ज काढत असताना त्या कर्जाची मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. आज एलआयसी किंवा शासनाकडून कर्ज घेतले जाते. परंतु कर्ज काढून खर्च करीत असताना ते कर्ज किती प्रमाणात उभारावे याची मर्यादा निश्चित केली पाहिजे. या विधेयकामध्ये मर्यादा निश्चित केल्याचे दिसून येत नाही. मला असे वाटते की, या विधेयकातील तरतुदींचा सर्वंकष विचार होण्यासाठी हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या 35 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक सभागृहापुढे मांडण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, नक्की हे विधेयक मलनिस्सारण व पाणी पुरवठा याकरिता आहे का? या विधेयकामध्ये वेगवेगळया गोष्टी समाविष्ट केलेल्या आहेत. कायदा करीत असताना सभेचे नियोजन कसे असेल व गणपूर्तीअभावी सभा होऊ शकली नाही तर कोणती तरतूद असेल, अध्यक्ष नसला तर जिल्हाधिकारी अध्यक्ष होईल ही सुध्दा तरतूद केलेली आहे. अध्यक्ष नसेल असे गृहित धरले आहे. शिक्षण समितीचा यामध्ये अंतर्भाव केलेला आहे. या समितीचा विधेयकाशी काही संबंध नाही. तो वेगळा विषय आहे. शिक्षण समितीला यापुढे शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समिती म्हणून संबोधले जाणार आहे. पाणी पुरवठा व मलनिस्सारण याच्याशी क्रीडा समितीचा संबंध काय? तो विषय का अंतर्भूत केला हे मला कळले नाही. पाणी पुरवठा व मलनिस्सारण या संदर्भातील योजना राबविण्याबाबत नियंत्रण व नियोजन करण्यासाठी कायदा असावा याकरिता हे विधेयक आणले आहे. विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये सविस्तर विवेचन केलेले आहे.

सभापती महोदय, पृ.क्र.3 वर "अध्यक्षासह प्रत्येक परिषद सदस्यास नगरपरिषद स्थायी समितीच्या, विषय समितीच्या किंवा विशेष समितीच्या सभेस हजर राहण्यासाठी प्रत्येक सभेसाठी विहित करण्यात येईल अशा दराने नगरपरिषदेकडून सभा भत्ता देण्यात येईल" असे म्हटले आहे. याचा या कायद्याशी काही संबंध नाही. हे विधेयक पाणी पुरवठा व मलनिस्सारणाच्या नियमाची, कर्जाची वित्तीय मांडणी कशी असावी, आर्थिक शिस्त कशी असावी हे सांगणारे आहे. हा भत्ता कोण ठरविणार आहे? सध्या किती भत्ता दिला जातो, तो वाढविण्यात येणार आहे काय? हे विधेयकामध्ये कुठे वाचायला मिळाले नाही. म्हणजे आतापर्यंत भत्ता देण्यात येत नाही असे समजायचे का?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

मलनिस्सारण आणि पाणी पुरवठा हा प्रकल्प आला, खरे तर हा प्रकल्प खरे तर जुनाच होता पण जसजशी वस्ती वाढली, गरज वाढली तेव्हा मात्र महाकाय अशी परिस्थिती निर्माण झाली म्हणून हा नवीन प्रकल्प घेण्यात आला. या प्रकल्पाचे वरळीला 15 पंप आहेत आणि त्यांची शक्ती एवढी अवाढव्य आहे की मनात आणले तर ते समुद्र सुध्दा आटवू शकतील. या पंपांची शक्ती 1200-1500 आणि 1600 हॉर्स पॉवर एवढी आहे. हे पंप किती ताकदीचे असतात हे पाहण्यासाठी मी शिकागो येथील पंपिंग स्टेशनला भेट दिली होती. तेथे जगात सर्वात जास्त ताकदीचे पंप मला पहायला मिळाले. हा प्रकल्प मुंबई महापालिकेच्या आवाक्याबाहेरचा होता म्हणून जागतिक बँकेकडून कर्ज मंजूर करण्यात आले होते. पण हे कर्ज मंजूर करीत असताना जागतिक बँकेने हा प्रकल्प राबवित असताना जागतिक कीर्तीचाच सल्लागार त्यासाठी नेमला पाहिजे अशा प्रकारच्या अटी टाकल्या होत्या. त्यावेळेस महापालिकेत जागतिक बँकेचा सल्लागार हा विषय गाजत होता. कारण या जागतिक कीर्तीच्या सल्लागाराची फी भरमसाठ तर होतीच पण त्याचा इन्कम टॅक्स सुध्दा महापालिकेलाच भरावा लागत होता. वास्तविक या सल्लागारामध्ये फक्त एकच पूर्ण माणूस आणि एक अर्धा माणूस होता. बाकी त्यांना मदत करणारे आमच्याच पालिकेतून निवृत्त झालेले आणि इतर प्रकल्पांचे वाटोळे करणारे अधिकारीच होते. मी स्थायी समितीचा अध्यक्ष असताना ही चर्चा होत होती तसेच यातील तांत्रिकता काय अशीही चर्चा होत होती. मला आठवते की या सिव्हरेज प्रकल्पावर मी बोलत असताना अधिकाऱ्यांना ते बोलावून घेत होते. ते ज्या त्रुटी सांगत होते त्यासंदर्भात तासनतास बैठका होत होत्या, अशा प्रकारे अत्यंत गांभीर्याने काम करीत होते. या प्रकल्पाच्या सन 1985-86 ते 1987-88 या काळात कोट्यवधीच्या निविदा निघत होत्या. त्या काळच्या 120 कोटीच्या निविदा म्हणजे आजच्या 1200 कोटीच्या निविदा म्हटले तरी चालेल. शासनाने याच्याशी संबंधित कायद्यात सुधारणा करुन कलम 520 (क) मध्ये जो बदल केला त्याचेच छोटे स्वरुप म्हणजे हे विधेयक आहे. या सुधारणेमुळे स्थायी समितीचे पूर्ण अधिकार गारद झाले. समितीसमोर प्रस्ताव आल्यानंतर तो नाकारा किंवा स्वीकारा या 520 (क) कलमात सुधारणा केल्यानंतर त्यानुसार "You have to approve or reject it, within a period of 15 days." हे मान्य करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे असल्यामुळे समजा तो नाकारला तरी "Deemed to be passed". यासंदर्भात मी सर्वोच्च न्यायालयात सुध्दा गेलो होतो, त्यात आम्ही हरलो....

(यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सरकारला कायदे करण्याचा अधिकार आहे. जागतिक बँक मुंबई महानगरपालिकेला 4 टक्के व्याजाने कर्ज देत असे. परंतु जागतिक बँक डायरेक्ट महानगरपालिकेला कर्ज न देता ते पैसे केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा होते होते. महानगरपालिकेच्या तिजोरीत पैसे जमा झाले की, ते त्या पैशावर 12 टक्के व्याज लागले जाते. या 12 टक्क्यामध्ये 4 टक्के केंद्र सरकारचा व 4 टक्के राज्य सरकारचा परतावा असतो. खरे म्हणजे महानगरपालिकेला 4 टक्कयानेच पैसे मिळायचे परंतु मध्येच 8 टक्के पैसे जायचे. जागतिक बँक त्यांच्या पध्दती प्रमाणे डायरेक्ट पैसे महानगरपालिकेला कधीच देत नाही. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेला जागतिक बँकेचे जे काही पैसे मिळत होते व त्यावर जे 12 टक्के व्याज द्यावे लागत होते ते व्याज खरे म्हणजे मुंबईमध्ये राहणारे रहिवासी कराच्या माध्यमातून भरत होते. मलनिस्सारण कर आणि पाणी पुरवठा कर हे पाणी पट्टीच्या बिलाबरोबर तसेच घरपट्टीच्या बिलावर येत होते. एकाच बिलावर दोन कर कसे काय आलs याबाबत मी सभागृहात प्रश्न उपस्थित केल्याबरोबर आयुक्तांनी ते कर त्याच दिवसापासून रद्द केले. जवळपास 3.5 ते 4 हजार कोटी रुपये मुंबई महानगरपालिकेने चुकीने वसूल केले होते. परताव्याचा विषय आला असता तर मुंबई महानगर पालिकेला ते फार जड गेले असते. परंतु आता हे कर एकाच बिलात येतात.

सभापती महोदय, मुंबई मध्ये जे अधिकारी, कर्मचारी काम करतात त्यांच्या पगाराच्या 1/3 हिस्सा त्यांना मुंबई महानगरपालिकेला द्यावा लागत असतो. यामध्ये पाणी पट्टी कर, मलनिस्सारण कर,घरपट्टी कर, बीएसटी मार्फत पुरवठा करणा-या विजेचा कर व प्रवास कराच्या माध्यमातून हे कर द्यावे लागत असतात.

सभापती महोदय, विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 3 वरील खंड 72 मध्ये असे म्हटले आहे की, "निरनिराळ्या वर्गाच्या नगरपरिषदांच्या स्थायी समितीचे आणि विषय समित्याचे वित्तीय मंजुरी देण्याचे अधिकार, विहित केल्या असतील इतक्या मर्यादेपेक्षा अधिक असणार नाहीत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

परंतु, स्थायी समिती किंवा नगरपरिषद, विहित करण्यात येईल इतक्या रकमेपेक्षा अधिक खर्चाचा रस्ता, पूल, इमारत किंवा पाणीपुरवठा अथवा जलनिस्सारण योजना यांसारखे बांधकाम अंतर्भूत असलेल्या कोणत्याही प्रकल्पास किंवा योजनेस, राज्य शासन पदनिर्देशित करील अशा राज्य अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्याची तांत्रिक पूर्व मंजुरी घेतल्याखेरीज किंवा नगरपरिषदेने कलम 75 च्या पोट-कलम (2) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या अभियंत्याची नेमणूक केली असेल आणि अशा अभियंत्यास याबाबतीत राज्य शासनाकडून मान्यता मिळाली असेल तर अशा अभियंत्याची,त्यासाठी तांत्रिक पूर्व मंजुरी घेतल्याखेरीज, मंजुरी देणार नाही."

सभापती महोदय, यामध्ये स्थायी समितीचा संबंध येतो कोठे ? सरकारने कलम लावल्यामुळे मंत्रालयात पाठविलेल्या प्रस्तावाकडे डोळे लावून बसायचे व मंत्रालयाकडून मंजुरी आल्यानंतर स्थायी समितीचा विषय आणि त्या नंतर प्रकल्पाचा प्रश्न येतो. अडवणुकीचा विषय हा फार गंभीर विषय आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, कुठल्याही प्रस्तावाने मंत्रालयाची पायरी चढली की, त्याची मान सहजासहजी सुटणार नाही. आमच्या सचिवांना हे सगळे तोंडपाठ आहे. चुकीचे घडते आहे हे त्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी ते थांबविले. त्याबद्दल त्यांचे कौतुक करायला हरकतच नाही.

अकोला महानगरपालिकेची मलनिस्सारण योजना आहे. ही केंद्र शासन पुरस्कृत योजना लहान व मध्यम शहरांना लागू आहे. "Urban infrastructure schemes developed for the small and medium towns." या अंतर्गत निधी आलेला आहे. मी आपल्याला उदाहरण देत आहे. ते सगळीकडेच आहे. त्या प्रकल्पाची मूळ किंमत 132 कोटी 75 लाख 39 हजार 680 एवढी आहे. याच्या निविदा निघाल्या. या निविदा 2.12.2009 रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या. दिनांक 5.1.2010 रोजी पूर्व अर्हता प्राप्त कंपनीने आपल्या निविदा दिल्या. ह्या निविदा देखील गंमतीदार आहेत. यात सगळी रेड्डी कंपनी आहे. महाराष्ट्रात असे काम करणारे कोणी नाहीत काय, हेच कळत नाही. आंध्र प्रदेशातील ही रेड्डी कंपनी आहे. आमच्या मराठवाड्यातील सगळे प्रकल्प ह्या रेड्डी कंपनीकडे आहेत. सरकारचे आणि रेड्डी कंपनीचे काय लागेबांधे आहेत तेच मला कळत नाही. ते भस्म लावून येतात. लुंगी नेसलेली असते. कुणाला गुंडाळतात हेच कळत नाही. हे मी चांगल्या अर्थाने बोलत आहे.

रॅमसन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चरने 138 कोटी अबव्हने निविदा भरली होती. मित्थ्यास कंपनीने देखील निविदा भरली. सत्यम कंपनी घोटाळ्यातील आहे. या कंपनीने आपले नाव उलटे करून टाकले. सत्यमचे मित्थ्यास केले. सत्यम कंपनी देशभर गाजली. त्याचा मालक अजून तुरूंगात आहे. तो सुटला की नाही हे मला माहीत नाही. त्या मित्थ्यास कंपनीने 148 टक्के अबव्हने निविदा भरली. दुसरी कंपनी आयपीएल ने 287 टक्के अबव्हने निविदा भरली. 5, 10, 15 टक्क्याने अबव्ह निविदा भरल्या तर मी समजू शकतो. पण एवढया अबव्ह किंमतीने निविदा भरायची हिंमत कशी होती. 132 कोटीची निविदा 290 कोटी रूपयांची झाली. त्यावर आयुक्तांनी 8.33 टक्के वाढवून दिले. नगरपालिकांचे नवीन कादंबरी लिहावे त्याप्रमाणे किस्से सांगता येतील. आयुक्तांनी स्वत: 8.33 टक्के वाढवून त्यास मंजुरी दिली. आपला महाराष्ट्र काय आहे तो पहावा. या सर्वांनी मिळून दादागिरी केली. त्या अधिकाऱ्यांना कसे पटविले ते माहीत नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

किर्लोस्कर हा मराठी माणूस आहे. त्यांना निविदा भरू दिली नाही. महाराष्ट्रातील मराठी माणसाला रेड्डी कंपनी दादागिरी करून थांबविते. त्यांनी किर्लोस्कर कंपनीला निविदा भरू दिली नाही. ही निविदा घाई घाई मध्ये कशी पास झाली हे मी सांगणार नाही. कारण ते सगळे ओंगळवाणे आहे. तेथे घडलेले अत्यंत किळसवाणे आहे. मी त्या करिता उभा नाही. मग किर्लोस्कर कंपनीने तक्रार नोंदविली. त्याची चौकशी झाली. संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्या चौकशीचा अहवाल पालिकेच्या विरोधात आला.

हा प्रकल्प राबविण्याकरिता 80 टक्के केंद्राचा, 10 टक्के राज्याचा आणि 10 टक्के नगरपालिकाचा हिस्सा आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DGS/ 04:00

श्री. दिवाकर रावते.....

या राज्याच्या अर्थसंकल्पाच्या मानाने 10 टक्के रक्कम कमी वाटते. परंतु नगरपालिकेच्या 290 कोटींच्या बजेटच्या 10 टक्के म्हणजे 29 कोटी होतात. आपल्यासारखा दहा ते पंधरा हजार कोटींचा त्यांचा अर्थसंकल्प नसल्यामुळे त्यांच्याकडे 29 कोटी असतील तर ही योजना अंमलात आणतील. मला याबाबत आश्चर्य वाटत असल्यामुळे मी ही बाब मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणतो. या बाबतीत सचिवांनी सुध्दा लक्ष घातले व ती फाईल माननीय मुख्यमंत्र्यांकडे गेल्यानंतर त्यांनी योजनेला स्थगिती दिली. त्यावेळी त्यांच्याही लक्षात आले की, It is fraudulent attitude. त्या करिता मराठीमध्ये शब्द वापरीत नाही. It is a different attitude. भ्रष्टाचारी प्रवृत्ती मोडता येत नाही. ती प्रवृत्ती मॅनेजमेंटमध्ये असते, भ्रष्टाचार हा पैसे देऊन करावयाचा असतो. It is a mentaly fraud, माहितीचा भ्रष्टाचार, मॅनेजमेंटचा भ्रष्टाचार, प्रशासकीय भ्रष्टाचार. एखादी निविदा पुढे कशी रेटायची याचा भ्रष्टाचार. त्याबाबत पुढे काय झाले हे मला माहीत नाही, त्या बाबत उत्तर द्यावयाचे की नाही हा तुमचा प्रश्न आहे. मला त्यामध्ये स्वारस्य नाही. मंत्रालयामध्ये ती फाईल आल्यानंतर काय काय घडते, त्याची पध्दत काय आहे हे मी आपल्याला सांगतो. आदरणीय उप मुख्यमंत्री महोदय या लोकांना हे सर्व माहीत आहे. त्यांच्या खात्याला तर नक्कीच माहीत आहे, त्यांच्याबरोबर सचिव काम करीत आहेत.

माननीय मुख्यमंत्री निवडणुकीच्या प्रचाराला आले होते त्याची गंमत मी आपल्याला सांगतो. अकोला महानगरपालिका बरखास्त करण्याची शिफारस सचिवांनी राज्य सरकारकडे केल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांना बरखास्तीचा निर्णय अंमलात आणावा लागला. म्हणजे यामध्ये किती गडबड आहे हे आपणच सांगा. त्या ठिकाणी कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांची आघाडी होती याचे मला कौतुक वाटते. माननीय मंत्री श्री. भास्करराव जाधव आपल्याला माहीत आहे, माननीय मुख्यमंत्र्यांनाही माहीत आहे. याचे कारण आपणाकडे ते खाते आहे. आपला मुलगा जर दरोडेखोर असेल तर आपण त्याचे कौतुक करीत नाही. महात्मा गांधींच्या जीवनामध्ये त्यांच्या मुलाचे केवढे क्रौर्य होते? एवढे सहन करुन सुध्दा ते राष्ट्रपिता बनले, त्यामध्ये त्यांचे मोठेपण आहे. लखनौच्या एका लहान मुलीने केंद्र सरकारला माहितीच्या अधिकारात प्रश्न विचारला आहे की, महात्मा गांधींना राष्ट्रपिता कुणी केले? हा गंमतीदार प्रश्न विचारल्यामुळे केंद्र सरकारचे धाबे दणाणले. केंद्र सरकार माहिती शोधण्याच्या कामाला लागले आहे, त्यांना याचा संदर्भ कुठेच सापडत नाही. मुले फार वाह्यात असतात. मी या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते....

ठिकाणी महात्मा गांधींच्या हिरालाल या चिरंजीवाचे उदाहरण सांगितले. त्याप्रमाणे एखादा मुलगा वात्रट असेल तर तो आपल्याला संभाळता येत नाही. त्याप्रमाणे आपण आमच्या अकोला महानगरपालिकेच्या बाबतीत केले. परंतु आमच्या माननीय श्री. राधाकृष्ण विखे पाटील साहेबांना माहीत नव्हते.

निवडणुकीच्या व्यासपीठावर तर गंमतच होती. मला ती महानगरपालिका माहीत असल्यामुळे मला तो विनोद वाटला. माननीय मुख्यमंत्र्यांनी जे केले ते योग्य होते म्हणून केले. त्यांनी आमचे-तुमचे बघितले नाही. कॉंग्रेस पक्षाची सत्ता असतांना महानगरपालिका बरखास्त करणे म्हणजे गंमत नव्हती काय? निवडणुकीला फक्त दोन महिने शिल्लक होते. अकोल्यामध्ये सर्व नागरिक समोर बसलेले असतांना माननीय श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांना ती महानगरपालिका कशी भ्रष्ट होती याचे त्यांनी आपल्या भाषणामध्ये वर्णन केले. त्यांनी सांगितले की, अशा लोकांना पुन्हा निवडून देऊ नका. निवडणुकीला उभे राहिलेले बरेचसे उमेदवारही त्या नागरीकांमध्ये बसलेले होते. त्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी उल्लेख केला की, मी या राज्याचा मुख्यमंत्री असल्यामुळे तुमची अडकलेली भुयारी गटार योजना माझ्याकडे आलेली आहे. आणि या महानगरपालिकेचे पालकत्व मी स्वीकारल्यामुळे मी ही योजना लवकरात लवकर मंजूर करणार आहे. माननीय श्री. अजितदादा पवार साहेब, आपण उप मुख्यमंत्री आहात. परंतु तसा आपण कुठे उल्लेख केल्याचे मी ऐकलेले नाही. राज्याची तिजोरी आपल्याकडे आहे असे बोललात, परंतु मी राज्याचा उप मुख्यमंत्री आहे असे कधीही म्हणाला नाहीत. निवडणुकीचे वातावरण वेगळे असते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .. . . .

आता मला कळले नाही की, ही अशी गुंत्यामध्ये अडकलेली योजना बाहेर येऊच शकत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवडणुकीच्या तोंडावर जाहीर करुन टाकले.

सभापती महोदय, मी आता मूळ मुद्याबाबत बोलतो. येथे एवढे सगळे रामायण मी कशासाठी सांगितले.अकोला महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये पैसेच नाहीत हे माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव यांना माहिती आहे. मी याठिकाणी विनंती केली होती.तेथे मध्यंतरीच्या काळामध्ये संप झाला होता. त्यावेळी कामगारांना चार महिने पगार मिळाला नव्हता. मग मी याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. तसेच सदनामध्ये देखील हा विषय उपस्थित केला. मला माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव यांचे कौतुक केलेच पाहिजे आणि धन्यवादही दिलेच पाहिजेत. हा अभिनंदनाचा विषय नाही. उद्ध्वस्त झालेल्या कामगारांना मदत करणे ही अभिनंदनाची बाब नाही तर हा सरकारच्या जाणिवेचा भाग आहे. अकोला महानगरपालिकेकडे पगारासाठी 16 कोटी रुपये पाठविण्यात आले. त्यानंतर निवडणुका जाहीर झाल्या. मग तेथील आयुक्तांनी सरकारला पत्र लिहिले आणि निवडणूक आयोगाकडे त्याची प्रत पाठविली की, आमच्याकडे निवडणूक घेण्यासाठी 2 कोटी रुपयांचा खर्च येणार आहे आणि आमच्याकडे पैसे नाहीत.त्यामुळे त्याबाबतीत व्यवस्था करण्यात यावी. परंतु ती व्यवस्था शेवटपर्यंत होत नव्हती.मग तिसऱ्या दिवशी वतर्मानपत्रामध्ये जाहीररित्या माझी मुलाखत दिली की,उद्या निवडणूक कशी होणार? कारण सगळे काम उधारीवर सुरु आहे. पीन्स् उधारीवर, यु-क्लीप उधारीवर, कागद उधारीवर अशा प्रकारे सर्व निवडणुकीचे सामान उधारीवर घेण्यात येत आहे. पैसे उपलब्ध झालेले नाहीत.

सभापती महोदय, त्यानंतर मला असे वाटते की, शासनाने धावपळ करुन काही तासामध्ये 2 कोटी रुपये वर्ग केले म्हणजे निवडणूक घेण्यासाठी पैसे नाहीत, पगारासाठी पैसे नाहीत. त्या महानगरपालिकेमध्ये अगोदर 290 कोटी आणि आता 310 कोटी रुपयांची निविदा काढली जाते आणि तेथील स्थायी समिती ते मंजूर करते. त्याच्या मागचे जे गौडबंगाल आहे त्याबाबतीत मी येथे बोलत नाही. पण 10 टक्के पैसे कुठून आणणार ? मग तीन कोटी रुपयांचा पहिला हप्ता केंद्र शासनाकडून आला की तुम्ही उपलब्ध करुन दिला हा प्रश्न आहे. आता स्थायी समितीमध्ये 3 कोटी साठी मारामारी सुरु होती. मी याबाबतीत काय होणार आहे याचे चित्र तुम्हाला काळजीपूर्वक सांगत आहे. तसेच प्रकल्प करावयाचा म्हटल्यानंतर जर तो होणारच नाही अशा परिस्थितीत मंजुरी मिळणार असेल कारण केंद्र शासनाचे पैसे आले आहेत आणि राज्य शासनाकडून निधी येणार आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

या भरवशावर कामाची वर्क ऑर्डर दिली असेल किंवा काम करण्यास सुरुवात केली असेल तर फक्त बिले निघतील हे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अकोला येथील भुयारी गटार योजना ही सध्या मंत्रालयाच्या पायरीवर बसून आहे. तसेच सोलापूर येथील भुयारी गटार योजनेचे दुसरेच इंगित आहे. त्यामुळे मला असा प्रश्न पडतो की, हे शासन ठेकेदार आहे की सल्लागार आहे? विधेयकातील पान क्र.3 वर नव्याने दाखल करण्यात आलेल्या 72 व्या कलमातील सहाव्या ओळीमध्ये असे म्हटले आहे की, "राज्य शासन पदनिर्देशित करीत अशा राज्य अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्यांची तांत्रिक पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज किंवा नगरपरिषदेने कलम 75 च्या पोट-कलम (2) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या अभियंत्यांची नेमणूक केली असेल आणि अशा अभियंत्यास याबाबतीत राज्य शासनाकडून मान्यता मिळाली असेल तर अशा अभियंत्याची, त्यासाठी तांत्रिक पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज, मंजूरी देणार नाही."आणि आता ती बाब तुमच्याकडे मंजुरीसाठी आली आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आहे. सोलापूरच्या बाबतीत आणखीनच गंमत आहे. याठिकाणी 2006-2007 मध्ये 141 कोटी रकमेची सोलापूरमध्ये भुयारी गटार योजना तयार झाली. यासाठी टेंडर मागविण्यात आली. 10-10 हजार रुपये देऊन लोकांनी टेंडर भरली. त्यानंतर प्रतिक्षेमध्ये दीड महिन्याचा कालावधी गेला आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे काम हे थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देण्यात आले. त्यांचे ते कामच आहे. पुढील गंमत अशी आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही गटार योजना करण्यासाठी यापैकी कोण योग्य आहे ते ठरवावयाचे आहे. त्याचे काय झाले? तर याबाबतीत ज्यांनी साधे टेंडरही भरले नाही अशा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने, ते प्रकल्प सल्लागार आहेत त्यामुळे त्यांनी टेंडर भरण्याचा प्रश्नच येत नाही.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

ते स्वत: ठेकेदार झाले. त्यांनी टेंडरची प्रक्रिया बाजूला फेकून दिली आणि ज्या निविदा आल्या होत्या त्यापेक्षा 2.5 टक्के जादा दराने काम केले. ही सरकारी संस्था असल्यामुळे कोण विचारणार ? हेच काम एखाद्या सक्षम सल्लागाराकडून केले असते तर दीड ते दोन कोटी रुपयांमध्ये ते काम झाले असते. परंतु हेच काम जीवन प्राधिकरणाने साडेतीन ते चार कोटी रुपयांना घेतले.

सभापती महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पुण्यामध्ये गटार योजनेचे काम केले आहे. त्यांनी हे काम ठेकेदार म्हणून घेतले आहे. सल्त्लागार म्हणून नाही. मजीप्राने हे काम 0.5 टक्क्यांनी घेतले आणि 0.25 टक्क्यानी ते काम प्रायमोस्ट स्ट्रक्चरला दिले. म्हणजे त्यांनी अर्ध्या किंमतीमध्ये ते काम दुसऱ्याला दिले. ही दलाली कशासाठी ? अशाप्रकारे जीवन प्राधिकरणाचे काम सुरु आहे. या प्रकल्पाची किंमत 750 कोटी रुपये होती. मग पुणे महानगरपालिकेला 0.27 टक्के तोटा या देण्याघेण्यामध्ये म्हणजे कंत्राट घ्यायचे आणि सबलेट कंत्राट नेमायचे यामध्ये झाला. आपल्याला याची कल्पना असेल, दादा या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांना याची कल्पना असेल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे ठेकेदारी करण्याचे काम नाही. दुसऱ्याला सल्लागार नेमत आहेत तर त्याचे टेंडर मागवा. महानगरपालिका आणि नगरपालिकांकडे पैसा कमी आहे. कमीत कमी पैशामध्ये कसे चांगले काम होईल हे पाहिले पाहिजे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, नगरपालिकांकडे इंजिनिअर्स नसतात. त्यामुळे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घ्यावी लागते. तांत्रिक मान्यता घेणे हा एक भाग झाला. नळ पाणी पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग तांत्रिक मान्यता देणे, किंवा तशा प्रकारचे मार्गदर्शन करणे आणि पाणी योजना घेणे या दोन्ही गोष्टी करु शकतात एवढेच मी सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मग ते उप सल्लागार कशाला नेमत आहेत ? कोणतीही बाब मंत्रालयात आल्यावर काय होते त्याचा मी विषय मांडत होतो. मंत्रालयात केस आल्यावर अधिकारी मंत्रालयात खेटे घालणार, आमची नस्ती कोठे आहे, कुठपर्यंत आली आहे हे सांगा, असे प्रकार होणार. सर्वच चुकीचे असेल मी म्हणत नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्व काम करणार आहे तेव्हा त्यांना त्याची टक्केवारी द्यावी लागणार आहे. मंत्रालयात मंजुरीसाठी बाब आल्यानंतर त्यास किती दिवसांत मंजुरी मिळाली पाहिजे या बाबतचा उल्लेख कुठेही केलेला मला दिसत नाही. असल्यास माननीय मंत्री महोदयांनी मला तो सांगावा. त्याचे कारण असे की, उद्या सिंचनाचे प्रस्ताव येतील त्यावेळी आपल्याला भूकंप झाल्याचे जाणवेल. 30 ते 35 कोटी रुपयांचे प्रकल्प 300 ते 350 कोटी रुपयांचे झालेले दिसतील.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम श्री. अ.शिगम. . .. 04:20

श्री. दिवाकर रावते...

मूळ प्रकल्प 1 रुपयाचा असेल आणि केवळ मंत्रालयाच्या दिरंगाईमुळे उद्या त्या प्रकल्पाची किंमत एक रुपयाची पाच रुपये झाली तर ती जबाबदारी कोणाची? नगरपालिकांची आर्थिक क्षमता नाही त्यामुळे ही कामे होणार नाहीत.

सभापती महोदय, पाणी पुरवठा योजना संभाजीनगर बाबत मी बोलू इच्छितो. या प्रकल्पाची जेवढी मूळ किंमत होती त्या संदर्भात केंद्र शासनाचे पैसे आले, राज्य शासनाचे पैसे आले. पण त्यानंतर ती योजना बीओटी तत्वावर घेतली गेली. अलीकडच्या काळात बीओटीचे खूप खूळ आलेले आहे. नवीन पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत बांधा वापरा आणि हस्तांतरित करा असे धोरण स्वीकारण्यात आलेले आहे. या अंतर्गत 30 वर्षाचे वसुलीचे ॲग्रीमेंट करण्यात येते. नगरपालिकेने काही पैसे टाकावयाचे संबंधित कंपनीने तेवढेच पैसे टाकावयाचे त्यानंतर वसुलीची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात येते. अशा प्रकारे या योजनेचा खर्च 114 कोटी रुपयांच्या वर गेलेला आहे. 114 कोटी रुपये शासनाने त्यांना कर्ज दिलेले आहे. ते महापालिकेने फेडावयाचे आहे. महापालिकेचे पंपाच्या विजेचे 150 कोटी रुपयांचे देयक थकित आहे. संभाजीनगर महापालिकेचा हा प्रश्न आम्ही बऱ्याच वेळा हाताळलेला आहे. मंत्री म्हणून तुम्ही थोडीशी कृपादृष्टी दाखविली म्हणून ती योजना सुरळीत चालली आहे. पण वसुली व्यवस्थित होत नाही. ज्या महापालिकेला विजेचे 150 कोटी रुपयांचे बिल भरता येत नाही त्या महापालिकेला 114 कोटी रुपयांचे लोन शासनाने दिलेले आहे.

सभापती महोदय, नगरविकास खात्याचेही मला आश्चर्य वाटते. अशा या महापालिकेमध्ये लोकांचे जमा केलेले पैसे रस्त्या करिता, झाडलोटीच्या कामा करिता, पगारा करिता आणि इतर कामा करिता वापले जात आहेत. तेथे अधिकाऱ्यांचे मोठे रॅकेट तयार झालेले आहे,ते मी या ठिकाणी सांगणार नाही. पण अधिकारी कोटयवधी रुपयांचा कर भरत नाहीत. श्री. मापकर नावाचे आयुक्त यांनी ते सगळे ऐकले आणि ते फक्त हसले अशी वर्तमानपत्रात ठळक बातमी आली होती. अधिकाऱ्यांकडून कर्ज वसुली करण्यात येत नाही. महापालिकेचे विजेचे थकित बिल निघून जाईल एवढे ते कर्ज तुंबलेले आहे. अधिकारी ते पैसे वापरतात. त्या महापिलकेला शासनाने 114 कोटी रुपये सॉफ्टलोन दिलेले आहे आणि तेही बिनव्याजी दिलेले आहे असे मला कळले आहे, ती आनंदाची बाब आहे. पण हे विधेयक कशासाठी आणलेले आहे? या सर्व योजना राबवत असताना त्यातून काय-काय निर्माण झालेले आहे, याबद्दल मी अकोल्याच्या, सोलापूरच्या आणि

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते. . . .

संभाजीनगरच्या सिव्हरेज प्रकल्पाचे, मलनिस्सारण प्रकल्पाचे आणि जल प्रकल्पाचे उदाहरण दिलेले आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या कलम 10. मुख्य अधिनियमाच्या कलम 75 मध्ये :- जे म्हटलेले आहे ती या विधेयकातील सगळयात महत्वाची मेख आहे. मंत्री महोदयांनी कौतुकाने असे सांगितले की,"आपल्या महापालिकेत नाही का अतिरिक्त आयुक्त असतो तसा हा आहे." मंत्री महोदयांचे शब्द असेच आहेत. पण वस्तुस्थिती तशी नाही. मुंबई महानगरपालिकेत चार अतिरिक्त आयुक्त आहेत परंतु या चारही अतिरिक्त आयुक्तांना मुख्य आयुक्तांनी नेमून दिलेली कामे करावी लागतात. त्यांनी तेवढीच कामे करावयाची असतात, तेवढयाचेच निर्णय घ्यावयाचे असतात. त्यांनी संपूर्ण महापालिका धुंडाळावयाची नसते. त्या बाबतीत निर्णय घ्यावयाचे नसतात. एका अतिरिक्त आयुक्ताकडे एक शहर असते तर दुसऱ्या अतिरिक्त आयुक्तांकडे उपनगर असते मग त्याचे सर्व अधिकार त्यांना असतात. शिक्षण व आरोग्य विभागाच्या बाबतीत त्यांनी सर्व निर्णय घ्यावयाचे असतात पण ते निर्णय योग्य आहेत काय हे ठरविण्याचे अधिकार आयुतांना आहेत. मंत्री महोदय, "तसे नेमले आहेत" असे म्हणाले आहेत. पण हे तसे नाहीत, असा मी या ठिकाणी मुद्दाम खुलासा करु इच्छितो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना मी विनम्रपणे सांगू इच्छितो की, जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हाधिकारी आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेच्या ठिकाणी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी असतात. मी असे म्हणालो की,'अ' वर्ग दर्जाची नगरपालिका आहे. या 'अ' वर्ग दर्जाच्या नगरपालिकेची लोकसंख्या किती असते? एक लाखा पासून तीन लाख लोकसंख्येपर्यंत 'अ' वर्ग दर्जाची नगरपालिका असते.तीन लाख किंवा तीन लाख लोकसंख्येच्या पुढे 'ड'वर्ग महानगरपालिका होते. आणि ज्यावेळेला ती 'ड' वर्ग महानगरपालिका होते तेव्हा आपोआपच त्यांना अतिरिक्त आयुक्त येतो म्हणून 'अ' वर्ग दर्जाची जी नगरपालिका असते ती तीन लाख लोकवस्तीपर्यंत होते, पर्यायाने ती 'ड'वर्ग महानगरपालिकेच्या लेव्हलला जाते. म्हणून तिला एक अतिरिक्त मुख्य अधिकारी नेमला जावा आणि जे सन्माननीय सदस्य श्री. रावते यांच्या कल्पनेमध्ये आहे, विचारामध्ये आहे, तशाच पध्दतीने मुख्य जो मुख्याधिकारी आहे, त्याचे अधिकार तेच राहतील.

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

आणि ज्या पध्दतीने अतिरिक्त आयुक्त किंवा अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असतात तशा पध्दतीने कामाची विभागणी होईल असे या बिलामध्ये आपल्याला अपेक्षित आहे.

श्री. दिवाकर रावते : तसे असते तर मी बोललो नसतो. पण आपण सांगितल्यामुळे मी पुन्हा आपल्याला सांगतो की, जर आपण कायद्यातील तरतुदी वाचून आला असता तर पुन्हा बोलण्यासाठी उभे राहिला नसता. आता मी कायद्यातील तरतूद वाचून दाखवतो. पृष्ठ क्रमांक 4 वर कलम 10 मध्ये असे म्हटले आहे की, "(1अ) राज्य शासन, अ-वर्ग नगरपरिषदेवर अपर मुख्य अधिकाऱ्याचे पद निर्माण करील आणि त्या पदावर योग्य व्यक्तीची नियुक्ती करील. ही व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्याच्या नियंत्रणास अधीन राहून, जिल्हाधिकारी विनिर्दिष्ट करील अशा मुख्य अधिकाऱ्याच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करील आणि मुख्य अधिकाऱ्याची सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये व कामे पार पाडील." यामध्ये 'सर्व' हा शब्द वापरलेला आहे. मुख्य अधिकाऱ्याच्या नियंत्रणास अधीन राहून असे म्हटले असले तरी त्याला सर्व अधिकार दिलेले आहेत. तो निर्णय घेण्यास सक्षम आहे. त्याला पूर्ण निर्णय घेण्याची क्षमता आपण बहाल करीत आहात. मुख्याधिकाऱ्याला जे अधिकार आहेत ते सर्व अधिकार त्याला देत आहात. यामध्ये आपण 'सर्व' असा शब्द वापरलेला आहे त्यामुळे आपल्याला जे अभिप्रेत आहे ते त्या शब्दामुळे मार खात आहे. आपल्या मनात बरोबर आहे पण कायदा तयार करताना तो अधिकाऱ्यांकडून येतो. कायदा तयार करणारा अधिकारी हुशार असतो. आम्हाला त्याचा अनुभव आहे. त्यांनी आणलेले नगरविकास खात्याचे एक एक मास्टरपीस आहेत. मी त्यांना दाद देतो. ज्याला गहिरा अभ्यास म्हणतो तसा त्यांचा अभ्यास असतो. परंतु फेरीवाल्यांच्या बाबतीत अजून योग्य पध्दतीने काम केले नाही याबद्दल खेद आहे. त्यांनी ते करावयास पाहिजे होते. कारण मुंबईकरांना खूप त्रास आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, बिल कसे वाचावे याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी मार्गदर्शन केले तर आमच्या ज्ञानामध्ये भर पडू शकेल. या कलमामध्ये असे म्हटले आहे की, "त्या पदावर योग्य व्यक्तीची नियुक्ती करील. ही व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्याच्या नियंत्रणास अधीन राहून.." त्यानंतर पुढचा सगळा प्रिॲम्बल आल्यानंतर त्याचा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

कॉन्टेक्स्ट लक्षात घेता मुख्य अधिकाऱ्याचे नियंत्रण कोठेही कमी होणार नाही हे यातून स्पष्ट होते असे मला वाटते. त्यामध्ये जर काही चूक असेल तर सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री. दिवाकर रावते : मला आपण विधेयक वाचण्याकरिता मदत केल्याबद्दल मी आपले आभार मानतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आर्थिक व्यवस्थापनाबद्दल सर्व वरिष्ठ नेत्यांचा सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांच्यावर विश्वास आहे त्यामुळे ते सगळे व्यवस्थित बघतात. त्याबद्दल काही प्रश्नच नाही. समजा कधी तरी दादांना असे वाटले किंवा कोणी तरी त्यांच्या कानात येऊन सांगितले की, अमुक आहे, तमुक आहे तर श्री. हेमंत टकले यांच्यासारख्यावर कसा संशय घ्यावयाचा ? हुशार राजकारणी संशय घेत नाहीत. तो दुसरा माणूस नेमतो, त्याला सगळे अधिकार देतो आणि तुम्हालाही न दुखवता सांगतो की, टकले साहेब, यांना जरा मार्गदर्शन करा. म्हणजे तुमचे अधिकार नकळत काढून टाकतात. म्हणजे पद तेच असते पण सहकोषाध्यक्ष नेमल्यानंतर जी अवस्था होते ती अवस्था मला हे विधेयक वाचताना आढळून आली. ती अवस्था आपल्याला आढळून आली नसेल तर माफ करा. विधेयक हे एका-एका शब्दावर चालते.

आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी की, सरकारला प्रशासकीय अधिकाऱ्याला दुखवावयाचे नाही पण तो जो नेमलेला अधिकारी आहे त्याच्यावर शासनाचा विश्वास नसेल तर त्याला कार्यमुक्त करण्याच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरता येतात. त्यामध्ये यामध्ये फार हुशारीने तो शब्द टाकलेला आहे. विधेयकातील तो शब्द मला कळला. आपल्याला कळले की नाही याबाबत आपण चिंतन केले तर बरे होईल. यामध्ये मुख्य अधिकाऱ्याच्या नियंत्रणास अधीन राहून म्हणजे त्याच्या हाताखाली काम करतो असे यामध्ये दाखविले आहे पण पुढे "जिल्हाधिकारी विनिर्दिष्ट करील अशा मुख्याधिकाऱ्याच्या सर्व" असे म्हटले आहे म्हणजे जिल्हाधिकाऱ्याना शासन सांगेल की, त्याचे अधिकार वाढवून द्या आणि ते बरोबर करुन घ्या. यामध्ये ती मेख आहे. यामध्ये सरकार नाही तर जिल्हाधिकारी विनिर्दिष्ट करील अशा मुख्य अधिकाऱ्याच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करील असे म्हटले आहे. हा एक भाग झाला.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

दुसरी जी तरतूद केली आहे ती मला मान्य आहे. त्यांना सिव्हरेज प्रोजेक्ट, वॉटर प्रोजेक्टचे काम बघण्यास सांगितले आहे. परंतु या ठिकाणी 'सर्व' हा शब्द घातलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना सांगतो की, सह कोषाध्यक्षांना नेमून कोषाध्यक्षांचे सर्व अधिकार काढून घेण्यासाठी सुध्दा तेसमर्थ आहेत. हे उदाहरण पटले की नाही ते बघावे. तुम्ही कितीही चांगले असाल, सर्व चांगले असेल परंतु मला तेथे माझा माणूस पाहिजे, यासाठी जी व्यवस्था केली जाते तशी व्यवस्था या विधेयकात करण्यात आलेली आहे. मुंबई महानगरपालिकेमधील आयुक्तांना बरेच अधिकार आहेत. मी आज सभागृहात जे पाहिले ते मुद्दाम रेकॉर्डवर येण्यासाठी बोलत आहे. सरकारच्या प्रमुखाला जो अधिकार असतो तो महत्वाचा असतो.

आज 3 मंत्री महोदय वेगवेगळ्या प्रश्नांना उत्तर देताना असे म्हणाले आहेत की, आम्ही आदरणीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन सांगू. हे उत्तर राज्यमंत्र्यांनी दिले तर मी समजू शकतो. परंतु कॅबिनेट मंत्र्यांना पूर्ण अधिकार असतात. त्या अधिकाराच्या बाहेर जाऊन निर्णय घ्यावयाचा असेल तर त्यासाठी कॅबिनेटसमोर जावे लागते. राष्ट्रवादीच्या एकाही मंत्री महोदयांनी अशा प्रकारचे उत्तर दिल्याचे आम्हाला आढळलेले नाही. या तिन्ही मंत्री महोदयांनी अशी उत्तरे दिलेली आहेत, खात्याचे मंत्री म्हणून त्यांचा एक सन्मान केला पाहिजे, त्यामुळे मी जाहीरपणे त्यांची येथे नावे घेत नाही. पण येथे अशा प्रकारची उत्तरे मंत्र्यांकडून मिळत असल्यामुळे सरकार चालवित असताना मंत्र्यांची अगतिकता आम्हाला दिसून येते. मंत्र्यांना लक्ष्मणरेषा आखून दिलेली आहे, त्याच्या बाहेर जाऊन एखादा निर्णय घ्यावयाचा असेल तर मंत्रिमंडळासमोर जावे लागते. ही एक प्रक्रिया आहे. परंतु आपल्याकडे अधिकार कक्षेच्या बाहेर जाण्याचा विषयच येत नाही. आम्ही सारखेच बाहेर जातो. त्यामुळे काही तरी सांगून वेळ मारुन न्यावयाची. सन्माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांच्याकडून अशी एक चूक झाली होती. त्याची मी आठवण करुन दिल्यावर त्यांनी ते मान्य करुन मी पुन्हा असे बोलणार नाही असे म्हटले होते. हे सर्व खाजगीमध्ये सांगावे लागते.

यानंतर श्री.देवदत्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/DD/

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, हमारे सम्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते साहब शायद मराठी कापी पढ़ रहे हैं. लेकिन इस बिल की अंग्रेजी कापी में क्लॉज 10 में लिखा है कि " In section 75 of the Principal Act,- (a) after sub-section (1), the following sub-sections shall be inserted, namely:- 1(A) The State Government may create...." Here it is written 'may create', it is not compulsory. ".....a post of Additional Chief Officer in A-Class Municipal Councils and appoint a suitable person on that post, who shall, subject to the control of the Chief Officer..." इसका मतलब है कि एडमिनिस्ट्रेटिव कंट्रोल. "...exercise all or any of the powers and perform all or any of the duties and functions of the Chief Officer, as may be specified by the Collector." सभापति महोदय, मैं कहना चाहता हूं कि यदि कोई बिल या एक्ट आता है तो उसकी यह ट्रेडिशनल लेंग्वेज रहती है. This is the standard wording used in the Bill. कंट्रोल का मतलब है कि जो एडिशनल सीईओ आएगा, he cannot be an independent body. He has to work under the control of the Chief Executive Officer. हम माननीय दिवाकर रावते साहब से समझना चाहते हैं कि माननीय सदस्य का ऑब्जेक्शन कौन से पाइंट पर है ? यह बात मैं अपनी जानकारी के लिए पूछ रहा हूं.

इसके बाद श्री शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी मांडलेला मुद्दा अतिशय योग्य आहे. इंग्रजीमध्ये "कंट्रोल" शब्दाचा जो भाव व्यक्त होतो तसा भाव मराठीमध्ये "अधीन" शब्द योजून होत नाही. त्या ठिकाणी "नियंत्रण" शब्द वापरला पाहिजे. या नंतर विजेच्या संदर्भातील विधेयक सभागृहामध्ये येणार आहे. त्यामध्ये इंग्रजीचे मराठीत भाषांतर करताना भलताच परिच्छेद विधानसभेमध्ये पारित झालेला आहे. ही बाब निदर्शनास आणल्यानंतर ती चूक माननीय अध्यक्ष, विधानसभा यांच्याकडून दुरुस्त होईल. इंग्रजी विधेयकाचे मराठीमध्ये भाषांतर करीत असताना सोईचा अर्थ लावला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. इंग्रजी विधेयकाचे जेव्हा मराठीमध्ये भाषांतर होते त्यावेळी मराठीत देखील तोच भाव आलेला आहे का हे पाहिले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : मी विधेयकाच्या इंग्रजी प्रतीतील कलम वाचतो. "The State Govt. may create a post of Additional Chief Officer in A-Class Municipal Councils and appoint a suitable person on that post, who shall, subject to the control of the Chief Officer, exercise all or any of the powers......" येथे "all" शब्दाचा वापर करण्यात आला आहे. "all" म्हणजे सर्व......

श्री. अरुण गुजराथी : मी राज्यमंत्री होतो त्यावेळी बजेट वाचत असताना इंग्रजी आणि मराठी प्रतीमध्ये फक्त "कॉमा" नव्हता त्यामुळे अर्थ बदलत होता. आज कोर्टामध्ये इंग्रजी मधील ड्राफ्टींग उचित धरले जाते, मराठीतील धरले जात नाही. तेव्हा विधेयक तयार करीत असताना आपण ते प्रथम मराठीमध्ये तयार केल्यानंतर त्याचे इंग्रजी भाषांतर केले तर हा प्रश्न निर्माण होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कायद्याची चर्चा या ताकदीची असली पाहिजे. कायदा योग्य असावा असा प्रयत्न असला पाहिजे.

सभापती महोदय, पान क्रमांक 5वर असे म्हटलेले आहे की,

"83-अ. (2) जर नगर परिषदेने पोट-कलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत निर्णय घेण्यात कसूर केली तर, मुख्य अधिकारी मंजुरीसाठी किंवा मान्यतेसाठी असा प्रस्ताव जिल्हाधिका-याला सादर करील. अशा प्रस्तावावर जिल्हाधिका-याने दिलेला निर्णय हा नगरपरिषदेने दिलेला निर्णय आहे असे मानण्यात येईल आणि मुख्य अधिकारी तशा आशयाचा अहवाल नगरपरिषदेला देईल."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मुख्याधिकारी जो प्रस्ताव तयार करतील त्यावर जिल्हाधिकारी जो निर्णय देतील तो बंधनकारक राहील. शासकीय सेवेतील दोन अधिकारी असताना मध्येच करीमभाई कशासाठी ? कलम 83अ(2) प्रमाणे पूर्ण अधिकार जिल्हाधिका-यांना दिलेले आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 04:40

श्री.दिवाकर रावते.......

मग जिल्हाधिकाऱ्यांना त्यांनी अधिकार का द्यायचे? गरज नसताना तुम्ही हे विधेयक आणले आहे. हे विधेयक अयोग्य आहे. अपर मुख्याधिकारी नगरपालिकेमध्ये नेमण्याची आवश्यकता नाही. तुम्ही या विधेयकामध्ये 2 नंबरचे परंतुक टाकले आहे. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, पोटकलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत निर्णय घेण्यात कसूर केली तर, मुख्य अधिकारी मंजुरीसाठी किंवा मान्यतेसाठी असा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्याला सादर करील. अपर मुख्याधिकारी याला तो सादर करावा लागणार आहे. जिल्हाधिकारी सक्षम असताना याची गरज नाही. तुमच्या या विधेयकामध्ये हे दोन अधिकारी एकमेकासमोर आहेत. उपसूचना ज्या मांडल्या आहेत त्या स्वीकारुन यामध्ये बदल करावा लागेल किंवा संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठवून त्या ठिकाणी दोन आठवड्यात बदल करुन पुन्हा विधेयक सभागृहापुढे आणावे लागेल. मी मघाशी 2 नंबरचे कलम वाचून दाखविले.

सभापती महोदय, कलम 83(अ) मध्ये म्हटले आहे की, Whether it is part of agenda of the meeting or not." आयत्या वेळेचा प्रस्ताव असणार आहे. याला 60 दिवसाची मुदत दिली आहे. 60 दिवसापुढे थांबवून ठेवता येणार नाही. सर्वात गंमतीदार भाग असा की, पुढची सभा आहे. आयुक्त अध्यक्षांकडे येऊन बसले आणि त्यांना सांगितले की, प्रस्ताव तयार झाला आहे. अमुक आले, तमुक आले, 150 कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे. तुम्हाला बाकी माहिती आहे. महानगरपालिकेमध्ये तसे सगळे चालते. नगरसेवकांना, गटनेत्यांना मेहनत घ्यावी लागते. मग आयत्यावेळेचा प्रस्ताव आणण्यास ही मुभा मिळाली. त्याला 60 दिवसाची मुदत नाही. अध्यक्षांना पत्राने मुख्याधिकाऱ्यांनी कळविल्यापासून 60 दिवस. म्हणजे 60 दिवसाच्या आत केव्हाही प्रस्ताव आणता येईल. माझ्याकडे आज मुख्याधिकारी या नात्याने प्रस्ताव तयार झाला. मोठा प्रस्ताव आहे. गडबडीत सगळ्यांना विश्वासात घ्यावयास पाहिजे. पध्दतशीर विश्वासात घेतले पाहिजे. माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे नगराध्यक्ष आहेत. ते दम देणार. तुम्ही प्रस्ताव पाठवित नाही म्हणजे काय? आम्ही शहराकरिता, शहराच्या हितासाठी योजना राबवू पहात आहोत. अगोदर आलेला प्रस्ताव एका दिवसात अजेंड्यावर असेल किंवा नसेल तो मांडण्याची या कायद्यात मुभा निर्माण झाली. हे का झाले? या कायद्याचा मला जो अर्थ समजला तो असाच आहे. You can bribe the mentality of the entire Body or the President. शुध्द मराठीत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

सांगितले की लगेच कळते. एकदा माणसाची मानसिकता बिघडली की कुठलाही ठराव चालतो. आमच्या अकोल्यामध्ये काय घडले? मंत्री महोदयांच्या सूचनेप्रमाणे मी पुढील मजकूर वाचतो. "परंतु अशी कोणतीही मानीव मंजुरी किंवा मान्यता या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या विद्यमान तरतुदींना अनुरुप असलेल्या प्रस्तावाच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित असेल."

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

पण याची व्याप्ती कोण ठरविणार हा महत्वाचा प्रश्न आहे. Sewerage project is the project of the city. हा प्रकल्प 50 कोटीच्या वरचाच असणार पण हे परंतुक केवळ वाचविण्यासाठी सांगितले.

शेवटी आपण कायदा करणारच कारण अधिकाऱ्यांच्या डोक्यात हा कायदा फिट बसलेला असतो आणि त्यांना चांगलेच माहीत असते की त्यांना काय साध्य करावयाचे ते. त्यांना पाहिजे तसा ते त्या कायद्याला वाकवितात, आपण मात्र जनहितासाठी कायदा असल्याचे म्हणतो. मी विचारल्यानंतर I do not read the paper. I read the people असे सांगितले जाईल. आपण लोक प्रतिनिधी लोकांना वाचत असतो, त्यांना वाचण्यायोग्य कायदा बनविण्यासाठी हे बोलावयाचे असते. हा मानापमानाचा विषय नसतो तर "We together"असा कायदा होतो. मग तो करीत असताना कोणी विरोधी नाही तर कोणी सत्ताधारी नाही अशा भूमिकेतून तो कायदा आपण करीत असतो. त्यातून जनतेचे हित पहायचे असते. कारण कायदा करीत असताना सत्तारुढ पक्षाच्या बाकावरील सदस्य सुध्दा क्लिष्टपणे भाष्य करीत असतात. म्हणून ही जी तरतूद टाकलेली आहे की, आयत्या वेळी भराभर प्रस्ताव टाकायचे आणि म्हणायचे की बघा, आपण जर हे मंजूर केले नाही तर अमुक होऊन जाईल, जिल्हाधिकाऱ्यांकडे मान्यतेसाठी जाईल अशा प्रकारची मानसिकता बिघडविण्याचा प्रकार होऊ शकतो. पण शासनाने अशी तरतूद केली की, "कमीत कमी 60 दिवसात पण 30 दिवसापूर्वी नाही" 30 दिवसांपूर्वी तो मंजुरीसाठी येता कामा नये, तत्पूर्वी कमीत कमी 30 दिवसात नगराध्यक्षांच्या माध्यमातून, नगराध्यक्ष, उप नगराध्यक्ष, गट नेत्यांनी लोकांमध्ये जाऊन योजनेची माहिती दिली पाहिजे, आपल्या महापालिकेत भविष्यात जो मोठा प्रकल्प आपण राबवित आहोत त्याची व्याप्ती इतकी इतकी आहे, मग केवळ सहकार्य नको तर हा प्रकल्प राबविल्यानंतर अमुक इतका कर भरावा लागणार आहे, पण याची गरज आहे काय याचा विचार कोणी करणार की नाही याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

शासनाने हगणदारी मुक्त योजनेची जाहिरात करताना गावातील लोक टमरेल घेऊन शौचास जाताना दाखविले आहे. किती गलिच्छ प्रकार आहे ? तसेच हगणदारी मुक्त गांव असा शब्दप्रयोग करण्याऐवजी दुसरा शब्दप्रयोग का केला जात नाही हेच मला समजत नाही. अशा प्रकारे मराठी चित्रपट "येड्याची जत्रा" नुसार ही जाहिरात दाखविली जाते. तसेच लोक जेवायला बसलेले असतात तेव्हा टमरेल घेऊन जाण्याची जाहिरात दाखविली जाते हे कितपत योग्य आहे. त्याला प्रतिशब्द मी सुचविणार नाही, कारण ते आमचे काम नाही. जेव्हा आम्ही तेथे येऊ तेव्हा काय करायचे ते करु. ......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

पण ग्रामीण भाग मलनिस्सारणाच्या बाबतीत अजूनपर्यंत प्रगल्भ झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु आपण मलनिस्सारणाचा भाग कोठे डिस्पोजल करणार आहात याचे काही उत्तर मिळत नाही. मलनिस्सारणाचा प्रकल्प हा महाकाय प्रकल्प असून हा प्रकल्प माझ्या कारकिर्दीत झालेला असल्यामुळे मला या प्रकल्पाची संपूर्ण कल्पना आहे. या विधेयकामध्ये फार विसंगती आहे. या विधेयकामध्ये "कार्य सूचीवर असो किंवा नसो 15 दिवस अगोदर" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, या सभागृहात सुध्दा चार वाजता मंत्री येतात आणि सांगतात माझे बिल घ्या, माझे बिल घ्या. विधेयक शब्द सुध्दा मंत्री उच्चारत नाहीत. चेअरवरुन आम्हाला विनंती केली जाते व आम्हीही म्हणतो चला विधेयक घेऊन टाका. येथे जर असा प्रकार असेल तर तेथे आपण काय करणार आहात याचा विचारच केलेला बरा.

सभापती महोदय, मलनिस्सारण प्रकल्पामध्ये केंद्र सरकारचा तसेच राज्याचा पैसा अडकलेला आहे. संपूर्ण हिंदुस्थानच्या जनतेचा 90 टक्के पैसा शासनाने गोळा केलेला आहे तो पैसा या योजनेसाठी खर्च केला जात आहे. 90 टक्के पैसा हा जर 10 टक्के जनतेचा पैसा असेल तर त्या पैशाची योग्य काळजी घेऊन, प्रकल्प योग्य प्रकारे राबविला गेला पाहिजे अशी या कायद्यामध्ये तरतूद असली पाहिजे, ती मुक्तता देणारी तरतूद या कायद्यामध्ये असता कामा नये असे मला वाटते.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात अधिका-यांनी फार गंमती केलेल्या आहेत. या प्रकल्पाच्या कामाचे दोन बजेट होणार हे बरोबर आहे. हा पैसा आपल्याला इतर ठिकाणी वापरता येणार नाही. राष्ट्रीयकृत बँकेत पैसे गुंतवावे असा जो उल्लेख करण्यात आलेला आहे तो अगदी बरोबर आहे. सहकारी संस्था आता खऱ्या राहिलेल्या नाहीत, त्या केव्हाही बुडतील असे सरकारलाच वाटावयास लागले आहे ते बरोबर आहे. सहकारी बँका कधी बुडतील याची माहिती नसल्यामुळे ते पैसे राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवले गेले पाहिजे असा आपण जो उल्लेख केलेला आहे त्याचे मी स्वागत करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, अकोला महानगरपालिकेचे पैसे अकोला सहकारी बँकेत होते परंतु ही बँकच बुडाल्यामुळे महा नगरपालिकेचे आणि तेथील जनतेचेही पैसे बुडाले आहेत. हे पैसे कसे प्राप्त करावयाचे असा आता प्रश्न निर्माण झालेला आहे. या प्रकरणामध्ये संबंधितांवर गुन्हे दाखल झालेले आहेत परंतु तरी सुध्दा महानगरपालिकेचे पैसे बुडालेच आहेत. आपण या ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकेत पैसे ठेवण्याचा जो निर्णय घेतलेला आहे तो मला योग्य वाटला आहे.

सभापती महोदय, विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 7 मधील (ब) मध्ये असे म्हटले आहे की, "नगरपरिषद स्वत:हून निश्चित करील किंवा पाणीपुरवठा किंवा मलप्रवाह विल्हेवाट योजना मंजूर करण्याच्या वेळी किंवा संकल्पित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा किंवा मलप्रवाह विल्हेवाट योजनेचे अन्वेषण करणे, तिचा आराखडा तयार करणे व अंदाज तयार करणे आणि तिची अंमलबजावणी करण यांकरिता नगरपरिषदेस लागणा-या कोणत्याही कर्जास कोणतीही हमी देण्यापूर्वी, राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येईल इतक्या वर्षासाठी, मागील पूर्ववर्ती वर्षाच्या सर्वसाधारण महसुलाची अशी टक्केवारीची रक्कम." याचा अर्थ कर्ज घेण्यापूर्वी सरकारची मान्यता घ्यावी लागेल. जर नगरपालिकेचा महसूल कमी असेल व त्या योजनेपर्यंत कर्ज मंजूर होत नसेल तर काय ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ शरद 04:55

श्री.दिवाकर रावते...

याचे उत्तर अजून मला कळलेले नाही. आपण कायद्यातच उत्पन्नाच्या पद्धतीवर बंधन घातले आहे.

माननीय उप मुख्यमंत्र्यांनी कर्जाच्या बाबतीत बोलताना सांगितले की, आजही आपण 26 टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो. आपले कर्जाचे प्रमाण 18 टक्क्यांपर्यंतच गेले आहे. आपल्याला अजून कर्ज घेता येईल. त्यामुळे कर्जाची बोंब मारू नका. खरे म्हणजे आपण 26 टक्क्याच्या मर्यादेवरून 29 टक्क्याच्या मर्यादेवर गेला आहात. आकड्यांची फसवाफसवी करून हे सगळे मांडले आहे. तेच आहे असे आपण गृहीत धरू या. कारण ते सभागृहात त्यांनी मांडले आहे. मागचे महसुली उत्पन्न न मिळाल्यामुळे 2000 कोटीची तूट आली, ती लक्षात घेतली तर आपली कर्ज घेण्याची 26 टक्क्यांची मर्यादा पार झाली आहे हे लक्षात येईल. ती आज 29 टक्क्यांच्यावर गेली आहे. आज आपण 154 कोटी आलेत हे गृहीत धरून सर्व मांडले आहेत. त्यामुळे आपण 18 टक्क्यांवर आलो आहोत. म्हणजे अजून आम्हाला 8 टक्के कर्ज घेण्याची मुभा आहे, असे शासनाच्या वतीने मांडण्यात आले.

त्या नगरपालिकेचे उत्पन्न व सर्वसाधारण महसूल अशी टक्केवारी विचारात घेऊन राज्य शासन मंजुरी देणार आहे. 150 कोटीचा प्रकल्प आहे. त्यांची ऐपत 15 कोटीची नाही तर मग ते कर्जाला कशी काय मंजुरी देणार हा प्रश्न माझ्या पुढे आहे. नगरपालिका ह्या छोटया आहेत. नगरपालिका कर्मचाऱ्यांचा पगार देऊ शकत नाही, बिले देऊ शकत नाही. त्यात नगरसेवकांचे ताप असतात. अकोला नगरपालिकेत फार गंमतीदार किस्सा आहे. हा प्रकार बंद केला पाहिजे. मी सहज सुचले म्हणून सांगतो. नगरसेवकाने त्याच्या विभागातील स्वच्छता त्यानेच करावयाची आहे. हा नवीन प्रकार मला कळत नाही. त्यासाठी महानगरपालिकेने नगरसेवकाला अधिकृतपणे महिना 35 हजार रूपये दिले आणि सांगितले की, 35 हजार रूपये घे आणि तुझ्या भागातील स्वच्छता तूच कर. कचरा उचलणार महापालिका. यासाठी नगरसेवक दोन नोकर लावतात. त्याला दोन-तीन हजार रूपये पगार देतात आणि उरलेले पैसे स्वत:च्या खिशात टाकतात. हा नवीन प्रकार मला कळतच नाही. 35 हजार रूपये दर महिन्याला नगरसेवकाला लागू होतात. त्यामुळे ही पद्धत माननीय सचिवांनी तपासून घेतली पाहिजे. ही पद्धत फार कठीण व कडवट आहे. हे पैसे सर्वच नगरसेवकांना देण्यात येतात. त्यामुळे त्या भागातील सफाईच होत नव्हती. हे विचित्र होते. हा प्रकार शासनाला माहिती आहे की, नाही हे मला माहीत नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

कर्ज कसे देणार हा विषय निर्माण होतो. सवलत आली तर सरकार कशी देणार ? शेवटी हमी सरकारला घ्यायची आहे. पुढे तर सगळे गंमतीदार आहे. मघाशी आपण राष्ट्रीयकृत बँकेत पैसे गुंतवायचे असे म्हणालात. म्हणजे ते केव्हाही काढता येतात. मलनिस्सारण आणि पाणी पुरवठ्याचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडल्यानंतर आपले काम सुरू राहणार आहे असे आपले म्हणणे आहे. पान क्र.7 वरील पोटकलम (5) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "पोट कलम (4) मध्ये तरतूद केल्याप्रमणे ज्या पैशांचा ताबडतोब किंवा लवकरात लवकर वापर करणे शक्य नसेल....." प्रकल्पाला मान्यता मिळाली. वर्क ऑर्डर दिली. 4 महिन्यांनी काम झाल्यानंतर आपल्याला बिल द्यावे लागणार आहे. आपल्याला लगेच काही द्यायचे नाही. पैसे आता नकोत. पैसे सहा महिने नकोत. त्यांनी असे सांगितले आहे की, "लवकरात लवकर वापर करणे शक्य नसेल असा उक्त निधीमध्ये जमा असलेला अधिक पैसा, वेळोवेळी मुख्य अधिकाऱ्यास स्थायी समितीने मान्यता दिलेल्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत व्याजाने ठेवता येईल." इथ पर्यंत ठीक आहे. त्याच्या पुढे म्हटले आहे की, "सार्वजनिक कर्जरोख्यांमध्ये गुंतवता येईल." सार्वजनिक कर्ज रोख्यांमध्ये पैसे गुंतविले तर ते कसे काढता येणार आहेत ? हे मला कळलेच नाही. सार्वजनिक कर्ज रोख्यांमध्ये मुदतीची कर्ज रोखे असतात. मुदतीच्या आत पैसे काढता येत नाहीत. मग ते पैसे आपण प्रकल्पासाठी कसे काय वापरणार आहात ? बँकेची ठेव मोडता येते. यात व्याजाचे नुकसान होते. त्यामुळे येथे सार्वजनिक कर्ज रोख्यामध्ये पैसे गुंतविता येईल हे जे नमूद केले आहे ते मला अजून कळत नाही. ते माझ्या कळण्याच्या पलीकडचे आहे. माझ्या समजूती प्रमाणे मुदत संपल्या शिवाय पैसे काढता येत नाहीत. पैसे एकदा गुंतवले आणि मध्येच बिल देण्याची पाळी आली तर कर्ज रोखे वटवा आणि पैसे घ्या असे देखील सांगता येणार नाही.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, मी त्याबाबत विरुध्द अर्थ लावून कलम (7) मधील तरतूद वाचून दाखवितो. ती पुढीलप्रमाणे आहे, "अशी कोणतीही ठेव किंवा गुंतवणूक यांमुळे होणारा तोटा कोणताही असल्यास, जल व मलप्रवाह निधीमध्ये खर्चखाती टाकण्यात येईल" म्हणजेच तोटा झाला तरी चालेल. मला या बाबतीत असे वाटते की, सार्वजनिक रोख्यांची गुंतवणूक ही सार्वजनिक रोखे विकणाऱ्या दलालांसाठी केलेली व्यवस्था आहे. माझ्याकडे अतिरिक्त दहा कोटी रुपये आहेत व ते मला पाच-सहा महिन्यानंतर लागणार आहेत, त्यापैकी 2 कोटी रुपये स्वत:कडे ठेवून आठ कोटी रुपये सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविले. त्यावेळी माननीय श्री. फुंडकर साहेब मला म्हणाले की, ही रक्कम अमुक रोख्यांमध्ये गुंतविली तर त्या रकमेचे अमुक इतके व्याज तुम्हाला मिळेल वगैरे... ते पैसे गुंतविल्यानंतर जी टक्केवारी निघेल त्यामधून गुंतवणूक करणाऱ्या दलालाला अधिकृतपणे 2 टक्के दलाली मिळते. या खात्याच्या अधिकाऱ्यांचा नगरपालिकेमध्ये हा व्यवसाय सुरु आहे. म्हणजे जावयाने कर्ज रोख्यांच्या नावाने एजन्सी घ्यावयाची आणि मग बायकोच्या नावाने, भावाच्या नावाने, मुलाच्या नावाने पैसे गुंतवावयाचे, त्यामधून 2 टक्के अधिकृत कमिशन त्यांना मिळेल. राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये 10 कोटी रुपये ठेवल्यानंतर त्यापैकी 5 कोटी रुपये मोडावयाची पाळी आली तर व्याजासह जे काही नुकसान होईल ते या खात्यामध्ये जाईल हे मला मान्य आहे. सार्वजनिक कर्ज रोख्यांमध्ये पैसे गुंतवायचे म्हटले तर घरातील अण्णा, भाऊ, काका, मामा हेच यामध्ये एजंट निर्माण होतील आणि 2 टक्क्यांप्रमाणे त्यांचे करोडो रुपये सार्वजनिक रोख्यांमध्ये जातील.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 8 वर नमूद केलेली बाब सुध्दा विक्षिप्त आहे. या ठिकाणी उप खंड "तीन" मध्ये असे म्हटले आहे की, "ज्या कालावधीत कर्जाची परतफेड करावयाची तो कालावधी कोणत्याही बाबतीत 60 वर्षापेक्षा अधिक असता कामा नये". ही 60 वर्षाची कालमर्यादा कोठून आणली? म्हणजे यामध्ये जो काही व्यवहार करणारे लोक आहेत ते हयात नसणार. पुढील पिढीचे वाटोळे करणारी ही तरतूद आहे. आपण नगरपालिका कशी चालविणार आहात? ही 60 वर्षाची तरतूद कुणी आणली आहे? या मधील पुढील वाक्य महत्वाचे आहे. "जेथे पूर्वीच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी नवीन कर्ज उभारले असेल तेथे, नंतरच्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी राज्य शासनाने तसा निदेश दिला नसेल तर, मूळ कर्जाच्या परतफेडीसाठीसाठी निश्चित केलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते....

कालावधीच्या उरलेल्या कालावधीपेक्षा अधिक असता कामा नये आणि कोणत्याही बाबतीत, मूळ कर्ज उभारलेल्या दिनांकापासून साठ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये". म्हणजे एकदा कर्ज उभारल्यावर त्या नंतर येणाऱ्या नगरपालिकेला कोणत्याही प्रकारे कर्ज उभारता येणार नाही. साठ वर्षामध्ये अंगावर असलेल्या कर्जाचा बोजा फेडल्याशिवाय तुम्हाला नवीन कर्ज घेता येणार नाही, जर नवीन कर्ज घ्यावयाचे असेल तर त्यामधून असलेले कर्ज वजा करुनच तुम्हाला घेता येईल. ही कल्पना कुणाच्या डोक्यातून आली आहे? म्हणजे या तरतुदीमुळे नगरपालिकेच्या पुढील दोन पिढयांचा प्रश्न निर्माण झाला आहे. मागील पिढीने पुढील दोन पिढयांना साठ वर्षाच्या कालावधीकरिता कर्ज घेऊन बुडवून टाकले आहे. कर्ज घेतल्याशिवाय कोणताही प्रकल्प नगरपालिकेमध्ये राबविता येणार नाही अशी भयानक तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आली आहे. या मध्ये फार मोठा साठ वर्षाचा कालावधी घातला असल्यामुळे नवीन कर्ज घेता येऊ शकत नाही अशी भयानक परिस्थिती आहे.

त्यामध्ये आणखी एक गंमत आपल्याला सांगतो. ते म्हणाले की, त्या इंजिनिअर्सवर बोजा पडेल. परंतु तसे नाही. यामध्ये कुणाचे पैसे गुंतलेले आहेत? केंद्र सरकारचे 80 टक्के आहेत, राज्य सरकारचे 10 टक्के आहेत आणि महानगरपालिकेचे 10 टक्के आहेत. आजकाल आपल्याकडे असे चालते की, तो ठेकेदार 10 टक्के रक्कम माझीच आहे असे सांगतो. त्या लोकांकडे लोकवर्गणी भरण्यासाठी पैसे नसतात तरी सुध्दा त्यांची पाणी पुरवठा योजना होत असल्यामुळे ठेकेदार त्यांचे पैसे भरतो. जेणेकरुन गावामध्ये पाणी येत आहे म्हणून तो ठेकेदार 10 टक्के लोकवर्गणी भरतो त्याचे आपल्याला वाईट वाटत नाही, त्याला मी भ्रष्टाचार समजत नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी कलम 90 (क) च्या (2) (ब) मध्ये आपण एक महत्वाचा शब्द टाकला आहे. माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी आता सभागृहात हवे होते. या शब्दाची किंमत त्यांना समजली असती.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, पान क्र.8 वरील (ब) मध्ये असे म्हटलेले आहे की,"कोणतेही बांधकाम करण्यासाठी कर्जाऊ घेतलेल्या किंवा पुन्हा कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमेच्या कोणत्याही भागाचा विनियोग, जे बांधकाम करण्यासाठी पैसा कर्जाऊ घेतला असेल त्याच बांधकामावर,"...... हे एकदम परफेक्ट, एकदम योग्य आहे."त्याच बांधकामावर कामावर लावलेले नगरपालिका अधिकारी"हे महत्वाचे आहे"किंवा कर्मचारी या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्यांचे वेतन किंवा भत्ते देण्यासाठी केला जाणार नाही."हे एकदम टाईट आहे ना.? त्या कामावर असलेले महानगरपालिकेचे कर्मचारी, इंजिनिअर यांनाच पगार देता येईल. बाकीच्यांना देता येणार नाही. पण अधिकारी फार हुशार असतात. ते एक शब्द असा मस्त ठेवतात. बघा आता. "परंतु अशा कामाचे आराखडे व अंदाज तयार करणे किंवा असे बांधकाम करणे किंवा त्यावर देखरेख ठेवणे किंवा अशा कामाचे हिशोब ठेवणे,"यासाठी अंशत:त्या कामाचे विवरण लागू केले.यासाठी आता महत्वाचा शब्द आहे आणि तो म्हणजे"अंशत:""कामावर लावलेल्या नगरपालिका अधिकाऱ्यांचे किंवा कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देण्यासाठी झालेल्या खर्चाचा, नगरपरिषद निश्चित करील, असा भाग अशा कर्जाऊ घेतलेल्या किंवा पुन्हा कर्जाऊ घेतलेल्या रकमेतून देता येईल." सभापती महोदय, हे एवढे सोपे करुन टाकले आहे.मी सी.ई.ओ. म्हणून अंशत: म्हणजे एकाने एक तास हे काम पहावयाचे, मग दुसऱ्याने एक तास काम पहावयाचे. तसेच शिपायाला सांगावयाचे की, तुझी दोन वाजेपर्यंत याठिकाणी ड्युटी, नंतर तुझी तिकडे ड्युटी ऑन रेकॉर्ड म्हणजे कागदावर आणि अशा प्रकारे सगळेच्या सगळे म्हणजे 90 टक्के कर्मचारी प्रकल्पाच्या कामासाठी दाखवावयाचे आणि मग त्यांचे महापालिकेचे पगार सुरु झाले. भारताच्या, महाराष्ट्राच्या जनतेच्या पैशातून, आलेल्या कर्जा मधून यांचे पगार सुरु झाले. कारण याठिकाणी अंशत: हा एक शब्द टाकला. तसेच ते त्या कामावर पूर्णत:नाही तर अंशत: म्हणजे त्या खात्यातील सर्व अधिकारी, सर्व इंजिनिअर, सर्व आर्कीटेक्ट अंशत: काम पहाणार आणि त्यांचे पगार यामधून जाणार म्हणजे पगाराची व्यवस्था झाली मग काम करा किंवा नका करु. आपल्याला आताच फेस आलेला आहे. पगारावरच 62 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त खर्च होतात,बाकी विकासासाठी पैसे उपलब्ध होत नाहीत अशी महाराष्ट्र राज्याची परिस्थिती आहे.नगरपालिकेचा एखादा प्रकल्प तसाच राहील आणि हे सगळे पैसे पगार वाटण्यामध्येच जातील आणि मग प्रकल्पाचे काम अर्धवट राहील अशा प्रकारची एक सुंदर व्यवस्था या विधेयकामध्ये तेथील कर्मचाऱ्यांचे पोट भरण्यासाठी केलेली आहे. याठिकाणी केवळ अंशत: हा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

एक शब्द घातला आहे. हा शब्द कोणी वाचला आहे की नाही हे मला माहिती नाही. तुम्हाला भीती वाटली. याठिकाणी सगळयांची व्यवस्था केली आहे.

सभापती महोदय, पान क्र.9 मध्ये 90 (ई) (2) मध्ये असे म्हटलेले आहे की, "नगरपारिषदेस कर्ज निवारण निधीचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा विनियोग ज्यासाठी असा निधी स्थापन केला होता, त्या कर्जाची फेड करण्यात किंवा फेड करण्यासाठी करता येईल." येथपर्यंत बरोबर आहे. पुढे आणि नंतर गडबड आहे. पुढे असे म्हटलेले आहे की, "आणि नगरपरिषदेने अशा कर्जाची किंवा भागाची पूर्णपणे फेड करण्यात येईपर्यंत, त्याचा अन्य कोणताही प्रयोजनासाठी विनियोग करता येणार नाही."म्हणजे सगळे ब्लॉक झाले. यामध्ये नगरपालिका कर्ज फेडेपर्यंत अडकून गेली आणि कर्ज फेडेपर्यंत नवीन काही नाही. पुढे 90 (फ) मध्ये असे म्हटलेले आहे की, "कर्ज निवारण निधीत भरलेला सर्व पैसा, कलम 90-ईच्या पोटकलम (1) अन्वये ज्या दिनांकास तो भरावयाचा होता त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सरकारी कर्जरोख्यात गुंतवला येईल." म्हणजे परत सरकारी कर्ज रोखे आले. मघाशी सार्वजनिक कर्जरोखे होते, आता सरकारी कर्ज रोखे आले म्हणजे आपल्या सरकारी कर्ज रोख्याचे एजन्ट आहेत की नाही? तर सरकारी कर्ज रोख्याचे एजन्ट आहेत आणि ते जी काही गुंतवणूक आणतात, त्यानुसार त्यांना 2 टक्के, पाच टक्के जे काही असेल ते मिळतात. त्यामुळे कर्ज निवारण निधीची गुंतवणूक या संदर्भामध्ये नगरपालिकांना अत्यंत उत्कृष्ट मार्गदर्शन कायम स्वरुपी प्रकल्पाचे काम थांबविण्यासाठी केलेले आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, 90-ह मध्ये नमूद केलेले आहे की, (अ) "अशी कर्ज उभारण्यात आली तेव्हा ती कर्ज निवारण निधीतून परतफेडयोग्य करण्यात आली असतील तर, नगरपरिषद, कर्ज उभारण्यात आली त्यावेळी निश्चित करण्यात आल्या असतील अशा रकमा, त्या निश्चित करण्यात आल्या असतील अशा दिनांकास अशा कर्ज निवारण निधीमध्ये भरील."

"(ब) अशा कर्जांच्या परतफेडीसाठी स्थापन केलेल्या कर्ज निवारण निधीमध्ये नियत दिवसाच्या........" म्हणजे यामध्ये दोन अकाऊन्टस आहेत. एक प्रोजेक्ट अकाऊन्ट आणि दुसरे कर अकाऊन्ट. मलनिस्सारण आणि पाणी पुरवठ्यातून जेवढा कर मिळेल तो अकाऊन्ट वेगळा असेल. त्याच्यातून हे हप्ते भरायचे त्याचा हा विषय आहे. पुढे नमूद केलेल आहे की, "कर्जनिवारण निधीचा भाग म्हणून नगरपरिषदेकडून धारण करण्यात येईल."

सभापती महोदय, 90-आय अत्यंत गंभीर आहे. त्याला मी "सावकारी" असे नाव दिले आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, "नगरपरिषदेने कर्जाऊ घेतलेला कोणताही पैसा किंवा त्यासंबधी देणे असलेले कोणतेही व्याज, किंवा खर्च याची किंवा यांची कर्जाच्या शर्तीनुसार परतफेड करण्यात आली नाही तर, राज्य शासन, कर्ज त्याने स्वत: दिले असल्यास, नगरपालिका निधी किंवा नगरपालिका निधीचा भाग जप्त करु शकेल, म्हणजे शासनाकडून जे अनुदान मिळणार आहे ते जे कोणी कर्ज फेडत नसेल तर सरकारच्या नावावर जमा होईल. फक्त कागदावर त्यांना अनुदान जाईल. म्हणजे ते अनुदान देण्याचा अधिकार यांना मिळाला आहे म्हणजे वसुली आली. पुढे असे म्हटले आहे की, "आणि अन्य प्रकरणात कर्ज देणाऱ्याने अर्ज केल्यावर, नगरपालिका निधी किंवा नगरपालिका निधीचा भाग जप्त करील" म्हणजे दुसऱ्या कोणाचे कर्ज असेल तर ते देखील अशाप्रकारे फेडण्यात येईल, अशा प्रकारे राज्य शासनाने जप्ती आणलेली आहे. राज्य सरकारने नगरपालिकेवर जप्तीचा अधिकार प्राप्त केलेला आहे.

(2) मध्ये म्हटलेले आहे की, "अशा जप्तीनंतर राज्य शासनाने याबाबत नेमलेल्या अधिकाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने जप्त केलेल्या निधीसंबंधी किंवा त्याच्या भागासंबधी कोणत्याही प्रकारे व्यवहार करता कामा नये." या ठिकाणी अन्य व्यक्ती असा जो उल्लेख केलेला आहे ती अन्य व्यक्ती कोण असा मला प्रश्न पडलेला आहे. पुढे असे नमूद केले आहे की, "परंतु,

श्री.दिवाकर रावते..

अशी जप्ती करण्यात आलेली नसेल तर, कोणत्याही नगरपालिका प्राधिकाऱ्यास, अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास त्यासंबंधी जे व्यवहार करता आले असते ते सर्व व्यवहार अशा अधिकाऱ्यास करता येतील" म्हणजे आपण महानगरपालिका अधिकारी कर्मचारी यांचे अधिकार काढून ते रिकव्हरी अधिकाऱ्यास दिले. पुढे नमूद केलेले आहे की, "अशा जप्तीच्या उत्पन्नाचा विनियोग...." म्हणजे आपण जप्तीचा विनियोग कसा करणार, पैसे तर आले. मग कर्जदार जे काही गहाण ठेवेल ते या जप्तीमध्ये आले. नगरपालिकेकडे जमीनच असते. मग सर्व जमिनींवर जप्ती येणार. पुढे असे म्हटले आहे की, "-अशा जप्तीच्या उत्पन्नाचा विनियोग, सर्व थकबाकी व त्यासंबंधी देय असलेले सर्व व्याज व खर्च व अशा जप्तीमुळे व त्यानंतरच्या कार्यवाहीमुळे झालेला सर्व खर्चाच्या पूर्तीसाठी करता येईल" म्हणजे हा सावकारी पध्दतीने व्यवहार झाला की नाही ? तो अधिकारी जप्ती आणणार आणि ज्यांचे ज्यांचे कर्ज आहे त्यांना त्याचे वाटप करणार. नगरपालिकेचा खुळखुळा वाजणार कारण नगरपालिककडे फक्त जमिनी असतात. केवढ्या तरी मोठ्या प्रमाणावर जमिनींचे लिलाव होतील, मग किती वसुली होईल, किती सेटींग होईल, एक कोटींची जमीन पाच लाखामध्ये, पंचवीस कोटी रुपयांची जमीन एक कोटीमध्ये, महानगरपालिकेच्या सर्व जमिनींचा असा लिलाव होईल. या योजनेमागे किती गंभीरता आहे हे आपल्या लक्षात आले असेल.

सभापती महोदय, खंड 17 मध्ये नमूद केलेले आहे की, मुख्य अधिनियमाच्या कलम 93 मध्ये (अ) पोट-कलम (2) मधील खंड (क) मध्ये "रुपये 7,500, रुपये 5,000 रुपये 2,500 याहून" या मजकुराऐवजी "विहित करण्यात येतील अशा रकमेहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, मूळ कलम 93 (ग) मध्ये असे म्हटले आहे की, "ज्या कोणत्याही संविदेत रु.7,500, रु.5,000 व रु.2,500 याहून अधिक खर्च अंतर्भूत असेल अशी कोणतीही संविदा, नगरपरिषदेने याबाबतीत अन्यथा प्राधिकृत केले नसेल तर, अनुक्रमे 'अ' वर्ग, 'ब'वर्ग किंवा 'क' वर्ग नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी नगरपरिषदेची मान्यता किंवा मंजुरी मिळाल्यावाचून करणार नाही." ही मर्यादा मुख्य अधिकाऱ्यावर टाकलेली आहे. याबाबतीत या विधेयकात असे म्हटलेले आहे की, "हे बदलून या ऐवजी विहित करण्यात येतील अशा रक्कमेवर" निवडून आलेल्या नगरसेवकांचा नगरपालिकेतील अधिकार मोठा आहे. 7,000/- 5000/- आणि 2,500 पेक्षा जास्त खर्च असेल तर नगरपालिकेच्या स्थायी समितीकडे यावेच लागते. मंत्री महोदय, मला हे कळले नाही की, आपण सर्व लोकप्रतिनिधी आहोत. लोकप्रतिनिधींचा अवमान करणारे विधेयक या ठिकाणी आणण्याचे तुम्ही मान्य कसे केले? ही काही सहकार विभागाने मान्यता दिलेली को-ऑपरेटिव्ह सोसायटी नाही. जनतेने निवडून दिलेले नगरसेवक आहेत, असे असताना गणपूर्ती अभावी बैठक रद्द झाली तर ती परत घेता येते, असे या विधेयकात म्हटलेले आहे. पण नगरसेवक हे लोकप्रतिनिधी आहेत. गणपूर्तीचा नियम सर्वसाधारण गृहनिर्माण सोसायटयांना लागू होतो. नगरसेवक हे लोकांमधून निवडून आलेले असताना त्यांच्यासाठी गणपूर्तीचा नियम आणलाच कसा?

सभापती महोदय, थोडयावेळा पूर्वीच या संदर्भात मांडण्यात आल्यामुळे मला हे सहजपणे आठवले आहे. मुळामध्ये नगरसेवक हे लोकांमधून निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहेत. सभापती महोदय, या सभागृहात सात पेक्षा कमी सदस्य उपस्थितीत असतील तर आम्ही या सभागृहाचे कामकाज चालवू देणार नाही. गणपूर्ती हा महत्वाचा विषय आहे. हा गंमतीचा विषय नाही. तुमच्या आणि माझ्या सर्व पक्षाचे नगरसेवक नगरपालिकेत निवडून येतात. त्यामुळे हे गंभीर आहे. निवडून आलेल्या नगरसेवकांना सभागृहाच्या बाहेर काढणार आणि चार-पाच नगरसेवकांना घेऊन ठराव करणार, हा गमतीचा भाग नाही. हे निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहेत. ही हाऊसिंग सोसायटीची सभा नाही की, गणपूर्ती अभावी सभा तहकूब केली आणि अर्ध्या-तासाने परत घेतली आणि निर्णय घेतले. श्री. के. टी. गिरमे यांच्या परिचय आणि कामकाज या पुस्तकात गणसंख्या 'कोरम' म्हणजे काय या संदर्भात जे लिहिलेले आहे ते मी वाचून दाखवितो. हे फार गंभीर आहे

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री.दिवाकर रावते...

म्हणून मी ते या ठिकाणी मांडतो. हे शासनाला स्वीकारावे लागेल अन्यथा हे विधेयक मागे घ्यावे,त्यामध्ये ही सुधारणा करावी आणि परत आठ दिवसांनी या सभागृहात आणावे. पण गणपूर्तीचा नियम या विधेयकात असता कामा नये, कारण नगरपालिकेमध्ये सर्व पक्षाचे निवडून आलेले नगरसेवक असतात. समजा त्यांनी मान्य केले नाही तर 60 दिवसांनी डिम्ड टू बी पास. जिल्हाधिकारी ते मंजूर करु शकतात. मग याबाबतीत चिंता कसली आहे? अशा प्रकारे निवडून आलेल्या नगरसेवकांना त्यांचे मत माडण्याची परवानगी दिली पाहिजे. गृहनिर्माण सोसायटयांच्या संदर्भात गणपूर्तीचा नियम लागू करण्यात यावा.

सभापती महोदय, गणसंख्या (कोरम) च्या बाबतीत असे म्हटले आहे की, "विधानसभेची बैठक बोलावल्यानंतर ती सुरु करण्यासाठी सभासद विशिष्ट संख्येत उपस्थित असावयास पाहिजेत." 1649 साली ब्रिटिश पार्लमेंटने चाळीस सभासदांची उपस्थिती काम सुरु करण्यास किंवा चालू ठेवण्यास आवश्यक मानली तेव्हापासून आजतागायत हा संकेत पाळण्यात येत आहे. सभागृहात गणसंख्या असल्याशिवाय स्पीकर स्थानापन्न होत नाहीत पण आपल्याकडे माननीय सभापती सभागृहात आल्यानंतर सभापती महोदय, "सभागृहात गणपूर्ती नाही." असे आम्ही त्यांच्या निदर्शनास आणून देतो. मग माननीय सभापती, गणपूर्ती आहे का असे विचारतात, हे सर्व उलटे चालले आहे. ही आपली लोकशाही आहे!

माननीय सभापतींनी सभागृहाच्या नेत्यांना विचारले पाहिजे की, गणपूर्ती आहे का, मी येऊ का, असा प्रघात आहे. पण आमचे माननीय सभापती सभागृहात येऊन बसतात तेव्हा आम्ही सभागृहात उभे राहून असे सांगतो की, सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री नाहीत, राज्य मंत्री नाहीत. पण कॅबिनेट मंत्री ही संज्ञाच नाही. मंत्री आणि राज्य मंत्री हीच संज्ञा आहे. कॅबिनेट हा प्रश्न नाही. पण ते इतके अंगवळणी पडलेले आहे की,मंत्री म्हटले की, त्यांनाही चैन पडत नाही,आपल्याला कॅबिनेट मंत्री म्हटले पाहिजे असे मंत्र्यांनाही वाटते. मी कॅबिनेटच्या बैठकीला जातो असे मंत्री सांगतात. मी मंत्रिमंडळाच्या बैठकीला जातो, असे सांगत नाहीत. आपल्या सर्वांना याची सवय झालेली आहे. याबद्दल दहा वेळा बोलून झालेले आहे. आता मलाच बोलावयाची लाज वाटते.

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आपण शुद्ध मराठीत मंत्रिमंडळाच्या बैठकीस जातो असे बोलावयास पाहिजे. मराठीत तो रुढ झालेला शब्द आहे आणि सगळ्यांना कळतो. पण मी कॅबिनेटला चाललो असेच म्हणतात. कसले कॅबिनेटला चाललो ? "Cabinet means a cupboard", असा त्याचा इंग्रजीमध्ये अर्थ आहे. त्याला कॅबिनेट का म्हणतात याचीही व्याख्या मी सांगेन.

यामध्ये गणपूर्तीच्या बाबतीत असे म्हटले आहे की, "सभागृहात गणसंख्या असल्याशिवाय स्पीकर स्थानापन्न होत नाही. आपल्या देशातील प्रत्येक राज्याच्या विधिमंडळाला गणसंख्या ठरविण्यासाठी विधिनियम करण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. तसा अधिनियम केला नाही तर गणसंख्या दहा किंवा गृहातील एकूण सभासदांच्या एकदशांश यांपैकी जी कोणती अधिक असेल ती राहील." या एकदशांशच्या संदर्भात सुध्दा मी आपल्याला सांगतो. हा विषय नगरपालिकांचा आहे. त्या ठिकाणी आपण स्वीकृत सदस्य घेतो. अपक्ष सुध्दा भरपूर निवडून येतात. त्यांची संख्या जास्त असते. समजा एखाद्या ठिकाणी 14 सदस्य पाहिजे असतील आणि जरी अपक्ष असले तरी पहिला मान हा मान्यताप्राप्त पक्षाचा असतो आणि त्या पक्षाचे किमान एकदशांश सदस्य असले पाहिजे असे आहे. आधी त्यांना स्थान आहे आणि नंतर अपक्षांना स्थान आहे. एवढे या दहा टक्क्याचे महत्व आहे. आपल्याकडे आता ते पाळले जाते.

यामध्ये गणपूर्तीच्या संदर्भात पुढे असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र विधानसभेत किमान सत्तावीस सभासदांची उपस्थिती आवश्यक आहे. सभागृहात गणसंख्या आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी सभापतींची जशी आहे तशी सभागृहाची सुध्दा आहे. कामकाज चालू असताना आवश्यक ती गणसंख्या नसल्याचे सभापतीस आढळून आल्यास किंवा त्यांच्या निदर्शनास ही बाब एखाद्या सदस्याने औचित्य प्रश्नाव्दारे आणून दिल्यास सभापती कामकाज थांबवितात व घंटी वाजविण्याची सूचना देतात. त्या सूचनेनंतर सात मिनिटात आवश्यक तेवढे सभासद सभागृहात आले तर कामकाज पुढे सुरु करण्यात येते अन्यथा सभागृहाची बैठक त्या दिवशी काही काळपर्यंत तहकूब केली जाते. सभागृहात किमान सभासद उपस्थित ठेवण्याची जबाबदारी सरकारी पक्षाची असून त्या पक्षाचे प्रतोद ती पार पाडीत असतात." या बिलामध्ये आपण जी तरतूद केली आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यामुळे 150 कोटीचे प्रकल्प, 200 कोटीचे प्रकल्प असतील तर गणपूर्ती नाही म्हणून बैठक तहकूब करावयाची आणि काही वेळाने दुसरी बैठक जाहीर करावयाची, 61 सदस्य असतील आणि त्यापैकी 5 सदस्य उपस्थित असले तरी ठराव मंजूर करावयाचा असे होईल. लोकशाहीला काळिमा फासणारी, लोकशाहीचा अपमान करणारी तरतूद यामध्ये कशी काय केली ? प्रकल्प साठ दिवसात मंजूर झाला नाही तर तो मंजूर करण्याचे अधिकार आपल्याला मिळालेले आहेत. नगरसेवकांना त्यांचे पूर्ण अधिकार मिळाले पाहिजेत. त्यांच्या निर्णय घेण्याच्या योग्यतेचा त्या ठिकाणी कस लागला पाहिजे. त्याचे जे काही इंगित असेल ते सगळे बाहेर येईल. आपल्या वर्तमानपत्रांचा चौथा स्तंभ तिकडे सर्व सांगण्यासाठी बसलेला आहे. त्यामुळे मला असे वाटते की, आपण यामध्ये जो अत्यंत घातक मुद्दा घातलेला आहे तो काढावा.

सभापती महोदय, आता या विधेयकामध्ये "रुपये 7,500, रुपये 5,000, रुपये 2,500 याहून" या मजुकराऐवजी, "विहित करण्यात येतील अशा रकमेहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल" असे म्हटले आहे. यामध्ये पूर्वी 7 हजार, 5 हजार, अडीच हजार रुपये असे होते. तुम्ही जर उद्या 50 लाख रुपये ठरविले किवा आता आपण आमच्या महानगरपालिकेच्या आयुक्तांचे खर्चाचे अधिकार वाढविले तरी त्या छोट्या छोट्या नगरपालिकांमध्ये साडेसात हजार रुपयांवरुन जर एक लाख मर्यादा केली तर छोट्या नगरपालिकांच्या स्थायी समितीपुढे एकही काम येणार नाही. आयुक्तच सगळे करतील. ही संदिग्धता मला यामध्ये वाटते. म्हणून "विहित करण्यात येतील अशा रकमेहून" असे जे म्हटले आहे त्या ऐवजी पूर्वी जसे 7 हजार, 5 हजार, अडीच हजार रुपये नमूद केले आहे तसे स्पष्ट शब्दामध्ये आले पाहिजे. तुम्हाला जी रक्कम म्हणावयाची असेल ती म्हणा पण निश्चित स्वरुपामध्ये अमुक रकमेच्या पलीकडील जो खर्च असेल तो स्थायी समिती आणि नगरपालिकेच्या निवडून आलेल्या सभासदांच्या मंजुरीकरिता देण्याचे बंधन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर असले पाहिजे.

सभापती महोदय, मी मुद्दाम उपसूचना दिलेल्या नाहीत. या ठिकाणी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचे तीन प्रस्ताव होते त्यापैकी दोन प्रस्ताव मांडले गेले आहेत. एवढी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

संदिग्धता आणि त्रुट्या असलेले हे विधेयक आहे. या बिलामध्ये ज्या अयोग्य पध्दतीच्या तरतुदी आहेत त्यांना कोणीही आव्हान देऊ शकेल.

निवडून आलेला लोकप्रतिनिधी हा वेगळा विषय आहे. मला जे वाटते ते मी मांडलेले आहे. सरकारला ते किती योग्य वाटेल हे मला माहीत नाही. माननीय मंत्री महोदय कसे तरी उत्तर देऊन हे विधेयक निभावून नेतील

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

परंतु भविष्यामध्ये दोन्ही पिढयांचे भयानक नुकसान करणारे, आताच्या पिढीने निर्माण केलेले कर्ज, गुंतवणुकीसाठी असलेले वेगवेगळे निकष, त्यातून निर्माण होणारी परिस्थिती, नियमातील वेगवेगळ्या तरतुदी, नगरपालिकांनी प्रकल्पांसाठी उभा केलेला निधी पगार वाटपासाठीच वापरला जाईल अशी निर्माण झालेली शक्यता, या सर्व गोष्टी सीमित करावयाच्या असतील तर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी म्हटल्या प्रमाणे मर्यादित कालावधीत का होईना ते संयुक्त समितीकडे पाठवावे. त्या समितीच्या माध्यमातून योग्य त्या दुरुस्त्या करुन सुधारित विधेयक आणले तर लोकशाहीचा सन्मान केल्यासारखे होईल. नगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांना मोठे प्रकल्प राबविण्याचा सन्मान प्राप्त होईल. त्यांची जनतेशी ती बांधिलकी असते असे नम्रपणे सांगून येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक 14 माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्करराव जाधव यांनी सभागृहासमोर मांडलेले आहे. या विधेयकाचे स्वागत करण्यासाठी व त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यातील शहरी लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ही लोकसंख्या 43 ते 44 टक्क्यांपर्यंत गेलेली आहे. पुढील 8-10 वर्षानंतर शहरी लोकसंख्या जास्त होईल आणि ग्रामीण लोकसंख्या कमी असेल अशा प्रकारची परिस्थिती महाराष्ट्रामध्ये निर्माण होणार आहे. विधेयकाची कार्यक्षमता आणखी वाढवावी, परिणामकारकता वाढवावी यासाठी हे विधेयक आणलेले आहे. आर्थिक शिस्त वाढविण्याच्या संदर्भात व्यापक असे हे विधेयक आहे. या अधिनियमाच्या कलम 49, 50, 51, 57, 61, 62, 63, 75, 75(अ), 81 व 90 यामध्ये सुधारणा सुचविण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जुने 72 हे कलम काढून नवीन 72 हे कलम दाखल केलेले आहे. तसेच 77 (अ), 83 (अ), 90 (अ) ही संपूर्ण नवीन कलमे आणलेली आहेत. त्यापुढील अनेक उपखंडांमध्ये सुधारणा सुचविलेल्या आहेत.

सभापती महोदय, मी नगराध्यक्ष होतो त्यावेळी नगरपालिकेला लोकसंख्येच्या 14 टक्के अनुदान रस्त्यासाठी मिळत होते. त्यावेळी माझ्या शहराची लोकसंख्या 30 हजार इतकी होती. म्हणजे 30 हजाराच्या 14 टक्के अनुदान मिळत होते. त्याशिवाय पगारासाठी 80 टक्के अनुदान मिळत होते. त्याच्या व्यतिरिक्त कोणतेही अनुदान शासनाकडून नगरपरिषदेला मिळत नव्हते. आता तर मंत्री महोदय, आपण नगरपरिषदेला भरपूर पैसा देत आहात. त्यामुळे आपले अभिनंदन केले पाहिजे. नाविन्यपूर्ण योजनेसाठी निधी दिला जातो, भुयारी गटार योजनेसाठी निधी दिला जातो, रस्त्यांसाठी भरपूर निधी मिळत आहे. अनेक नगरपरिषदांना त्यांच्या मागणीप्रमाणे घरकुल योजनेसाठी निधी दिला जात आहे. त्यामुळे शहर चकाचक होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

NTK/

श्री.अरुण गुजराथी.....

सभापती महोदय, महानगरपालिकेलाही शासनाकडून निधी मिळतो. त्या प्रमाणात नगरपरिषदांना निधी मिळाला पाहिजे. जेएनएनयुआरएम या योजनेच्या माध्यमातून अनेक महानगरपालिका चकाचक होत आहेत. ग्रामीण भागाला निधी मिळत आहे. त्याच प्रमाणात नगरपरिषदांना निधी मिळत नाही. म्हणून नगरपरिषदांना अधिक निधी मिळावा अशी मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती करीत आहे.

सभापती महोदय, व्यवसाय कराचा काही हिस्सा वाढूवन तो नगरपरिषदांना द्यावा. सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्करराव जाधव हे डायनॅमिक मंत्री आहेत असे विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य देखील म्हणत असतात. मी तसे म्हटले तर ते वेगळे होईल अशातील भाग नाही.

यानंतर श्री.शिगम....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 05:30

श्री. अरुण गुजराथी..

हा निधी आणखी कसा वाढवून देता येईल याचा राज्य शासनाने विचार करावा. विधेयकाच्या पान क्रमांक 5वरील कलम 83-अ मध्ये, मुख्याधिका-याच्या प्रस्तावाला महासभेने 60 दिवसाच्या आत मंजुरी दिली पाहिजे, अशी तरतूद केलेली आहे. महासभेने प्रस्ताव 60 दिवसाच्या आत मंजूर केला नाही तर जिल्हाधिका-याला मंजुरीचे सर्व अधिकार दिलेले आहेत. गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत मुख्याधिका-यांनी दिलेले प्रस्ताव महासभेने मंजूर न केल्यामुळे विकासाची कामे खोळंबून राहिल्याची अशी किती उदाहरणे आहेत त्याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देण्याचा प्रयत्न करावा. जिल्हाधिका-यांना दिलेले अधिकार योग्य आहेत की अयोग्य आहेत त्यामध्ये मी जाणार नाही. महासभेने 60 दिवसाच्या आत प्रस्तावाला अनुमती दिली नाही तर तो पर्याय आहे.

कलम 90 के (एक)मध्ये "कायम स्वरुपाच्या कामाव्यतिरिक्त अन्य कोणतेही काम पार पाडण्यासाठी कोणतेही कर्ज उभारले जाणार नाही "कायम स्वरुपाचे काम" या संज्ञेत, ज्या कामाचा खर्च काही वर्षाच्या मुदतीत विभागाला जावा असे राज्य शासनाचे मत असेल अशा कोणत्याही कामाचा समावेश होईल."

हे कलम जाणीवपूर्वक समाविष्ट करण्यात आलेले आहे. महसुली खर्च करुन जास्तीत जास्त मत्ता, ॲसेट निर्माण करणे, कर्जाचा वापर हा only for creation of asset अशा पध्दतीचा असला पाहिजे. हे चांगल्या पध्दतीचे कलम आहे. परंतु पुढे पोट-कलम (तीन)मध्ये असे म्हटलेले आहे की "ज्या कालावधीत कर्जाची परतफेड करावयाची तो कालावधी कोणत्याही बाबतीत साठ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.." हा कालावधी फार मोठा आहे असे वाटते. हा एवढा कालावधी ठेवण्याचे कारण काय ? आता लिजवर जी शॉपिंग सेंटर्स दिली जातात ती 10-11 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी दिली जात नाहीत. नंतर त्याना तेथून बाहेर पडण्याची नोटीस दिली जाते. नगरपरिषदांमध्ये शॉपिंग सेंटर्स, दुकाने, दुकानदार यांच्या बाबतीत फार अप्रिय घटना घडतात. नगरपरिषद दुकाने, कार्यालये यांना 10-11 वर्षा पेक्षा अधिक लिजवर जागा देत नाही. मग हा 60 वर्षाचा कालावधी कशासाठी ? हा कालावधी योग्य वाटत नाही. यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. नगरपरिषदांमध्ये 100, 200, 500 अशी दुकाने निर्माण केलेली आहेत. ही दुकाने घेणा-या दुकानदारांना कुठे तरी संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्यांची 11 वर्षे झाल्यानंतर त्यांच्याकडून 10 टक्के अधिक भाडे घ्यावे 15 टक्के अधिक भाडे घ्यावे, पण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 05:30

श्री. अरुण गुजराथी..

दुकानदार त्या ठिकाणी रहातील, कार्यालये त्या ठिकाणी रहातील अशी तरतूद या विधेयकामध्ये नसली तरी पुढे तशा पध्दतीचे विधेयक आणले तर त्यामुळे नगरपरिषदेचे उत्पन्न वाढू शकेल आणि दुकानदारांना संरक्षण मिळेल.

सभापती महोदय, कलम 90-इ हे एक चांगले कलम फंड विनियोगाच्या संदर्भात आणलेले आहे. कलम 90-क मध्ये असे म्हटलेले आहे की " (1) कर्ज निवारण निधीत भरलेला सर्व पैसा, कलम 90-इ च्या पोट-कलम (1) अन्वये ज्या दिनांकास तो भरावयाचा होता त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सरकारी कर्जरोख्यात गुंतवला जाईल." येथे आपल्याला राष्ट्रीयकृत बँकेचा विकल्प देता येईल का ? कर्जरोख्यापेक्षा राष्ट्रीयकृत बँक जादा व्याज देत असेल तर उत्पन्न वाढू शकेल. काही वेळा कर्जरोख्यांचे व्याजदर कमी असतात कारण इन्कम टॅक्समध्ये सूट असते. तेव्हा कर्जरोख्यात किंवा राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणूक असा विकल्प देता येईल आणि त्याचा लाभ आपल्याला होऊ शकेल.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

सभापती महोदय, 90-ग हे कलम कर्ज निवारण निधीची वार्षिक तपासणी यासाठी अंतर्भूत केले आहे. 90-ग (1) मध्ये म्हटले आहे की, "या अधिनियमाद्वारे स्थापन केलेले किंवा ठेवलेले सर्व कर्ज निवारण निधी संचालक, स्थानिक निधी, लेखापरीक्षा यांच्या वार्षिक तपासणीच्या अधीन असतील." ही तपासणी किती वर्षात करण्यात येईल? तीन वर्षानंतर किंवा पाच वर्षानंतर लेखापरीक्षण होत असेल तर याला कालमर्यादा घालणे आवश्यक आहे. हे लेखापरीक्षण तुमच्याकडून होत नसेल तर वित्तीय लेखापरीक्षक किंवा सी.ए.यांच्या माध्यमातून किंवा निवृत्त अधिकाऱ्यांमार्फत करावे आणि या लेखापरीक्षणाला कालमर्यादा घालावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, 90-ग (5) मध्ये "कर्ज निवारण निधीच्या खाती जमा असलेली रोख रक्कम व कर्जरोख्यांचे मूल्य अशा निधीच्या खाती जी रक्कम जमा असावयास पाहिजे अशा रक्कमेपेक्षा अधिक असेल." असे म्हटले आहे. म्हणजे फेस व्हॅल्यू आणि मार्केट व्हॅल्यू अशा दोन वेगवेगळया बाबी आहेत का? याचे मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करावे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये 90-आय हे कलम आणले आहे. कर्जाची परतफेड न केल्यास नगरपरिषदेच्या निधीची जप्ती करण्यात येणार आहे. कोणत्याही कायद्यात पेनल्टी आणि पनिशमेंट या बाबी अंतर्भूत असतात. त्याशिवाय कोणताही कायदा बनू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. एक भाग डेफिनेशन आणि एक भाग पेनल्टी व पनिशमेंटचा असतो. 90 आय या कलमाला माझा विरोध नाही. अशा किती घटना घडल्या की, ज्यामुळे नगरपरिषदांनी कर्जाची परतफेड केली नाही? शासन त्यांच्या कर्जाला हमी देत असते. सरकारला कर्जाची परतफेड न केल्यामुळे पैसे भरावे लागले अशा किती घटना घडल्या आहेत? याची माहिती मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी.

सभापती महोदय, कलम 90-आय (1) मध्ये म्हटले आहे की, "नगरपरिषदेने कर्जाऊ घेतलेला कोणताही पैसा किंवा त्यासंबंधी देणे असलेले कोणतेही व्याज किंवा खर्च याची किंवा यांची कर्जाच्या शर्तीनुसार परतफेड करण्यात आली नाही तर राज्य शासन, कर्ज त्याने स्वत:च दिले असल्यास, नगरपालिका निधी किंवा नगरपालिका निधीचा काही भाग जप्त करु शकेल आणि अन्य प्रकरणात कर्ज देणाऱ्याने अर्ज केल्यावर, नगरपालिका निधी किंवा नगरपालिका निधीचा भाग जप्त करील." काही घटना अशा घडलेल्या आहेत, ज्यामुळे खुर्ची जप्त केली जाते. विजेचे बिल भरले नाही म्हणून सार्वजनिक बांधकाम किंवा जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची खुर्ची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.शिगम 05:35

श्री.अरुण गुजराथी......

जप्त केली जाते. शासनाच्या दृष्टीकोनातून अशी घटना घडणे योग्य नाही. हा भाग वेगळा आहे. नगरपरिषदेमध्ये नगराध्यक्षांची खुर्ची जप्त करुन आणण्याची घटना अवमानकारक आहे. यामध्ये काय सुधारणा करता येईल हे पाहिले पाहिजे. नोटीस द्यायची किंवा देण्यात येणाऱ्या अनुदानातून ती रक्कम कपात करायची हा पर्याय असू शकतो. हा विषय महत्वाचा आहे. जप्तीपेक्षा शासनाकडे खूप मोठे शस्त्र आहे. शेवटचा मार्ग म्हणून तुम्ही ही तरतूद केल्याचे म्हटले आहे.

सभापती महोदय, मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. आता नगरपरिषद आणि नगरपालिकेची दोन अंदाजपत्रके असणार आहेत. माझी विनंती आहे की, तिसरे अंदाजपत्रक कमर्शियल प्रकल्पांसाठी तयार केले जावे. त्याचे व्हॅल्यूएशन करावे. घसारा वजा करुन नेट व्हॅल्यू काढावी. हे विधेयक पाणीपुरवठा व मलप्रवाह सुविधांच्या संदर्भात आहे. पाणीपुरवठा व मलप्रवाह विल्हेवाट प्रकल्प निधी या संदर्भात विधेयक आणताना मुख्याधिकाऱ्यांचे वित्तीय अधिकार वाढविण्यात येणार आहेत. अजूनही काही प्रमाणात वित्तीय अधिकार वाढविले पाहिजेत. आज महागाई वाढलेली आहे. स्थायी समितीला अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये अ, ब व क वर्ग नगरपालिकेला फार मोठे अधिकार दिले आहेत असे वाटत नाही. 2.5 लाख, 1.5 लाख पर्यंत अधिकार आहेत.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .......

"अ" वर्ग नगरपालिकेला 5 लाख आणि विषय समितीला 1 लाख, "ब" वर्ग नगरपालिकेला 2.50 लाख तर विषय समितीला 50 हजार, "क" वर्ग नगरपालिकेला 1 लाख आणि विषय समितीला 25 हजार ही मर्यादा ठेवलेली आहे. पण 25 हजाराची मर्यादा विषय समितीला हे तितकेसे संयुक्तिक वाटत नसल्याने त्यात वाढ करण्याची गरज आहे हे मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो, असे म्हटले आहे. शिक्षण समितीच्या संदर्भात आपण "शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य" यामध्ये शिक्षणाच्या बाबतीत ठीक आहे पण क्रीडा आणि सांस्कृतिक कार्य या विषयाच्या संदर्भात कोठेतरी बंधन असले पाहिजे की अमुक इतका निधी अर्थसंकल्पातून दिला पाहिजे अशी आमची मागणी आहे. अडीच वर्षाचा कार्यकाल संपल्यापूर्वी 8 दिवस अगोदर नगराध्यक्षाची निवड झाली पाहिजे ही तरतूद अत्यंत चांगली आहे. पण गणपूर्तीच्या संदर्भात काही तरतुदी केल्या पण त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विस्ताराने सांगितल्याने मी त्यावर बोलणार नाही. 60 दिवसाच्या संदर्भात तर मी माझे मत मांडलेलेच आहे. परंतु मालमत्तेवरील एकत्रित करामध्ये पाणीपुरवठा, लाभ कर, सुविधा कर, पथ कर असे कर समाविष्ट केलेले आहेत त्याबाबत मला असे विचारावयाचे आहे की, हे तीनच कर का समाविष्ट केले, इतर करांचा समावेश त्यात का केला नाही याचा उल्लेख भाषणातून मंत्री महोदयांनी करावा.

महोदय, बीओटी तत्वावर अनेक नगरपरिषदा काम करतात. अर्थात त्यासाठी शासनाची परवानगी लागतेच. पण उदाहरण म्हणून सांगू इच्छितो की, चाळीसगांव नगरपरिषदेत सन्माननीय सदस्य श्री. राजू दादा देशमुख यांनी अत्यंत चांगले काम केलेले आहे. ही नगरपालिका कोणाच्याही नावावर नाही किंवा कोणताही पक्ष त्यात आहे अशातला भाग नाही. त्यांनी या नगर पालिकेत उत्तम काम बीओटी मधून करुन घेतले आहे. त्यांनी कार्यालय, हॉस्पिटल, शॉपिंग सेंटर सुध्दा बीओटी मधून बांधून घेतले. अशा प्रकारे नगरपालिकांचे बीओटीच्या माध्यमातून काम करावयाचे असेल तर तशी परवानगी मिळावी म्हणून शासनाकडे 5-6 वर्षे प्रस्ताव पडून आहेत. त्यासाठी त्या नगरपालिकांना कर्जही द्यावयाचे नाही किंवा गॅरंटी सुध्दा द्यायची नाही. त्या नगरपालिकेची जमीन आणि त्यावर बीओटीमधून बांधकाम केले तर पुढील सात-आठ वर्षातच इमारतीची मालकी नगरपालिकेची होणार, त्यात खर्चाचा भागच नाही. या गोष्टींचा विचार करुन "अ ते क" वर्गीय नगरपालिकांबाबतचे धोरण शासनाने तयार करावे अशी मी सूचना करतो.

.........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .......

महोदय, नगरपालिकांमधील अकाऊंट कोडमध्ये बदल झाले काय याबाबत माननीय राज्य मंत्र्यांसोबत मी चर्चा केली. त्याचे कारण म्हणजे हे अकाऊंट कोड फारच जुने आहे. अगोदर नगरपालिका आणि महापालिका यांच्याकडे सिंगल एंट्री आणि बुक किपींग होते. पण आता डबल एंट्री आणि बुक किपींगची सुविधा केल्यामुळे या अकाऊंट कोडमध्ये राज्य शासनाचा जर एक रुपया आला तर तो खर्च कसा झाला, त्यात कराचा भाग किती, अनुदान किती, कर्जाचे प्रमाण किती, डिपॉझिट किती आणि व्याजात किती गेला, कर्जाच्या परतफेडीत किती गेला आणि मालमत्ता किती उभी राहिली हे त्या नगरपालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या नागरिकाला समजले पाहिजे. मी या निमित्ताने विनंती करणार आहे की, जे अनुदान आपण नगरपालिकांना देणार आहोत त्यात किमान 5 टक्के रक्कम क्रिएशन ऑफ ॲसेट्स, मालमत्तेची निर्मिती यासाठी दिली तर त्याचा लाभ मिळणार आहे. नगरपरिषदांचे राजकारण हे अत्यंत टोकाला जातांना आपण पाहतो. एकाच पक्षाचे दोन गट असतात किंवा वेगवेगळे गट सुध्दा असतात, फार राजकीय पक्ष असतात अशातला भाग नाही......

श्री. विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी आपल्या भाषणात नगरपालिकेतील वेगवेगळ्या पक्षांचा उल्लेख केला. या निमित्ताने मला सुचले म्हणून सांगतो की हल्ली विधानसभा आणि लोकसभा असा विचार केला तर विधानसभा म्हणजे "वन-डे क्रिकेट मॅच" आणि "नगरपालिका आणि जिल्हा परिषदा या आयपीएलच्या मॅचेस" असा प्रकार होतो असा प्रकार वाटतो.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

याचा अर्थ ती इंडियन पॉलिटीकल लिग झालेली आहे. तिकडची क्रिकेटची आयपीएल शरद पवार साहेबांची आणि येथली क्रिकेटची आयपीएल अजित पवार साहेबांची असे दे दणादण सुरु झाले आहे. त्यामुळे आपण जे काही बोलत आहात ते अतिशय योग्य बोलत आहात. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी सुरुवात करुन दिल्यामुळेच मी हे बोललो आहे.

श्री. अरुण गुजराथी : सन्माननीय सभापती महोदय, नगरपालिकेत विरोधी गटाची अजिबात कामे होत नसतील तर नगरसेवक निधी म्हणून 5 लाख, 2 लाख रुपये दिला तर किमान तितका पैसा नगरसेवकाला कामासाठी तरी मिळू शकेल. आता आपण नगरपालिकांमध्ये प्रभाग रचना केल्यामुळे एका भागात 4 नगरसेवक केलेले आहेत. जर 4 नगरसेवक विरोधी गटाचे असले तर संपूर्ण भागातील म्हणजे 10-15 हजार लोकसंख्येच्या भागात काहीही काम होणार नाही. त्यामुळे काही प्रमाणात नगरसेवक निधी दिला तर थोडी फार तरी कामे प्रभागामध्ये होऊ शकतील असे मला वाटते. त्यामुळे यासंदर्भातील विचार माननीय मंत्री महोदयांनी करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, कायदा तयार करीत असतांना त्यामध्ये आणखी पारदर्शकता कशी वाढेल याचा विचार केला पाहिजे. लहान वृत्तपत्र, न खपणाऱ्या वृत्तपत्रांचा एक अंकही खपलेला नसतो परंतु नगरपरिषदेच्या फाईलला त्याच्या पाच प्रती लावल्या जातात. त्यामुळे इ टेंडरींगच्या संदर्भात आपल्याला कंपल्शन करावे लागणार आहे. हजार रुपये किमतीच्या कामाच्या संदर्भात मी सांगत नाही परंतु लाखाच्यावर टेंडरची किंमत असेल तर ते टेंडर इ टेंडरींगच्या माध्यमातून निघाले पाहिजे. काही वेळेस तर टेंडर सुध्दा भरु दिले जात नाही. त्यामुळे इ टेंडरींग करण्याच्या संदर्भातील विचार व्हावा अशी माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, बजेटच्या आणि राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या संदर्भात या ठिकाणी चांगल्या प्रकारची चर्चा झालेली आहे. ग्रामीण गरिबीपेक्षा आता नागरी गरिबी जास्त आहे. ग्रामीण गरिबी 22 टक्के असून नागरी गरिबी 33 टक्के आहे. नवीन ज्या वस्त्या तयार होत आहेत त्याठिकाणी पायाभूत सोयी सुविधा अजिबात तयार होत नाहीत. शासन भुयारी गटारीला अनुदान देणार आहे. परंतु आज काही शहरामध्ये तर गटारीच नाहीत अशी परिस्थिती आहे.

..2..

श्री. अरुण गुजराथी...

शहरामध्ये बिल्डिंग चांगल्या बांधलेल्या आहेत, फ्लॅट चांगले बांधलेले आहेत, बंगले चांगले बांधले आहेत परंतु गटारीच नाहीत. भुयारी गटारीला पैसे देण्याचा शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो अतिशय चांगला निर्णय आहे. ज्या ठिकाणी नवीन वसाहती होत आहेत त्या ठिकाणी गटारीच नाहीत, पिण्याच्या पाण्याची सोय नाही यासंदर्भातील धोरण आपल्याला स्वीकारावे लागणार आहे. नव्या वसाहतींठी जादा निधी कसा देता येईल यासाठी आपण प्रयत्न करावा अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

सन्माननीय सभापती महोदय, नगरपालिकांमधील सभेच्या अजेंडयावर 5 विषय असतात परंतु ऐनवेळी 25 विषय येत असतात त्यामुळे यासाठी आपण काही बंधने आणणार आहोत की, नाही ? 5 किंवा 4 विषयापेक्षा जास्त विषय ऐनवेळी घ्यावयाचे नाही यावर आपण काही बंधने आणणार आहोत की, नाही ? अजेंडा काय आहे, कोणते विषय आहेत ते माहिती नसते. परंतु विषय क्रमांक 15 ते 25 मंजूर... अशा पध्दतीने नगरपरिषदेचा कारभार होत असेल तर ते लोकशाहीच्या दृष्टिकोनातून हितकारक नाही तसेच नगरपरिषदेमध्ये विरोधी पक्षाचा जो गट काम करीत असेल त्याच्या दृष्टिकोनातून सुध्दा ते ठीक होणार नाही. पाच पेक्षा जास्त विषय आयत्यावेळेस येणार नाहीत यासंदर्भातील सुधारणा करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, नाविन्यपूर्ण योजनेसाठी आपण जे अनुदान देतो त्यामध्ये सोलर लॅम्पचा समावेश करावा अशी विनंती आहे. आता विजेचे दर फार वाढलेले आहेत तसेच लोडशेडींगचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे त्यामुळे नावीन्यपूर्ण योजनेमध्ये सोलर लॅम्पचा समावेश करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, पाण्याच्या संदर्भात मला एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरूण गुजराथी...

आयएसआय मार्कचे बाटलीबंद पाणी मिळते. तशा प्रकारचे पाणी शहराला देण्याकरिता शिरपूर नगरपालिकेने प्रयत्न केला आहे. त्यामुळे आपण फिल्टर प्लांटला विशेष अनुदान दिले पाहिजे. पाण्याच्या व हवेच्या माध्यमातून रोगराई पसरते. क्वालिटी ऑफ लाईफ सुधारावयाचे असेल तर क्वालिटी ऑफ एअर, क्वालिटी ऑफ वॉटर याकडे लक्ष दिले पाहिजे. यातील क्वालिटी ऑफ एअर आपल्या हातामध्ये नाही. यासाठी दर वर्षाला एक ठराविक निधी उपलब्ध करून द्यावा. असे जर केले तर महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होईल की, जेथे आयएसआय दर्जाचे पाणी नगर परिषदेच्या माध्यमातून जनतेला मिळते.

सन 1974-75 मध्ये डोक्यावरून मैला वाहून नेण्यास बंदी घालण्यात आली. महाराष्ट्र हे पहिले राज्य होते की, त्याने डोक्यावरून मैला वाहून नेण्यास बंदी घातली. रस्त्यावर प्रातर्विधी होणार नाही यासाठी आपण 5 ते 10 वर्षाच कार्यक्रम आखावा. हे आता लगेच शक्य होईल असे म्हणत नाही. मुंबई सारख्या शहरात देखील शक्य आहे असे मी म्हणत नाही. यासाठी आपण किमान "क" वर्ग, "ब"वर्ग नगर परिषदेची निवड करावी. येत्या 5 वर्षात 10 वर्षात रस्त्यावर प्रातर्विधी होणार नाही यासाठी निदान धोरण ठरवावे.

सॅलरी रिझर्व्ह फंड संबंधी राज्य शासनाने आपली भूमिका थोडीशी बदलली पाहिजे. पगारा एवढा तीन महिन्याचा सॅलरी रिझर्व्ह फंड राहील याची काळजी आपण घ्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कमर्शियल बेसीस प्रमाणे रिसिटस आणि पेमेंट अकौंट करता येईल काय हे पहावे. ताळेबंद तयार करता येईल काय, हे पहावे. अनेक नगर परिषदांच्या हद्दीत भरपूर इमारती झाल्या आहेत. त्यांच्याकडे भरपूर जमिनी आहेत. त्याचे व्हॅल्युएशन केले तर त्यांची मालमत्ता अनेक कोटीमध्ये जाईल. त्यांच्या मालमत्तेचे व्हॅल्युएशन केले तर कर्ज घेणे सोपे जाईल. पाच ते सात वर्षात त्याची परतफेड होत असेल तर त्याचे रि-व्हॅल्युएशन करणे आवश्यक आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, आपण कमर्शियल प्रोजेक्टचे रि-व्हॅल्युएशन करावे. कमर्शियल प्रोजेक्टचे रिसिट पेमेंट काढावे. शक्य असेल तेथे ताळेबंद तयार करावा. या संबंधी चांगला निर्णय झाला तर अन्य कुठल्याही राज्यातील नगर परिषदां पेक्षा आपल्या नगर परिषदांचा विकास चांगल्या पद्धतीने होईल असे मला वाटते.

..2

श्री.अरूण गुजराथी....

आपण मला बोलण्याची संधी दिल्या बद्दल मी आपले आभार मानतो. सन्माननीय सदस्य श्री.जमा यांनी जाताना मला एक क्लिपिंग देऊन गेले आहेत की, आजही जिणे खडतर झाले आहे. निम्म्या लोकांकडे आजही टॉयलेट नाही, 40 टक्के कुटुंबाकडे बाथरूमची व्यवस्था नाही. मी मघाशीच टॉयलेट संबंधीचा मुद्दा मांडला होता. ते कशा पद्धतीने करता येईल हे सांगितले आहे. टॉयलेटची व्यवस्था आपण केली तर महाराष्ट्र हे हिंदुस्थानातील पहिले राज्य राहील की, जेथे रस्त्यावर प्रातर्विधी होणार नाही. त्या पद्धतीचे धोरण देखील आपण तयार करावे. शासनाने अत्यंत चांगल्या पद्धतीचे विधेयक आणले आहे. त्यामुळे मी माननीय नगरविकास राज्य मंत्री, माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आणि सरकारचे अभिनंदन करतो. धन्यवाद.

.......

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत.**

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. महत्वाची गंभीर बाब मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून सभागृहा समोर ठेवत आहे. महाराष्ट्राचे लेखापाल यांच्या माध्यमातून कॅगचा अहवाल आपल्याला दरवर्षी मिळतो. शासनाकडून सदर अहवाल अजून आलेला नाही. मी जी माहिती आता देत आहे ती शासनाने तपासून घ्यावी. हा अहवाल फुटला आहे काय, बाहेर आला आहे काय याची माहिती शासनाने घ्यावी. मी येथे मुद्दाम काही मुद्दे वाचून दाखवितो.

माझ्याकडे कॅगच्या पूर्ण अहवालाची सी डी देखील आहे. ती मी माननीय मुख्यमंत्र्यांना देणार आहे. त्यामध्ये कदाचित कमी मुद्दे असतील. पण त्या अहवालातील जे मुद्दे आले आहेत. मी येथे मुद्दे वाचून दाखवितो. ही अतिशय गंभीर बाब आहे.

**<u>मुंबई एज्युकेशन ट्रस्ट (श्री.छगन भुजबळ)</u>**

1. सन 2003 मध्ये 41300 मीटर जागा नाशिक येथे सवलतीच्या दरात रूपये 1 लाख 55 हजार दराने दिली.
2. पुन:श्च श्री.समीर भुजबळ यांनी नाशिक येथील 91300 चौरस मीटर सार्वजनिक बांधकाम विभागाची गौण खनिजासाठी राखून ठेवलेली जागा मागितली.
3. नियमानुसार जागा देता येत नसताना त्यातील 50,000 चौ.मी.जागा जानेवारी 2009 रोजी इंजिनिअरिंग कॉलेजला दिली.
4. अर्थ सचिवांनी हरकत घेतली असताना देखील जागा देण्याचा निर्णय झाला. 9.39 कोटीची जागा 9.08 लाखाला दिली.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

5) श्री. छगन भुजबळ बांधकाम मंत्री असतांना त्यांच्याशी संबंधित ट्रस्टला जागा देणे योग्य नाही. हे कॉन्फ्लिक्ट ऑफ इंटरेस्ट आहे असे त्यांनी यामध्ये म्हटले आहे.

**<u>सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळ, (श्री. नारायण राणे)</u>**

1) समाज भवनासाठी 1 हजार 719 चौरस मीटर जागा 10 हजार 712 रुपये वार्षिक भाड्याने

2) जागेची किंमत 6.68 कोटी "ग्रांड इम्पेरीयल बॅके" 2 लाख रुपये रोजचे भाडे रेस्टॉरंट आणि बारची व्यवस्था.

**<u>वसंतदादा पाटील प्रतिष्ठान</u>**

1) बेकायदेशीर बांधकाम 17.30 कोटी थकले

**<u>भारती विद्यापीठ (श्री. पतंगराव कदम)</u>**

1) लोहगाव पुणे येथे 19 हजार 200 चौरस मीटर जागा बाजारभाव 4.80 कोटी सवलतीच्या दरात मिळाली वापर केला नाही त्यामुळे नियमानुसार परत घेण्याचा रिपोर्ट सादर होऊन कार्यवाही नाही.

**<u>रिलायन्स कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल</u>**

1) जागेची मालकी बदलली 174.88 कोटी भरणे आवश्यक होते.

2) बेड चार्जेस 15 हजार ते 20 हजार आहेत

3) धर्मादाय कायद्याप्रमाणे 40 टक्के रिझर्व्ह बेड्स नाहीत.

**<u>मांजरा एज्युकेशन सोसायटी (बोरीवलीची जागा), श्री.विलासराव देशमुख</u>**

1) 4 अर्जदार असतांना मुख्यमंत्र्यांनी 28 सप्टेंबर 2005 ला मांजरा एज्युकेशन सोसायटीलाच दिली.

2) 6 वर्षात त्यांनी बांधकाम सुरु केले नाही, आता ते बदलवून मागत आहेत.

3) 30 कोटींची जागा 6 कोटींमध्ये दिली आणि ॲग्रीमेंटमध्ये 2 वर्षात वापर झाला नाही तर जागा शासन जमा होईल हा अत्यावश्यक (मेंडेटरी क्लॉज) जाणून बुजून वगळला.

**<u>विखे पाटील फाऊंडेशन, श्री. राधाकृष्ण विखे पाटील.</u>**

1) पुणे येथे 5 हजार 396 चौरस मीटर जागा डिग्री कॉलेजकरिता ॲलॉट केली.

2) सवलतीच्या दरात त्याची किंमत 91 लाख होत असताना 17 लाखात जागा दिली 73 लाखाचे नुकसान.

श्री. रामदास कदम....

**मराठवाडा मित्र मंडळ**

1). पुणे येथील जागा प्राथमिक शाळा आणि हॉस्टेलकरिता सन 2002 मध्ये दिली.

2) 29 हजार 550 चौरस मीटर जागा हवेली येथे 4 हजार 802 रुपयांना दिली.

3) इंजिनिअरींग आणि एम.बी.ए. कॉलेज उघडले. कोटयवधी अनर्जित रक्कम बुडविली. सभापती महोदय, नागपूर.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

श्री. रामदास कदम : आपण मला बोलू द्या...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

श्री. रामदास कदम : तुमचा हरकतीचा मुद्दा कसा असू शकतो? मी जी इन्फर्मेशन देत आहे ती फक्त सरकारने तपासून घ्यावी या करिता माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आपण ऐकून घ्यावा. तो मान्य करावयाचा की नाही याचा आपण नंतर निर्णय द्यावा.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : मंत्री महोदय, आपण आपला हरकतीचा मुद्दा मांडावा.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदासभाई कदम यांनी सांगितले की, अद्याप पर्यन्त कॅगचा अहवाल या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला नाही किंवा तो वितरित करण्यात आलेला नाही. ते म्हणतात की, मला अशी माहिती समजली. आता ते या ठिकाणी माहितीच्या आधारे संबंधित मंत्री सरळ सरळ दोषी असल्याची माहिती देत आहेत. जो अहवाल या सभागृहाच्या पटलावर ठेवलेला नाही किंवा जो अहवाल सभागृहातील माननीय सदस्यांच्या हातामध्ये आलेला नाही त्याबाबत माननीय सदस्य श्री. रामदासभाई कदम यांनी या ठिकाणी दिलेली माहिती ऑथेंटीक कशी समजायची? म्हणून माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, जो अहवाल आपल्या हातामध्ये अजूनपर्यन्त आलेला नाही त्या अहवालाचा उल्लेख करुन माननीय सदस्य या ठिकाणी जी माहिती देत आहेत ती या सभागृहाच्या कार्यवाहीमधून काढून टाकावी .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी या ठिकाणी आपल्याला सांगितले आहे की, ही अतिशय गंभीर अशी बाब आहे. अशापध्दतीने सरकारचा गोपनीय अहवाल बाहेर येत असेल तर त्याच्या चौकशीची मागणी मी करीत आहे. ही अतिशय गंभीर स्वरुपाची बाब आहे हे मी आपल्या लक्षात आणून देत आहे. मी आपल्याला सीडी दाखविली आहे, ही सीडी माझ्याकडे आहे. या ठिकाणी कॅगचा गोपनीय अहवाल बाहेर आलेला आहे. हा अहवाल आपल्याला वाचून न दाखविता ही सीडी मी आपणाकडे पाठवीत आहे, आपण ती तपासून घ्यावी. हे सरकार जर त्यांच्या आपसातील दुहीमुळे एकमेकांचे कपडे उतरविण्यासाठी हा अहवाल फोडणार असतील तर विरोधक म्हणून आमचे काम काय आहे, हे असे कसे करु शकतात? या सरकारमधील मंत्रीच एकमेकांचे कपडे उतरविणार असतील आणि असे अहवाल रोज बाहेर पडणार असतील तर विरोधक म्हणून आमचे या सभागृहामध्ये काम काय आहे? सभापती महोदय, मी हे सर्व आपणाकडे पाठवितो. सरकारने हे सर्व तपासून बघावे. हा अहवाल फुटला आहे काय? हे तपासून पहावे. जर फुटला असेल तर त्याची चौकशी झाली पाहिजे. यामध्ये माहिती बाहेर देणारा सरकारमधील नेमका झ ारीतील शुक्राचार्य कोण आहे हे तपासून पहावे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या सभागृहामध्ये कुणीही आरोप करावे, कुणीही म्हणजे सन्माननीय सदस्यांनी आरोप करावे आणि सरकारने त्याबाबत चौकशी करावी असे नसते. तसे असेल तर यांच्याजवळ हे सर्व आले कोठून? याची पहिल्यांदा आपल्याला चौकशी करावी लागेल. मंत्र्यांनी अहवाल फोडला या पेक्षा जो शासकीय अहवाल प्रसिध्द झालेला नाही त्याची माहिती सन्माननीय सदस्यांजवळ कोठून आली याची चौकशी केली पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण याची चौकशी केली पाहिजे. हे तुमचे काम आहे.तुमच्याकडील माहिती आमच्याकडे कशी येते याची तुम्ही चौकशी केली पाहिजे. हे तुमचे काम आहे.मी आपल्याकडे सी.डी.पाठवितो. आपण ती तपासून घ्यावी. मी आपल्याला सांगू इच्छितो की, विधान सभेमध्ये देखील माननीय अध्यक्ष यांनी यासंबंधातील चौकशी मान्य केलेली आहे.त्यामुळे मीच हे म्हणत आहे अशातला भाग नाही. म्हणून आपण या सर्व गोष्टींची चौकशी करावी. मी आपल्याकडे या सी.डी.ची प्रत देखील पाठवित आहे.सदरहू सी.डी. तसेच कॅगचा अहवाल हा बाहेर कसा येतो हा प्रश्न आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे हे मी सुरुवातीलाच म्हटलेले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला हरकतीच्या मुद्यालाच हरकत घ्यावयाची आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्याला नियम सांगतो. कधीही हरकतीच्या मुद्यावर हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही असा नियम आहे.

**उप सभापती** : होय.

श्री.भास्कर जाधव : म्हणून माझ्या हरकतीच्या मुद्यावर सन्माननीय सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येणार नाही हा माझा दुसरा मुद्दा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावरच बोलत आहे. त्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, त्याच मुद्यावर मी बोलत आहे. मी नवीन काही बोलत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हरकतीचा मुद्दा मांडू शकतात. येथे पाठिंबा देण्याचा प्रश्न कुठे येतो? नियमाप्रमाणे त्यांना पाठिंबा देता येत नाही हे मान्य . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी माननीय नगरविकास मंत्री श्री.भास्कर जाधव यांनी जो मुद्दा मांडला .....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, त्या हरकतीच्या मुद्याला पाठिंबा देता येत नाही हे मान्य आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी माननीय नगरविकास मंत्री श्री.भास्कर जाधव यांनी मुद्दा मांडला की, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी जे काही मांडले त्यामध्ये समोरच्या बाकावरील मंत्र्यांवर आरोप केले असून ते सभागृहाच्या पटलावरुन काढून टाकावे. माझे तर असे स्पष्ट म्हणणे आहे की, त्यांनी जे काही मांडलेले आहे त्याबाबत चौकशी करा असे सांगितले आहे. विधानसभे मध्ये माननीय अध्यक्ष यासंबंधातील चौकशी मान्य करतात, त्यामुळे या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

बाबतीत आपल्याला येथे वेगळा निर्णय देता येणार नाही हा एक भाग झाला. परंतु सन्माननीय सदस्यांनी जे काही मांडलेले आहे ते जर अयोग्य निघाले तर संबंधित माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्यावर हक्कभंग दाखल करावा ही या सभागृहाची प्रथा आणि परंपरा आहे.त्यामुळे आम्ही हक्कभंगाचा अधिकार स्वत:हून तुमच्या हातामध्ये देत आहोत. त्यामुळे या बाबी पटलावर असतील तर हक्कभंग देता येईल. पटलावर नसलेल्या गोष्टीमुळे सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांना घरी जावे लागले. माझे म्हणणे असे आहे की, जे काही आहे ते पटलावरुन काढता येणार नाही. त्या संदर्भात संबंधित मंत्री महोदयांनी जर हक्कभंग दाखल केला तर तो आपण स्वीकारावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी याबतीत चौकशीची मागणी केली आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, मघाशी आपले बोलून झालेले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण माझे म्हणणे एक मिनिट ऐकून घ्यावे.या सभागृहामध्ये असा आक्रोश करुन आणि "पॉईंट ऑफ इन्फर्मेशन किंवा पॉईंट ऑफ ऑर्डर" असे म्हटल्याशिवाय सांगता येत नाही. जेव्हा आज सकाळी आम्हाला कळले की, ऑडीटर जनरलचा रिपोर्ट फुटलेला आहे. त्या वेळी आम्ही माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांना सांगितले की, आपण याबाबतीत अधिकृतरित्या विचारणा करावी. सभापती महोदय, श्री.राम प्रधान समितीचा अहवाल देखील अशाच प्रकारे बाहेर आला आणि प्रश्न असा आहे की, तुम्ही आमची चौकशी करीत आहात? दूरदर्शनच्या वाहिन्यांवरुन ऑडीटर जनरलचा रिपोर्ट केवळ आजच दिवसभर नाही तर पुढील चार दिवस दाखविला जाणार आहे.त्याप्रमाणे यापूर्वी तुम्ही श्री.राम प्रधान समितीच्या अहवालाबाबत चौकशी केली होती काय? सन्माननीय सदस्य आणि आमचे नेते श्री.रामदास कदम यांनी याठिकाणी ह्या सी.डी.बाबत म्हणणे मांडले. मात्र त्यानंतर तुम्ही त्यांच्याच चौकशीचे धारिष्ट्य दाखवित आहात. पण तो रिपोर्ट कसा फुटला आणि तो ज्या-ज्या वाहिन्यांवर दाखविला जात आहे त्या मीडियाला तुम्ही रोखू शकत नाही ही आज वस्तुस्थिती आहे. म्हणून विधीमंडळाच्या सभागृहात आमचा आवाज दडपण्यापेक्षा नक्की काय घडत आहे ही माहिती जनतेसमोर आली पाहिजे हा महत्वाचा भाग आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्याकडे हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे, त्यांच्याकडे नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, मीडियामधून हे सगळे दाखविले जात आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रातील जनता हे पहात आहे आणि आम्ही ते विचार येथे मांडावयाचे नाहीत का? मग चौकशी करावयाची असेल तर ते मीडियाकडे कुठून आले याची चौकशी करावी. ती मीडियाची करा. हे सार्वभौम सभागृह आहे. आज मीडियाच्या माध्यमातून जे मांडले जात आहे,जे दाखविले जात आहे,जनता पहात आहे त्या विषयाबद्दलची वस्तुस्थिती आम्ही सदनामध्ये मांडावयाची नाही काय?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही याबद्दल येथे विचारावयाचे नाही काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मग चौकशी करा, हिंमत असेल तर मीडियाची चौकशी करावी. त्यांच्यावर हक्कभंग दाखल करावा. सभापती महोदय, हे सार्वभौम सभागृह आहे. ज्या वेळी एखादी बाब बाहेर फुटलेली आहे आणि ती मीडिया दाखवत आहे, जनता पहात आहे मग ती वस्तुस्थिती आम्ही सदनापुढे मांडावयाची नाही काय ?

**उपसभापती** : ठीक आहे. आपण ती बाब येथे मांडली आहे. आता 06 वाजून 04 मिनिटे झालेली आहेत. सभागृहाची आजची कामकाजाची वेळ संपलेली आहे. या विधेयकावर अजून किती सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे त्यांना ऑन लेग ठेवावे.

यानंतर श्री.अ.शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मंत्रिमंडळाची बैठक सुरु झालेली आहे आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत माझ्या विभागाचा विषय आहे. सभागृहात अन्य मंत्री महोदय उपस्थित नाहीत. सभागृहाचे कामकाज सायंकाळी 6.00 पर्यंत चालवावे असा कामकाज सल्लागार समितीमध्ये निर्णय झालेला आहे. तेव्हा या विधेयकावरील चर्चा येथेच थांबवून सोमवार, दिनांक 9 एप्रिल, 2012 रोजी ती घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे.

सोमवार, दिनांक 9 एप्रिल, 2012 रोजी सकाळी 10.00 ते 11.00 पर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 14- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक 2011 वरील चर्चा पुढे सुरु होईल.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता पुन: सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 05 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 9 एप्रिल, 2012 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही